


# जनमाध्यम


paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
✦ अमरावती, शनिवार २७ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





## नववीच्या समाजशास्त्रातून संविधानाची प्रस्तावना हटवली

**नवी दिल्ली :** एनसीईआरटीने नववीच्या सामाजिक विज्ञानाच्या पुस्तकातून संविधानाची प्रस्तावना काढून टाकली आहे. याशिवाय सोशलिस्ट (समाजवादी) आणि सेक्युलर (धर्मनिरपेक्ष) या शब्दांचाही उल्लेख नाही. पुस्तकात आणीबाणीवर एक वेगळा विभाग जोडला आहे. ही माहिती नुकतीच समोर आली. पुस्तकातील 'अंडरस्टँडिंग सोसायटी: इंडिया अँड बियाँड' या प्रकरणात आणीबाणीला लोकशाहीसमोर आलेल्या सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक म्हटले आहे. तथापि, यात संविधानाची चर्चा त्याच्या निर्मिती, लोकशाही संस्था आणि मूलभूत अधिकारांच्या माध्यमातून केली आहे, परंतु सार्वभौम (संप्रभुता), समाजवादी (समाजवाद), 'धर्मनिरपेक्ष' (पंथनिरपेक्ष/धर्मनिरपेक्ष), 'लोकशाही' (लोकतांत्रिक) आणि 'गणराज्य' (गणराज्य) यांसारख्या शब्दांबद्दल माहिती दिलेली नाही.




९ वीच्या पुस्तकात लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या भूमिकेचे सविस्तर वर्णन केले आहे. यात म्हटले आहे की, त्यांनी विद्यार्थी आणि सामान्य लोकांना संघटित केले आणि बिहार तसेच गुजरातमध्ये मोठी जनआंदोलने उभी राहिली. पुस्तकानुसार, १९७७ मध्ये आणीबाणी संपल्यानंतर सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. जनतेने मतदानाच्या माध्यमातून आपले मत व्यक्त केले आणि सत्ताधारी सरकार निवडणुकीत हरले. पुस्तकात याला भारतीय लोकशाहीच्या बळकटीचे उदाहरण म्हटले आहे. पुस्तकात लिहिले आहे की, १९७० च्या दशकाच्या सुरु वातीला इंदिरा गांधी सरकारच्या विरोधात लोकांमध्ये नाराजी वाढत होती. बेरोजगारी, महागाई आणि गैरव्यवस्थापनाच्या आरोपांमुळे अनेक ठिकाणी निदर्शने झाली. त्यानंतर जून १९७५ मध्ये अंतर्गत अशांततेच्या आधारावर राष्ट्रीय आणीबाणी लागू करण्यात आली. पुस्तकानुसार, या काळात बहुतेक मूलभूत अधिकार निलंबित करण्यात आले, प्रेसवर सेन्सारशिप लादण्यात आली आणि अनेक राजकीय नेते व कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. पुस्तकात म्हटले आहे की, या काळात लोकशाही संस्थांवर दबाव वाढला आणि लोकांचे स्वातत्र्य मर्यादित झाले.

## रखडलेल्या खरीप पेरण्यांना वेग



**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने दमदार हजेरी लावली असून भारतीय हवामान विभागाने १ जुलैपर्यंत राज्यात पावसाचा इशारा दिला असून मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिकसह राज्यातील जवळपास २४ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. नद्यांना पूर, विहिरींच्या पाणीपातळीत वाढ गेल्या २४ तासांत झालेल्या जोरदार पावसामुळे जळगाव जिल्ह्यातील अंजनविहिरे गावातील झीरी नदीला पहिला पूर आला असून येथील बंधारा ओव्हरफ्लो झाला आहे. या पावसामुळे परिसरातील विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली असून जलस्रोत जिवंत झाले आहेत. तसेच गोंदिया आणि नंदुरबार जिल्ह्यातही पावसाने चांगली हजेरी लावली आहे. नंदुरबारच्या अक्कलकुवा तालुक्यात सर्वाधिक ३३.४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. उकाड्यापासून नागरिकांना सुटका गेल्या काही दिवसांपासून राज्यातील नागरिक आणि शेतकरी तीव्र उकाड्यामुळे कमालीचे त्रस्त झाले होते. या पावसामुळे आता वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली आहे. विजांच्या कडकडाटासह सुरू झालेल्या या पावसामुळे सध्यातरी सर्वसामान्य नागरिक आणि बळीराजा यांच्यामध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे. दरम्यान राज्यातील प्रत्येक पथक संबंधित नगरसेवकांच्या समन्वयाने काम करणार आहे. नालेसफाई, गटार स्वच्छता, पाणीपुरवठ्यातील अडचणी, पाईपलाइन गळती, खड्डे, पाणी साचणारी ठिकाणे तसेच धोकादायक झाडांच्या फांद्यांबाबत प्राप्त तक्रारींवर त्वरित कार्यवाही केली जाणार आहे. प्रत्येक पथकात १५ सदस्यांचा समावेश असून, अधिकारी, कर्मचारी, तांत्रिक मनुष्यबळ, जेसीबी, आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध राहणार आहे. स्थानिक नगरसेवक आपल्या प्रभागातील समस्या थेट पथकांसमोर मांडतील आणि त्यानुसार कामे हाती घेतली जातील. पावसाळ्यात नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी महापालिकेने मान्सून टास्क फोर्स कार्यान्वित केला आहे. शहरातील पावसाळ्यापूर्वी, पावसाळादरम्यान आणि पावसाळ्यानंतर उद्भवणा-या समस्या तातडीने सोडविण्यासाठी पालिकेच्या सहा विभागांत सहा विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. ही पथके आजपासून कार्यरत झाली आहेत.

**शेतक-यांना दिलासा-**शेतक-यांना मोठा दिलासा यंदा मान्सून केरळमध्ये उशिरा दाखल झाला आणि त्यानंतर सुमारे १५ दिवस अरबी समुद्रातच रेंगाळल्याने राज्यातील खरिपाच्या पेरण्या पूर्णपणे रखडल्या होत्या. मात्र, आता जूनअखेर सुरू झालेल्या या दमदार पावसामुळे अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या शेतक-यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या पावसामुळे रखडलेल्या पेरणीच्या कामांना आता संपूर्ण राज्यात वेग येणार आहे.

### अयोध्या राम मंदिर दानपेटी चोरी प्रकरणात मोठी कारवाई

## 6 कॅशियर्ससह 8 जणांवर एफआयआर दाखल



**अयोध्या/वृत्तसंस्था :** अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या दानपेटीतील चोरी प्रकरणात अखेर मोठी कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. राम जन्मभूमी ट्रस्टचे सदस्य कृष्ण मोहन यांच्या तक्रारीवरून अयोध्या पोलीस ठाण्यात ८ जणांविरोधात गुन्हा (एफआयआर) दाखल करण्यात आला आहे. एसआयटीच्या (विशेष तपास पथक) तपास अहवालानंतर ही कारवाई करण्यात आली असून पोलिसांनी सर्व आरोपींच्या घरावर छापे टाकत त्यांना ताब्यात घेतले आहे.या प्रकरणात अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा, अविनाश शुक्ला, टिन्नू यादव, मनीष यादव आणि इतर काही जणांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०६, ३१६ (५), ३१७ (४), ६१ आणि ३ (५) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**सीसीटीव्ही फुटेजवरू न मोठी कारवाई; बड्या नावांचा समावेश नाही-**या कारवाईत चंपत राय किंवा अनिल मिश्रा यांसारख्या ट्रस्टच्या बड्या पदाधिका-यांची नावे नाहीत. गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये राम मंदिरातील दानपेटीची रोकड मोजणा-या ६ मुख्य कॅशियर्सचा समावेश आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीसीटीव्ही फुटेजमध्ये जे लोक प्रत्यक्ष चोरी करताना दिसले किंवा ज्यांनी या चोरीत मदत केली, त्यांच्यावरच पोलिसांनी कारवाईची कु-हाड चालवली आहे.

**कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचा प्रश्न; ट्रस्टची कठोर भूमिका-** या प्रकरणाकडे सुरु वातीला केवळ अंतर्गत गैरव्यवहार किंवा विभागीय तपासाच्या दृष्टिकोनातून पाहिले जात होते. मात्र, आता थेट एफआयआर दाखल झाल्याने याला मोठे कायदेशीर स्वरूप आले आहे. हे प्रकरण केवळ पैशांच्या अपहारापुरते मर्यादित नसून, देश-विदेशातील कोट्यवधी हिंदू भाविकांनी रामलल्लाच्या चरणी अर्पण केलेल्या अथांग श्रद्धेशी आणि विश्वासाशी जोडलेले आहे. त्यामुळे राम जन्मभूमी ट्रस्टने हे प्रकरण अत्यंत गांभीर्याने घेतले आहे. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडिया आणि मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमांमध्ये या चोरीबाबत उलटसुलट चर्चा सुरू होत्या. काही धक्कादायक पुरावे आणि कागदपत्रेही समोर आली होती, ज्यामुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर ट्रस्टने स्वतःहून पुढाकार घेत एफआयआर दाखल केला आणि रामलल्लाचा खजिना तसेच श्रद्धाळूंच्या आस्थेशी कोणालाही खेळू दिले जाणार नाही, असा (पान २ वर)

## मंदिरासाठी दिलेली चांदीची वीट कुठे आहे?

**मुंबई/प्रतिनिधी :** अयोध्येतील राम मंदिराच्या बांधकामासाठी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून देण्यात आलेल्या ४ किलो चांदीच्या विटेचा ठावठिकाणा अद्याप समोर न आल्याचा दावा करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राउत यांनी राम मंदिर ट्रस्टवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. संजय राउत यांनी म्हटले आहे की, राम मंदिराच्या बांधकामासाठी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने १ कोटी रु पयांहून अधिक आर्थिक मदतीसह ४ किलो वजनाची पवित्र चांदीची वीट हजारो शिवसैनिक आणि संत-महंतांच्या उपस्थितीत अर्पण केली होती.



मात्र, वर्षे उलटून गेल्यानंतरही त्या चांदीच्या विटीबाबत कोणतीही अधिकृत पावती किंवा माहिती राम मंदिर ट्रस्टकडून देण्यात आलेली नाही, असा दावा त्यांनी केला.

**पूर्ण चौकशीची मागणी-** ही चांदीची वीट नेमकी कुठे गेली? तिचा वापर कशासाठी झाला? याची माहिती जनतेसमोर यायला हवी. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होउन जबाबदारी निश्चित केली पाहिजे अशी मागणी राउत यांनी केली आहे.

## मोहन भागवत मोदींचे गुलाम

**नागपूर/प्रतिनिधी :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर सडकून टीका केली असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत हे पंतप्रधान मोदींचे गुलाम बनले आहेत. भाजपला अंगावर घेणे आणि सत्तेतून खाली खेचणे हे केवळ आंबेडकरी चळवळीशिवाय दुसरे कोणीही करू शकत नाही. देशातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना आंबेडकरांनी थेट संघावर प्रहार केला. इथले राजकीय पक्ष गुलाम होतायत का? अशी गंभीर परिस्थिती उद्भवली आहे. अगदी आरएसएसचे मोहन भागवत हेदेखील पंतप्रधान मोदींचे गुलाम झालेले दिसत आहेत.



आंतरराष्ट्रीय स्तरावर पंतप्रधान मोदींची छी थू होत असून देशाला आर्थिक दृष्टीने गुलाम करण्याची परिस्थिती आता सुरू झाली आहे.

**जनतेनेच ठरवावा खरा विरोधी पक्ष-** राजकीय व्यवस्थेला जर लकवा लागला असेल, तर सामान्य लोकांनी त्याविरोधात आवाज उचलला पाहिजे. जनतेला विरोधी पक्ष पाहिजे की नको? हे आता ठरवण्याची वेळ आली आहे. जो पक्ष भाजपासोबत जाणार नाहीत, तेच खरे विरोधी पक्ष आहेत, हा निकष आता जनतेनेच लावला पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

## महेश दीक्षित नवे आयबी प्रमुख

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने इंटेलिजन्स ब्युरो (आयबी) चे विशेष संचालक महेश दीक्षित यांची देशाच्या अंतर्गत गुप्तचर संस्थेचे नवीन प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. ते ३० जून रोजी कार्यकाळ पूर्ण करत असलेल्या तपन कुमार डेका यांची जागा घेतील.



केंद्र सरकारने महेश यांची दोन वर्षांसाठी आयबी संचालक म्हणून नियुक्ती केली आहे.महेश दीक्षित हे १९९३ च्या बॅचचे आंध्र प्रदेश कॅडरचे आयपीएस अधिकारी आहेत. सध्या ते कइ मध्ये विशेष संचालक आणि एजन्सीचे दुसरे सर्वात वरिष्ठ अधिकारी आहेत. यापूर्वी त्यांनी जम्मू-काश्मीरमध्ये सब्सिडियरी इंटेलिजन्स ब्युरो (एसआयबी) चे प्रमुख म्हणूनही काम पाहिले आहे. त्यांना दहशतवादविरोधी आणि गुप्तचर मोहिमांचा दीर्घ अनुभव आहे. सध्याचे आयबी संचालक तपन कुमार डेका यांचा कार्यकाळ ३० जून २०२६ रोजी संपत आहे. डेका हे १९८८ च्या बॅचचे हिमाचल प्रदेश कॅडरचे आयपीएस अधिकारी आहेत. ते जुलै २०२२ पासून आयबी प्रमुख होते. सरकारने त्यांना दोनदा सेवा विस्तार दिला होता.

## मेधा कुलकर्णी-अभिमन्यू पवार वाद पेटला

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील भाजपच्या नेत्यांमध्ये चांगलंच नाराजीनाट्य रंगल्याचे पहायला मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुण्यात आज यूपीएससी, एमपीएससीतील यशस्वी विद्यार्थी व पालकांचा सन्मान करण्यात आला.



सारथीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु या कार्यक्रमात पहिल्या रांगेत बसण्यावरून आमदार अभिमन्यू पवार आणि खासदार मेधा कुलकर्णी यांच्यामध्ये चांगलाच वाद झाला, त्यानंतर मेधा कुलकर्णी रागातच कार्यक्रमस्थळावरून निघून गेल्या, या घटनेवर प्रतिक्रिया देताना आता मेधा कुलकर्णी यांनी गंभीर आरोप केले आहेत. सर्व प्रथम मी त्या मुलांचे अभिनंदन करते, त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली म्हणून आजचा कार्यक्रम होता. मी देवेंद्र फडणवीस यांचे देखील अभिनंदन करते, की त्यांनी सारथीच्या माध्यमातून होतकरू विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी उत्तम अशी यंत्रणा तयार केली. अतिशय चांगल्या मनस्थितीमध्ये मी त्या कार्यक्रमाला गेले होते. पहिल्या रांगेमध्ये काही रिकाम्या खुर्च्या होत्या. अधिवेशन सुरू आहे, त्यामुळे बरेच लोक आले नव्हते. त्यामुळे खुर्च्या रिकाम्या होत्या, अधिकारी असे म्हणत होते की जर खुर्च्या रिकाम्या असतील तर मेधा कुलकर्णी यांचा प्रोटोकॉल इमिजेट आहे. कारण खासदार म्हणून तिथे कोणीच नव्हतं आणि शिवाय माझ्याकडे एक कमिटीचे अध्यक्षपद देखील आहे. म्हणून अधिका-यांनी मला सांगितले की तुम्ही इथे बसा. मी त्यांना म्हटले की नरेंद्र पाटील देखील इथे बसू शकतात, कारण ते महामंडळाचे अध्यक्ष आहेत. ते आमदार असले तरी महामंडळाचे अध्यक्ष आहेत. अभिमन्यू पवारांना त्या ठिकाणी स्वतःला बसायचे होते. म्हणून त्यांची धावपळ सुरू होती. अभिमन्यू पवार असे म्हणाले की, हा कार्यक्रम मराठा समाजाचा आहे, तुम्ही तिथे बसलात तर वाद होईल. कार्यक्रम काय चाललाय तुम्ही काय बोलतायते, मला तिथे सपोगेट झाले मी तिथून निघून आले. हा कार्यक्रम वेगळा आहे, मग तिथे जातीचा विषय (पान २ वर)

## एनडीए सरकारच्या मंत्रिमंडळात लवकरच फेरबदल

### 'ऑपरेशन टायगर'मुळे शिंदेंची ताकद वाढली; श्रीकांत शिंदेंना कॅबिनेट, तर राष्ट्रवादीलाही मंत्रिपदाची चर्चा

*'ऑपरेशन टायगर' यशस्वी करत उद्धव ठाकरे गटाच्या ६ खासदारांना आपल्या गोटात खेचणा-या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची दिल्ली दरबारात ताकद चांगलीच वाढली आहे. लोकसभेतील वाढलेले संख्याबळ लक्षात घेता येत्या २८ किंवा २९ जून रोजी होणा-या संभाव्य कॅबिनेटमध्ये स्थान मिळण्याची शक्यता आहे.*



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**केंद्रातील एनडीए सरकारच्या मंत्रिमंडळात फेरबदलाची जोरदार चर्चा आहे. त्यातच संभाव्य बदलांबाबत एक यादी समोर आली आहे. मंत्रिमंडळातील फेरबदल पुढील काही दिवसांत म्हणजे रविवारी किंवा सोमवारी होउ शकतात असेही बोलले जात आहे. या आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यानंतर गृहमंत्री अमित शाह यांनी राष्ट्रपती भवनात जात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. त्यानंतर संभाव्य कॅबिनेटमधील फेरबदलाला वेग आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, संभाव्य मंत्रिमंडळातील फेरबदलाची जी यादी समोर आली आहे त्यात काही आश्चर्यकारक नावे आहेत. ज्यात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे माजी गर्व्हनर शक्तिकांता दास यांचेही नाव समाविष्ट आहे. त्याशिवाय आणखी काही मोठी नावे आहेत. जी सध्याच्या कॅबिनेटमध्ये आहेत परंतु पुढील २-३ दिवसांत होणा-या कॅबिनेट बदलात त्यांचा डच्चू दिल्याचं पाहायला मिळू शकते. शक्तिकांता दास पंतप्रधानांचे प्रधान सचिव आणि माजी आरबीआय गर्व्हनर, यांचा संभाव्य मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रि-पदाची शपथ दिली जाउ शकते. ज्यांच्याकडे अर्थ खाते देण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे यांनाही कॅबिनेट मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरेंचे ६ खासदार शिंदेसेनेत घेउन एनडीएची ताकद वाढवण्यात श्रीकांत शिंदे यांचे मोठे योगदान आहे.

अनुराग ठाकूर हिमाचल प्रदेशच्या हमीरपूर येथील भाजपा खासदार पुन्हा एकदा केंद्रीय कॅबिनेटमध्ये समाविष्ट होउ शकतात. अरूण गोविल मेरठचे भाजपा खासदार यांनाही मंत्रिमंडळात समाविष्ट केले जाउ शकते. प्रभू रामाची भूमिका साकारणारे अरूण गोविल हे प्रसिद्ध अभिनेते आहेत. राघव चड्डा अथवा अशोक मित्तल आम आदमी पक्षातून नुकतेच भाजपात सहभागी झालेले राघव चड्डा किंवा अशोक मित्तल यांच्यापैकी एकाला मंत्रि-पदाची ल?टरी लागू शकते. नितीश कुमार जेडीयू प्रमुख नितीश कुमार यांनी काही दिवसांपूर्वी बिहारच्या मुख्यमंत्रि-पदाचा राजीनामा देत राज्यसभेवर खासदार म्हणून गेलेत. त्यांचीही कॅबिनेटमध्ये वर्णी लागू शकते. विष्णुदत्त शर्मा मध्य प्रदेशातील भाजपा खासदार विष्णुदत्त यांनाही कॅबिनेट मंत्रिमंडळात संधी मिळू शकते. तरूण चुग भाजपाचे वरिष्ठ नेते आणि आरएसएसचे प्रचारक हेदेखील कॅबिनेट मंत्रिमंडळात दिसू शकतात. आतापर्यंत त्यांनी संघटनेची जबाबदारी खूप चांगल्यारितीने सांभाळली आहे. जर्नादन सिंह सिग्रीवाल बिहारच्या महाराजगंज येथील भाजपा खासदार यांचाही मंत्रिमंडळात समावेश होउ शकतो.

**खात्यांची अदलाबदल-** निर्मला सीतारामन यांच्याकडील सध्याचे अर्थ मंत्रालय खाते काढून (पान २ वर)

## पुढील 3 वर्षे नेपाळला साखर निर्यात बंद


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गेल्या काही दिवसांपासून नेपाळचे नवे पंतप्रधान बालेन शाह हे सातत्याने भारताविरोधी निर्णय घेत आहेत, सुरु वातीला त्यांनी भारतामधून आयात होणा-या वस्तूंवर कर लावण्याचा निर्णय घेतला



होता, त्यानंतर त्यांनी लिपूलेखवर देखील दावा सांगितला होता. तसेच या संदर्भात मध्यस्थी करावी असे पत्र देखील त्यांनी ब्रिटनच्या पंतप्रधानांना पाठवलं होतं. त्यानंतर त्यांनी भारतामधून नेपाळमध्ये येणा-या वाहनांवर देखील टोला लावण्याचा निर्णय घेतला, तसेच या वाहनांना अस्थाई वाहने म्हणून नोंदणी करणं बंधकारक केले होते.ही प्रक्रिया अतिशय किचकट आणि गुंतागुंतीची आहे. दरम्यान त्यानंतर भारताकडून साखरेच्या रु पात नेपाळला पहिला दणका देण्यात आला, पुढील तीन वर्ष आता भारत नेपाळला कोणत्याही प्रकारे साखर निर्यात करणार नाहीये, त्यामुळे नेपाळमध्ये मोठ्या प्रमाणात साखरेची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. नेपाळसाठी भारताने दिलेला हा झटका ताजा असतानाच आता भारताने बालेन शाह यांना आणखी एक मोठा धक्का दिला आहे. भारतासोबत नेपाळचा वाद वाढतच चालला आहे, याचदरम्यान आता नेपाळने पुन्हा एकदा आपले चहा निर्मितीचे चार कारखाने सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र भारतासोबत सुरू असलेल्या या वादाचा नेपाळला मोठा फटका बसला असून, नेपाळचा चहा उद्योग पूर्णपणे ठप्प झाला आहे. नेपाळने चहाचे कारखाने तर सुरू केले आहेत, मात्र आता भारताच्या कडक नियमांमुळे दोन्ही देशांमधील व्यापारी संबंधामध्ये मोठा तणाव निर्माण झाला आहे. भारताच्या एफएसएसएआयने चहासाठी जोखीम-आधारित तपासणी प्रणाली लागू केली आहे, या नियमानुसार भारत जो चहा आयात करणार आहे, त्यातील वीस टक्के चहाचे नमुने रँडम पद्धतीने तपासणीसाठी प्रयोग शाळेत पाठवले जाणार आहेत, हा नियम तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आला आहे.

## होर्मुझच्या सामुद्रधुनीत मालवाहू जहाजावर हल्ला

**तेहरान/नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका आणि इराण दरम्यान अत्यंत महत्त्वाचा १४ कलमी शांतता करार होउन अवघा एक आठवडा उलटत नाही तोच जगातील सर्वांत महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ एका आंतरराष्ट्रीय मालवाहू जहाजावर हल्ला झाला आहे. ओमानच्या दाहीत बंदरापासून आग्नेयेला ७.५ सागरी मैलांवर हा हल्ला झाला. या ताज्या हल्ल्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेने तेथे अडकलेल्या ११ हजारांहून अधिक खलाशांची सुटका करण्याची मोठी मोहीम तडकाफडकी स्थगित केली आहे. अमेरिकन अधिका-यांनी या हल्ल्यामागे थेट इराणचा हात असल्याचा आरोप केला आहे. यामुळे आखाती देशांत पुन्हा एकदा युद्धाचा भडका उडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



ब्रिटिश सागरी सुरक्षा संस्था यूकेएमटीओने दिलेल्या वृत्तानुसार, सिंगापूरचा ध्वज असलेल्या एव्हर लव्हली या मालवाहू जहाजावर क्षेपणास्त्राने हल्ला करण्यात आला. सुदैवाने या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि जहाजाचे किरकोळ नुकसान होउनही त्यांनी प्रवास सुरू ठेवला, असे सागरी जोखीम व्यवस्थापन कंपनी व्हॅनगार्डने सांगितले. मरीन ट्रॅफिक या शिप-ट्रॅकिंग वेबसाइटनुसार, या जहाजाने गुरु वारी सकाळी दक्षिण मार्गाने होर्मुझच्या सामुद्रधुनीत प्रवेश केला होता आणि स्थानिक वेळेनुसार दुपारी ३.३० वाजता ते पूर्व बाजूने बाहेर पडले. या हल्ल्यानंतर आयएमओचे सरचिटणीस आर्सेनियो डोमिंगेझ यांनी तातडीने निवेदन जारी करत सुटका मोहीम थांबवल्याचे जाहीर केले.

**खलाशांची सुरक्षा आमच्यासाठी सर्वोच्च-** खलाशांची सुरक्षा आमच्यासाठी सर्वोच्च आहे. काही जहाजांची सुटका करण्यात आली होती, मात्र सुरक्षेची पूर्ण खात्री मिळेपर्यंत ही मोहीम स्थगित राहील. हल्ला झालेले जहाज युएनच्या सुटका आराखड्याच्या अंतर्गत प्रवास करत नव्हते, मात्र खबरदारी म्हणून आम्ही हा निर्णय घेतला आहे असे ते म्हणाले.

**मोठी सुटका मोहिम राबवावी-** फेब्रु वारी महिन्यापासून अमेरिका-इस्त्रायल विरु द्ध इराण अशा थेट युद्धामुळे शेकडो जहाजे आणि ११ हजारांहून अधिक खलाशी या आखातात अडकून पडले आहेत. मंगळवारीच हा जलमार्ग पुन्हा उघडल्यानंतर युएनने या मोठ्या सुटका मोहिमेची घोषणा केली होती.

## बहुचर्चित 'प्रहार'चा टीझर प्रदर्शित

**मुंबई :** आगामी बहुचर्चित चित्रपट प्रहारचा टीझर रिलीज झाला आहे. हा चित्रपट २००८ मधील मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. यामध्ये राजकुमार रावने वकील उज्ज्वल निकम यांची भूमिका साकारली आहे. उज्ज्वल निकम यांनी दहशतवादी अजमल कसाबला फाशीची शिक्षा मिळवून देण्यासाठी मोठा कायदेशीर लढा दिला होता.१ मिनिट ५३ सेकंदांच्या या टीझरमध्ये राजकुमार राव वकील उज्ज्वल निकम यांच्या भूमिकेत दिसत आहे. २६/११ च्या हल्ल्याचा आरोपी अजमल कसाबला फाशी मिळवून देण्यासाठी तो न्यायालयात प्रयत्न करताना दिसतो. यादरम्यान तो कोर्टात आपले युक्तिवाद मांडतो. जेव्हा अजमल कसाबचे हल्ला करतानाचे फोटो आणि व्हीडीओ सर्वांसमोर आहेत, तर मग त्याला फाशी देण्यास उशीर का होत आहे? असा सवाल तो न्यायालयाला विचारताना दिसतो. याशिवाय याला मारु नका हा इव्हिडन्स आहे, असा मराठीत संवाद तो करताना दिसतो.




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# 'ऑपरेशन कवच'; अमली पदार्थांविरोधात पोलिसांची जनजागृती रॅली

## युवकांना व्यसनमुक्तीचा संदेश; नागरिकांना सहभागाचे आवाहन

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यातून युवकांना वाचविण्यासाठी आणि व्यसनमुक्त समाज घडविण्याच्या उद्देशाने अमरावती ग्रामीण पोलिसांनी जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जिल्हाभर व्यापक जनजागृती मोहीम राबविली. 'ऑपरेशन कवच' अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन हद्दीत बाईक रॅली काढून नागरिकांना अमली पदार्थांपासून





दूर राहण्याचा संदेश देण्यात आला. रॅलीदरम्यान पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जनजागृतीपर फलक, बॅनर आणि घोषणांच्या माध्यमातून अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आर्थिक दुष्परिणाम नागरिकांसमोर मांडले. 'व्यसनमुक्त समाज हीच खरी प्रगती', 'अमली पदार्थांना नकार, उज्ज्वल भविष्याचा स्वीकार' आणि 'नशामुक्त युवक – सशक्त भारत' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.परतवाडा येथे आयोजित मुख्य रॅलीमध्ये अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम आणि अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांनी स्वतः सहभाग घेत नागरिकांशी संवाद साधला. समाजातील प्रत्येक घटकाने अमली पदार्थांविरोधातील लढ्यात सहभागी होण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पोलिसांनी नागरिकांना 'ऑपरेशन कवच' अभियानात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. परिसरात अमली पदार्थांची विक्री, वाहतूक किंवा साठवणुकीबाबत कोणतीही संशयास्पद माहिती आढळल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे, असे आवाहनही करण्यात आले.

**ऑपरेशन कवच'ची त्रिस्तरीय रणनीती-**

अमरावती ग्रामीण पोलिसांनी 'ऑपरेशन कवच' अंतर्गत तीन महत्त्वाच्या बाबींवर भर दिला आहे.

यामध्ये युवक, विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती, अमली पदार्थांची विक्री, साठवणूक आणि तस्करी करणाऱ्यांवर कठोर कारवाई व व्यसनाधीन व्यक्तींना व्यसनमुक्ती व पुनर्वसनासाठी मदत केली जाणार आहे.

**केवळ कारवाई नव्हे, पुनर्वसनालाही प्राधान्य-**

अमरावती ग्रामीण पोलीस दलाने अमली पदार्थांविरोधातील लढा केवळ कायदेशीर कारवाईपुरता मर्यादित न ठेवता व्यसनमुक्ती आणि पुनर्वसनावरही भर दिला आहे.

विविध शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था आणि लोकसहभागाच्या माध्यमातून व्यसनाधीन युवकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

# अत्याचार प्रतिबंधक कायद्याबाबत जनजागृतीसाठी एकदिवसीय नागरिक कार्यशाळा

## -नागरी हक्क संरक्षण पथक व बार्टीचा संयुक्त उपक्रम
## -२०० पोलीस पाटीलांसह शेकडो नागरिकांचा सहभाग

**अमरावती/प्रतिनिधीः-** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ तसेच सुधारित नियम २०१५ यांची प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती आणि गुणवत्तापूर्ण तपास याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने नागरी हक्क संरक्षण पथक अमरावती ग्रामीण आणि बार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय नागरिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. समाजकल्याण आयुक्त कार्यालयाच्या सामाजिक न्याय भवन येथे आयोजित या कार्यशाळेला विविध क्षेत्रांतील अधिकारी, विधी तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस पाटील तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यशाळेत नागरी हक्क संरक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबईच्या अपर पोलीस महासंचालक अश्वती दोर्जे भापोसे यांच्या मार्गदर्शनाखाली अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याचे महत्त्व, त्याची प्रभावी अंमलबजावणी, पीडितांना मिळणारे संरक्षण आणि न्यायव्यवस्थेतील विविध तरतुदींविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम, नागरी हक्क संरक्षण अमरावती परिक्षेत्राच्या पोलीस अधीक्षक अनिता पाटील तसेच अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेत प्रादेशिक समाजकल्याण आयुक्त माया पी. केदार, सहाय्यक आयुक्त आर. व्ही. जाधवर, बार्टीच्या जिल्हा प्रकल्प अधिकारी अनिता गवई तसेच तक्षशिला विधी महाविद्यालयाचे प्राचार्य व जिल्हा व सत्र न्यायालयाचे अभियोक्ता ॲड. डॉ. मनीष शिरसाट यांनी कायद्याच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले.

नागरिकांना अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत उपलब्ध हक्क, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया, पीडितांना मिळणारी आर्थिक मदत, पुनर्वसनाच्या योजना आणि न्याय मिळविण्यासाठी आवश्यक कायदेशीर प्रक्रियेची सविस्तर माहिती देण्यात आली.

अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील विविध तहसील व गावांमधून सुमारे २०० पोलीस पाटील तसेच मोठ्या संख्येने नागरिक या कार्यशाळेत सहभागी झाले. त्यामुळे कायद्याविषयी जागरूकता वाढविण्याचा उद्देश यशस्वी ठरल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन नागरी हक्क संरक्षण पथक अमरावती ग्रामीण यांनी केले होते. नागरिकांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करून सामाजिक समता, न्याय आणि बंधुभाव दृढ करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास पोलीस अधीक्षक अनिता पाटील यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वला वाकपांजर यांनी केले, तर सूत्रसंचालन सहाय्यक पोलीस निरीक्षक प्राजक्ता नागापुरे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

'सुसज्ज तपास, न्यायाची आस; नागरी हक्क संरक्षण हाच आमचा ध्यास' कार्यशाळेदरम्यान अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलीस, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वयाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. 'सुसज्ज तपास, न्यायाची आस; नागरी हक्क संरक्षण हाच आमचा ध्यास' हा संदेश देत नागरिकांना अन्यायाविरोधात निर्भयपणे पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले.

# सुसाईड नोट लिहून व्यापारी चांदवानी बेपत्ता

## -कृष्णा नगर गल्ली नंबर १ मधील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक कृष्णा नगर गल्ली नंबर १ मधील रहिवासी मुकेश अशोक कुमार चांदवानी (वय ४०) गुरुवारी रात्रीपासून अचानक बेपत्ता झाले आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. एकीकडे जेथे कुटुंबीय त्यांचा शोध घेत आहे तर दुसरीकडे त्यांच्याच घरात मुकेश चांदवाणीने बाहेर जाण्यापूर्वी लिहिलेला सुसाईड नोट आढळला आहे. यामुळे कुटुंबीय चिंतित आहे.



कुटुंबीयांनी गाडगे नगर पोलीस ठाण्यात याची तक्रार दिली आहे. मुकेश चांदवानी यांचे भाऊ संजय चांदवानी यांनी ठाण्यात दिलेल्या तक्रारीमध्ये म्हटले आहे की, त्यांचे कुटुंब गेल्या काही वर्षापासून वाहन विक्री आणि दुरुस्तीच्या क्षेत्रामध्ये कार्य करत आहे. अकरा वर्ष भाड्याच्या दुकानात व्यापार करून त्यांनी काही दिवसापूर्वी वलगाव मार्गावर मेट्रो मोटर्स नावाने स्वतःचे शोरूम सुरू केले आहे. त्यांच्या शोरूमच्या बाजूला जगमलाने नामक व्यक्तीने जमीन खरेदी केली. त्यांचा आरोप होते की, मेट्रो मोटर्स शोरूमच्या बाजूची भिंत त्यांच्या जमिनीवर आहे. यामुळे त्यांनी २० में रोजी सकाळी कोणतीही सूचना न देता भिंत तोडली. यामुळे शोरूमचे मोठे नुकसान झाले. पूर्ण व्यापार त्यांचा ठप्प झाला होता. यामुळे मुकेश चांदवानी गेल्या एक महिन्यापासून त्रस्त होते. त्यांच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर आहे. मानसिक तणावात गुरुवारी रात्री ते काही काम असल्याचे सांगून घरून निघाले होते आणि शुक्रवारी सायंकाळपर्यंत ही परत नाही आले. यामुळे कुटुंबियांनी त्यांचा शोध सुरू केला असता त्यांची सुसाईड नोट आढळली.

### ■ बाबा मला माफ करा.....

सुसाईड नोट मध्ये मुकेश चांदवानी यांनी लिहिले आहे की, बाबा सॉरी ज्या वयात मला तुमचा आधार बनायला हवे होते त्या वयात मी तुम्हाला परेशान करत आहोत. माझ्या पत्नी आणि मुलांकडे लक्ष द्या. मी नेहमीसाठी जात आहे आणि कधीही परत नाही येणार आहे... मला माफ करा... असे त्यांनी लिहिलेले आहे. हे पत्र वाचून कुटुंबियांच्या पायाखालची जमीनच सरकली आहे. पत्र घेऊन ते सरळ गाडगे नगर ठाण्यात पोहोचले.पोलिसांनी गुन्हा दाखल करून तक्रार दाखल केला आहे.

# विदर्भात पुढील दोन दिवस हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता

## -भंडारा-गोंदियात मुसळधार सरींचा अंदाज
## -२ जुलैपासून पावसाचा जोर वाढणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये पुढील काही दिवस पावसाची हजेरी कायम राहण्याची शक्यता असून, काही भागांमध्ये मुसळधार पावसाचाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हवामान अभ्यासक प्रा. अनिल बंड यांनी दिलेल्या माहितीनुसार, २ जुलैपासून पावसाचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशीम आणि नागपूर जिल्ह्यांत पुढील दोन दिवस विखुरलेल्या स्वरूपात हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. तर भंडारा, गोंदिया, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. काही भागांत मुसळधार सरी कोसळण्याचाही अंदाज आहे.

या कालावधीत संपूर्ण विदर्भात बहुतांश ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे. यवतमाळ जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

### 'शिंदे गटा'च्या जुन्या कार्यकारिणीला

जाहीर करण्याचे आदेश दिले. आगामी काळात जिल्हाप्रमुखांना सक्रिय होऊन गावागावांत शाखा विस्तार करण्याचे आवाहन करत, राज्यभरात २ लाख बूथ एजंट तयार करण्याचे लक्ष्य त्यांनी यावेळी जाहीर केले.

शिवसेना शिंदे गटाला जिल्ह्यात आणखी सक्षम बनविण्यासाठी आज शुक्रवार २६ जून रोजी हॉटेल गौरी मध्ये जिल्हास्तरीय पदाधिकारी व कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. उद्योग मंत्री सामंत म्हणाले की पश्चिम विदर्भात संघटनेचे कामकाज संतोष जनक नाही. यामुळे येणाऱ्या एका महिन्यात नवीन कार्यकारणी तयार करण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार राज्यभरात दोन लाख बुथ एजंट तयार करण्यात येत आहे. काही स्थानावर बीएलए यांची नियुक्ती करण्यात येत आहे. युवा सेने चे कामकाज संतोषजनक नाही. जिल्ह्यात संघटनेला सक्षम बनविण्यासाठी जिल्हा प्रमुखांची जिल्ह्यामध्ये सक्रियता अनिवार्य आहे. गावागावात शिवसेनेला पोहचून शिंदेसेनेची ताकद आणखीन मजबूत करायची आहे असेही ते म्हणाले. मेळाव्याच्या सुरुवातीला आनंद दिघे, बाळासाहेब ठाकरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी आमदार किशोर आप्पा पाटील, माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील, पराग पिंपळे, प्रीती बंड, जगदीश गुप्ता, संजय गवई, श्याम देशमुख, आशिष धर्माळे, संतोष बद्रे, प्रमोदसिंह गडरेल, उमेश घुरडे, राहुल माटोडे, छोटू महाराज वसू, बंटी रामटेके, माजी नगरसेवक ललित झंजाड सह शिवसेना पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बोलेरो - दुचाकीच्या धडकेत

(वय १९) याच्या ताब्यातील बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एमएच २७ बीएक्स ७५७० ने दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, स्वप्नील पाटील याचा घटना स्थळावरच करुण अंत झाला. स्वप्निल पाटील हा पिकअप वाहनाच्या मागच्या चाकात आला. या घटनेची माहिती मिळताच राजापेठ ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक मीनाक्षी बोचे यांनी तातडीने पोलीस ताफ्यासह घटनास्थळ गाठले. पोलिसांनी तत्परता दाखवत गंभीर जखमी अभिषेक वानखडे याला उपचारासाठी तातडीने इर्विन रुग्णालयात दाखल केले. तसेच अपघातग्रस्त पिकअप चालक निखिल कुशवाहला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात रवाना केले आहे. घटनेच्या गांभीर्याकडे पाहत पंचनाम्या साठी फॉरेन्सिक पथकालाही पाचारण करण्यात आले होते. या प्रकरणी जखमीच्या बयानावरून गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

### जिल्हा सामान्य रुग्णालयात

युनिट निर्माण करणे आवश्यक असल्याचे सुद्धा आमदार महोदयांनी सभागृहात समक्ष सांगितले.

यासंदर्भात सभागृहा समक्ष उत्तर देतांना राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांनी सांगितले कि, अमरावती जिल्हयाच्या आरोग्याचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नरत असून नेहमीच चांगल्या आरोग्याच्या सुविधा निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. जिल्ह्यातील आदीवासी क्षेत्रात देण्यात येणाऱ्या सर्व आरोग्य सुविधांच्या अनुषंगाने विशेष बाब म्हणून नवजात बालकांसाठी सुद्धा अतिदक्षतेच्या सेवा तात्काळ उपलब्ध करण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे ना.आबिटकर यांनी सभागृहात सांगितले.

### यवतमाळच्या तनुश्री कडूची अंडर-२१

मध्ये भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (ऐंि) मुंबई येथील राष्ट्रीय हॉकी उत्कृष्टता केंद्रात तिची निवड झाली होती. आता इंग्लंड दौऱ्यातील सात सामने हे तिच्या कारकिर्दीतील महत्त्वाचे पाऊल ठरणार आहेत. तनुश्रीला घडविण्यात क्रीडा शिक्षक अविनाश जोशी, प्रशिक्षक सागर ठाकूर, मनोज भोरे, शाहिद सय्यद तसेच एसएनबीपी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. फिरोज शेख यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. यापूर्वी ती 'बेटी बचाव, बेटी पढाव' मोहिमेचा चेहराही राहिली होती.

यवतमाळ ते पुणे, मुंबई आणि बंगळुरूपर्यंत ज्यांनी मला साथ दिली, त्या सर्वांना हे यश समर्पित आहे. इंग्लंड दौऱ्यात भारतासाठी शंभर टक्के योगदान देण्याचा प्रयत्न करेन,' अशी भावना तनुश्रीने व्यक्त केली.

भारतीय हॉकी संघात स्थान मिळविणारी तनुश्री ही यवतमाळ जिल्ह्यातील पहिली महिला हॉकीपटू असून, एकूण दुसरी आंतरराष्ट्रीय हॉकी खेळाडू ठरली आहे. तिच्या निवडीमुळे जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून, संघर्षातून यश मिळविणाऱ्या नव्या पिढीसाठी ती प्रेरणास्थान ठरली आहे.

### कारंजा बहीरम येथे गोवंश

मालूरकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर सापळा रचण्यात आला. पोलिसांनी संशयित आयशर ट्रक अडवून तपासणी केली असता, ट्रकमध्ये गोवंश जातीची जनावरे अत्यंत अमानुष पद्धतीने दोरीने बांधून कोंबून ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. पंचांसमक्ष जनावरे खाली उतरवून मोजणी केली असता ट्रकमध्ये एकूण १९ जनावरे आढळून आली. त्यापैकी ५ जनावरे मृतावस्थेत होती. पोलिसांनी जिवंत व मृत जनावरांसह सुमारे २.७७ लाख किमतीची जनावरे आणि १० लाख किमतीचा आयशर ट्रक असा एकूण १२.७७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० मधील विविध कलमे, भारतीय न्याय संहिता तसेच मोटार वाहन कायद्यान्वये चार आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अमन सिरसट, उपनिरीक्षक प्रशांत जाधव, चालक रमेश आठवले, दीपक गवई आणि अमोल नंदरधने यांनी केली.

### अखेर गोविंद पिंजरकर

झाली असून, हा अंगावर काटा आणणारा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर संपूर्ण अमरावती शहर हादरले आहे.

**बिबट्यानंतर आता रानडुकरांचे सावट :**

गेल्या वर्षी शहरातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात बिबट्याने शिरकाव केला होता आणि त्यानंतर याच आशियाड कॉलनीतही त्याचा वावर आढळला होता. बिबट्याच्या त्या दहशतीची आठवण ताजी असतानाच, आता नाल्यालगत राहणाऱ्या रानडुकरांनी नागरिकांचा जीव घ्यायला सुरुवात केली आहे. या डुकरांच्या शिकारीसाठी भविष्यात पुन्हा बिबट्या या निवासी भागात येण्याची दाट शक्यता असल्याने रहिवासी रात्री-अपरात्री घराबाहेर पडण्यासही घाबरत आहेत. पिंजरकर यांच्या मृत्यूनंतर आशियाड कॉलनीतील नागरिक अत्यंत आक्रमक झाले असून विघ्नहर्ता गणपती मंदिरासमोरील ज्या मोकळ्या जागेतून वन्य प्राण्यांचा व डुकरांचा शहरात वावर होतो, तिथे त्वरित मजबूत कंपाउंड वॉल किंवा नाल्यावर पूर्णपणे बंदिस्त आरसीसी गटर लाईनचे बांधकाम तातडीने सुरू करण्याची मागणी केली.

**ज्येष्ठांची काळजी घ्या :** महानगर पालिकेकडून फारशा अपेक्षा करणे चुकीचे आहे. जी यंत्रणा नालीसफाई नीट करू शकत नाही त्यांचेकडून स्वच्छता व इतर सुरक्षा विषयक अपेक्षा करणे व्यर्थ आहे. माझे वडील गेले पण इतरांचे जाऊ नये यासाठी एकटे न फिरता सुरक्षेची काळजी घेऊन स्वतःला जपण्याचं आवाहन प्रवीण गोविंद पिंजरकर यांनी केले.

### हबीब नगरातून एमडीची तस्करी

केल्यानंतर २६ जून रोजी पोलिसांनी नियोजनबद्ध सापळा रचत संबंधित घरावर छापा टाकला. घरझडतीदरम्यान पोलिसांच्या हाती ५४.२ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) लागले. प्राथमिक चौकशीत हा साठा विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. कारवाईत ८ लाख १३ हजार रुपयांचे एमडी ड्रग्स आणि २ हजार रुपयांचा इलेक्ट्रॉनिक वजनकाटा असा एकूण ८ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी अब्दुल इजाज अब्दुल अजीम उर्फ इजाज चंद्रपूरी (वय ५५, रा. हबीब नगर क्र. १, अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध नागपुरी गेट पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

अमरावती शहरात एमडी ड्रग्सच्या वाढत्या साखळीविरोधात पोलिसांनी उघडलेली मोहीम अधिक तीव्र होत असल्याचे या कारवाईतून पुन्हा स्पष्ट झाले आहे. विशेषतः युवकांना लक्ष्य करणाऱ्या अंमली पदार्थांच्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) रमेश धुमाळ, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) शिवाजी बचाटे व सहायक पोलीस आयुक्त कैलाश फुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, अतुल वर, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, दशरथ आडे, महेश इंगोले, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनुने आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

### इलेक्ट्रॉनिक सिगरेटची विक्री व

प्रतिबंधित केलेल्या इलेक्ट्रॉनिक सिगारेटची विक्री करण्याच्या उद्देशाने साठवणूक करत आहे. यावरून गुन्हे शाखेने तेथे शुक्रवारी पहाटे धाड मारली. आरोपी आशिष बाबुराव कडू (वय ४०) यास सोबत घेऊन फ्लॅटची झडती घेतली असता स्टोअर रूम मध्ये एका बॉक्सची पाहणी केली. त्यामध्ये वेगवेगळ्या फ्लेवरच्या एकूण ५५ इलेक्ट्रॉनिक सिगरेट दिसून आले. पोलिसांनी २ लाख ७५ हजार रुपये किमतीच्या सिगारेट जप्त केल्या आहे. आरोपी विरुद्ध राजापेठ पोलिसांनी कलम २७५ बी एन एस, सह कलम ३, ४, ५, ६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे ,रमेश धुमाळ ,सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर ,दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात महेश इंगोले, मनीष वाकोडे, दशरथ आडे ,गजानन सोनुने, सुनील लासुरकर ,दीपक सुंदरकर ,गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सचिन बहाळे, जहीर शेख ,मिर्झा नईम बेग, अतुल संभे, विकास गुडधे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, चेतन गुल्हाने,संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी केली.

### बडनेरा झोनमध्ये प्लास्टिक

जनरल स्टोअर्स येथे प्रतिबंधित प्लास्टिक आढळल्याने ५,००० दंड आकारण्यात आला. तसेच शुभम पारवे, रवींद्र पारवे, जय भोळे किराणा, पर्वतसिंग राजपुरोहित आणि मोहनजी स्वीट मार्ट या आस्थापनांवर दोन डस्टबिनची व्यवस्था नसल्याने प्रत्येकी १,००० दंडाची कारवाई करण्यात आली. अशाप्रकारे एकूण १०,००० दंड वसूल करण्यात आला. या विशेष मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक शारदा गुल्हाने, प्लास्टिक स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी तसेच स्वास्थ्य निरीक्षक सोपान माहुलकर, सागर राजुरकर, वैभव खरड, प्रियंका बैस आणि सुमेध मेश्राम यांनी सहभाग घेतला.महानगरपालिकेने नागरिक आणि व्यावसायिकांना प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळण्याचे तसेच प्रत्येक आस्थापनात ओला व सुका कचरा वेगळा करण्यासाठी दोन डस्टबिनची व्यवस्था ठेवण्याचे आवाहन केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले.

### नागपुरी गेट पोलिसांनी जखमी

जखमी काळवीटला ताब्यात घेतले आणि त्याच्यावर उपचार सुरू केले. त्यामुळे त्याचा जीव वाचला. सदर कारवाई नागपूरी गेटचे पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, विकास मनपिया, इरफान रायलीवाले, इमरान खान, शेखर गायकवाड, मनीष यादव, मोहन ठाकूर, राम लोखंडे, हितेंद्र देवतारे, राजू सायगन, शशी गवई यांनी केली.

### पत्नीला नशायुक्त पदार्थ पाजून

जात असताना आरोपी तिच्यावर अनैसर्गिक पद्धतीने अत्याचार करत असल्याचा आरोप आहे. हा प्रकार २९ मे २०२६ ते १३ जून २०२६ या कालावधीत वारंवार घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. सातत्याने होत असलेल्या अत्याचारामुळे महिलेची प्रकृती खालावू लागली. प्रकृती गंभीर झाल्यानंतर नातेवाईकांनी तिला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारांसाठी अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे हलविण्यात आले. रुग्णालयात उपचारादरम्यान पीडित महिलेने दिलेल्या जबाबाच्या आधारे तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या संदर्भ निर्देशानुसार मोर्शी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी पतीला अटक करून पुढील तपास सुरू केला आहे.

### ६ कॅशियर्ससह ८ जणांवर

स्पष्ट संदेश दिला आहे.या प्रकरणात प्रत्यक्ष एफआयआर दाखल झाल्यानंतर आता हा तपास आणखी कोणत्या मोठ्या व्यक्तींपर्यंत पोहोचणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कारण मंदिरातील अंतर्गत व्यवस्थेच्या आणि आतील लोकांच्या मदतीशिवाय एवढी मोठी चोरी होणे अशक्य असल्याचे बोलले जात आहे. सध्या एसआयटी आणि पोलिसांकडून या प्रकरणाची संयुक्तचौकशी सुरू असून, लवकरच यामागील मोठ्या कटाचा पर्दाफाश होईल अशी शक्यता वर्तवली जात आहे.

### मेधा कुलकर्णी-अभिमन्यू

कशाला? दरम्यान त्यानंतर नरेंद्र पाटील यांनी म्हटले की तिथे असे काही घडलेच नाही, त्यावर देखील यावेळी मेधा कुलकर्णी यांनी उत्तर दिले आहे, त्यांनी त्यांच्या प्रिय व्यक्तीला स्मरून सांगावे की अभिमन्यू पवार हे वाक्य बोलले की नाही, असेही यावेळी मेधा कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

### एनडीए सरकारच्या मंत्रिमंडळात

त्यांना शिक्षण मंत्रालयाची जबाबदारी देण्याची शक्यता आहे. मनोहर लाल खट्टर यांच्याकडून उर्जा मंत्रालयाचा कारभार काढला जाउ शकतो. एखाद्या नव्या मंत्र्याला ही जबाबदारी मिळेल. शहरी विकास मंत्रालय त्यांच्याकडे कायम राहण्याची शक्यता आहे.

अकोला । वाशिम । बुलडाणा

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

■ शनिवार, २७ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# ‘मॉडिफिकेशन’च्या नावाखाली महावितरणात बदलीचा खेळ?

## अकोला मंडळातील सहाय्यक अभियंत्यांच्या बदली प्रक्रियेवर गंभीर संशय

■ प्रतिनिधी | अकोला ■

*राज्य शासन भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक आणि नियमाधारित प्रशासनाचा पुरस्कार करत असताना, महावितरणच्या अकोला मंडळातील सहाय्यक अभियंत्यांच्या बदली प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अधिकृत बदली आदेश निर्गमित झाल्यानंतर काही अधिकाऱ्यांना ‘मॉडिफिकेशन’च्या नावाखाली नियमबाह्य पद्धतीने लाभ देण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, संपूर्ण प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. या प्रकरणात आर्थिक देवाणघेवाणीचाही गंभीर संशय व्यक्त होत असल्याने विधान परिषद सदस्य आ. धर्मगुरु बाबुसिंग महाराज (राठोड) यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे उच्चस्तरीय आणि स्वतंत्र चौकशीची मागणी केली आहे.*

### विधान परिषद सदस्य आ. धर्मगुरु बाबुसिंग महाराज (राठोड) यांची मुख्यमंत्र्यांकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**“ प्रतीक्षा यादीतील अधिकाऱ्यांवर अन्याय?**

तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, बदली प्रक्रियेत प्रतीक्षा यादीतील पात्र अधिकाऱ्यांच्या हक्कांचा विचार झाला की नाही, हा देखील गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. बदली धोरणात समान संधी आणि गुणवत्ता या तत्त्वांचा अवलंब अपेक्षित असताना काही निवडक अधिकाऱ्यांनाच लाभ मिळाल्याची भावना कर्मचारी वर्गात निर्माण झाली आहे. त्यामुळे महावितरणच्या अंतर्गत प्रशासनातील पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**“ बदली आदेश, पण रुजूच नाहीत; कारवाईही नाही!**

या प्रकरणातील आणखी धक्कादायक बाब म्हणजे, बदली आदेश निर्गमित होऊनही अकोला झोनमधील अनेक अधिकारी अद्याप नियोजित ठिकाणी रुजू झालेले नाहीत. शासकीय नियमांनुसार अशा अधिकाऱ्यांवर तात्काळ प्रशासकीय कारवाई अपेक्षित असते. मात्र या प्रकरणात कारवाईचा अभाव दिसून येत असून, उलट काहींना ‘मॉडिफिकेशन’च्या माध्यमातून मूळ आदेशांमध्ये बदल करून लाभ देण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे नियम सर्वांसाठी समान आहेत की काहींसाठी वेगळे? असा सवाल उपस्थित होत आहे.

**“ ‘मॉडिफिकेशन’मागे आर्थिक व्यवहारांचा संशय**

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे बदली आदेशांमध्ये बदल करून घेण्यासाठी आर्थिक देवाणघेवाण झाल्याची कर्मचारी वर्गात सुरू असलेली चर्चा. निवेदनात कोणावर थेट आरोप करण्यात आलेला नसला तरी या चर्चेची सत्यता स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशीतून समोर यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जर या संशयात तथ्य आढळले, तर तो केवळ महावितरणपुरता मर्यादित न राहता राज्यातील प्रशासनिक व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रकार ठरेल.

**“ ‘सुशासन’च्या दाव्यापुढे मोठे आव्हान**

राज्य शासन भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाचा दावा करत असताना महावितरणसारख्या महत्त्वाच्या सार्वजनिक उपक्रमातच बदली प्रक्रियेवर गंभीर संशय व्यक्त होणे ही चिंतेची बाब मानली जात आहे. विशेषतः अंतिम आदेशानंतर होणारे फेरबदल, त्यामागील कथित अपारदर्शकता, आदेशाची अंमलबजावणी न होणे आणि आर्थिक व्यवहारांच्या चर्चेमुळे संपूर्ण यंत्रणेची विश्वासार्हता धोक्यात आल्याची भावना व्यक्त होत आहे. आता या गंभीर प्रकरणाची मुख्यमंत्री कोणत्या स्तरावर दखल घेतात, स्वतंत्र चौकशीचे आदेश देतात का, नियमबाह्य ‘मॉडिफिकेशन’मागील सत्य बाहेर येते का याकडे महावितरणमधील अधिकारी-कर्मचारी तसेच संपूर्ण प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

महावितरणमध्ये बदली प्रक्रिया ही निश्चित धोरण, सेवा नियम आणि प्रशासकीय निकषांच्या आधारे पार पडणे अपेक्षित असते. मात्र अकोला मंडळात या प्रक्रियेलाच हरताळ फासल्याचे चित्र समोर येत आहे. सक्षम प्राधिकाऱ्यांनी मंजूर केलेले अंतिम बदली आदेश जाहीर झाल्यानंतर काही निवडक अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये ‘मॉडिफिकेशन’च्या माध्यमातून फेरफार करण्यात आल्याचा आरोप आहे. हे फेरबदल कोणत्या निकषांवर, कोणत्या कारणास्तव आणि कोणत्या अधिकाराच्या आधारे करण्यात आले, याबाबत पारदर्शकता दिसून येत नसल्याने प्रक्रिया संशयास्पद ठरत आहे. याबाबत महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी प्रतिक्रिया घेण्याकरिता संपर्क साधला असता, होऊ शकला नाही.

### मुख्यमंत्र्यांकडे सहा ठोस मागण्या

आ. धर्मगुरु बाबुसिंग महाराज (राठोड) यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविलेल्या निवेदनात पुढील मागण्या केल्या आहेत.

- संपूर्ण बदली प्रक्रियेची उच्चस्तरीय व स्वतंत्र चौकशी करण्यात यावी.
- अकोला मंडळातील सर्व ‘मॉडिफिकेशन’ आदेशांची वैधता व कारणांची तपासणी करावी.
- बदली आदेश असूनही रुजू न झालेल्या अधिकाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी.
- आर्थिक देवाणघेवाणीच्या संशयाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर शिस्तभंग व कायदेशीर कारवाई करावी.
- नियमबाह्य ‘मॉडिफिकेशन’ आदेश रद्द करून पात्र अधिकाऱ्यांना न्याय द्यावा.
- स्वतंत्र व्हिजिलन्स यंत्रणा किंवा सक्षम समितीमार्फत संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी.

## टेट परीक्षेसाठी वाशिम जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने रविवार, २८ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टेट) २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्हादंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी हा आदेश जारी केला आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद वाशिम यांच्या प्रस्तावानुसार परीक्षा केंद्रांवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, परीक्षा प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ न देणे तसेच गैरप्रकारांना आळा घालणे या उद्देशाने हे आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांची यादी टेट परीक्षा वाशिम जिल्ह्यातील खालील २६ केंद्रांवर आयोजित करण्यात आली आहे : शिवाजी विद्यालय, वाशिम – पाटणी चौक रोड, वाशिम आर. ए. कॉलेज, वाशिम – काटा रोड, वाशिम मुलीबाई चरखा इंग्लिश स्कूल, वाशिम – लाखाळा, रिसोड रोड, वाशिम राणी लक्ष्मीबाई कन्या विद्यालय, वाशिम – डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, वाशिम यशवंतराव चव्हाण विद्यालय, मंगरुळपीर – बसस्थानकाजवळ, मंगरुळपीर बाकलीवाल विद्यालय, वाशिम – गोपाल टॉकीजजवळ, वाशिम श्री लालबहादूर विद्यालय, काटा – ता. जि. वाशिम सौ. सुशिलाताई जाधव हायस्कूल, वाशिम – लाखाळा, सोनखास रोड, वाशिम आदींवर राहणार आहे.

# मुंबईतून चार अल्पवयीन मुलांचा शोध

## वाशिम ग्रामीण पोलिसांची धाडसी व तत्पर कारवाई

■ प्रतिनिधी | वाशिम ■

*मागील काही दिवसांपासून वाशिम जिल्ह्यात हरविलेल्या, अपहरण झालेल्या तसेच घर सोडून निघून गेलेल्या अल्पवयीन मुलांचा शोध घेण्यासाठी जिल्हा पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत वाशिम ग्रामीण पोलिसांनी अत्यंत तत्परता आणि तांत्रिक कौशल्याचा वापर करून घरातून निघून गेलेल्या चार अल्पवयीन मुलांचा मुंबईत शोध घेत त्यांना सुखरूप ताब्यात आणण्यात यश मिळविले आहे.*

ग्राम वांगी, मोहजा आणि मालेगाव परिसरातील चार अल्पवयीन मुले एकाच वेळी बेपत्ता झाल्याने परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. या मुलांना कोणीतरी फूस लावून पळवून नेल्याची तक्रार वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात प्राप्त झाल्यानंतर अप. क्र. ३३३/२०२६ अन्वये कलम १३७(२), भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलीस निरीक्षक श्रीदेवी पाटील यांनी विविध स्तरांवर तपासाची चक्रे फिरवली. गुप्त बातमीदारांकडून चारही मुले मुंबई येथे असल्याची महत्त्वपूर्ण माहिती मिळाल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक लालमणी श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखाली विशेष शोध पथक तातडीने मुंबईकडे रवाना करण्यात आले.

मुंबईसारख्या प्रचंड गर्दीच्या शहरात दोन दिवस सातत्याने शोधमोहीम राबविण्यात आली. तांत्रिक विश्लेषण व सायबर माहितीच्या आधारे मस्जिद रेल्वे स्थानक परिसरात मुलांचा माग काढण्यात आला. पोलिसांनी तत्काळ परिसरात शोध घेतला असता चारही अल्पवयीन मुले सुखरूप आढळून आली. त्यानंतर त्यांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. प्राथमिक चौकशीत मुलांनी कोणाच्याही फसवणुकीला बळी न पडता मुंबई फिरण्यासाठी घरातून निघाल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी सर्व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून चारही मुलांना सुरक्षितपणे वाशिम येथे आणले. त्यांच्या पालकांना पोलीस ठाण्यात बोलावून मुलांचा ताबा सुपूर्द करण्यात आला. आपल्या मुलांना सुखरूप परत मिळाल्याने पालकांनी भावूक होत वाशिम ग्रामीण पोलिसांचे मनःपूर्वक आभार मानले तसेच पोलिसांच्या तत्पर, संवेदनशील आणि जबाबदार कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्या देखरेखीखाली तसेच पोलीस निरीक्षक श्रीदेवी पाटील यांच्या नेतृत्वात पार पडली. या शोध मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक लालमणी श्रीवास्तव, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रविण राऊत, उमाकांत केदारे, स्थानिक गुन्हे शाखेचे विठ्ठल महाल्ले, सचिन देशमुख, जगदीश राजुरकर तसेच सायबर सेलच्या महिला पोलीस अंमलदार मेघा मनवर यांनी विशेष परिश्रम घेतले. वाशिम ग्रामीण पोलिसांच्या या कार्यक्षम, संयमी आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम कारवाईमुळे चारही अल्पवयीन मुलांना कोणतीही हानी न होता त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात यश आले.

## जवाहर नवोदय विद्यालयात अकरावी विज्ञान शाखेसाठी प्रवेश सुरू



■ प्रतिनिधी | वाशिम ■

केंद्र शासनाच्या वतीने संचालित असलेल्या जवाहर नवोदय विद्यालय, वाशिम येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता अकरावी विज्ञान शाखेतील रिक्त जागांवर प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी ३० जून २०२६ पर्यंत प्रवेश अर्ज सादर करावेत, असे आवाहन विद्यालय प्रशासनाने केले आहे.

सीबीएसई, नवी दिल्ली मंडळाशी संलग्न असलेल्या या निवासी विद्यालयात मुला-मुलींना दर्जेदार सहशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. प्रवेशासाठी विद्यार्थ्याने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता दहावी किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण केलेली असावी. तसेच गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये स्वतंत्रपणे किमान ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविलेले असणे आवश्यक आहे. अर्जदार विद्यार्थी वाशिम जिल्ह्यातील मान्यताप्राप्त माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक विद्यालयातून इयत्ता दहावी उत्तीर्ण झालेला असावा. सीबीएसई मंडळाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रवेश अर्ज नवोदय विद्यालय समितीच्या संकेतस्थळावरून डाउनलोड करून पूर्ण भरावेत.

## विद्याभारती शाळेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील विद्याभारती प्राथमिक व माध्यमिक शाळेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १५२ वी जयंती तसेच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात दोन्ही महापुरुषांच्या विचारांचा जागर करून विद्यार्थ्यांना सामाजिक समता, शिक्षण, स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा आणि कर्तव्यपरायणतेचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक भीमरावजी गंगावणे, संचालक सुमित सुरेशराव मिटकरी, मुख्याध्यापक नितेश मिटकरी तसेच पर्यवेक्षक विजय गोटे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण, सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि बहुजन कल्याणासाठी केलेल्या ऐतिहासिक कार्याचा तसेच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांनी धर्म, स्वराज्य आणि राष्ट्ररक्षणासाठी दिलेल्या अतुलनीय बलिदानाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी या महान विभूतींचे विचार आत्मसात करून जीवनात प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी व राष्ट्रप्रेम जोपासावे, असे आवाहनही करण्यात आले.

## वाशीम ते पंढरपूर पदयात्रा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम ते पंढरपूर श्री बालाजी रथ व पदयात्रेचे आयोजन २ जुलै ते २५ जुलै दरम्यान सेवक पंकज बालाजी देव यांच्या नेतृत्वात करण्यात आले आहे. या पदयात्रेत शहरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



सदर यात्रा वाशीम येथून २ जुलै रोजी वाशीम येथून प्रस्थान करणार आहे. २ जुलै रोजी कन्हेरगाव येथे मुक्काम, ३ जुलै रोजी भिर्डा, ४ जुलै रोजी हिंगोली, ५ जुलै रोजी औंढा, ६ जुलै रोजी जवळाबाजार, ७ जुलै रोजी नांदगाव खुर्द, ८ जुलै रोजी परभणी, ९ जुलै रोजी सिंगनापूर, १० जुलै रोजी दैठाणा, ११ जुलै रोजी गंगाखेड, १२ जुलै रोजी परळी, १३ जुलै रोजी अंबेजोगाई, १४ जुलै रोजी बोरी सावरगाव, १५ जुलै रोजी कळंब, १६ जुलै रोजी कनेरवाडी, १७ जुलै रोजी पाथरी, १८ जुलै रोजी बार्शी, १९ जुलै रोजी रिधोरे, २० जुलै रोजी कुर्डवाडी, २१ जुलै रोजी आष्टी, २२ जुलै रोजी पंढरपुर, २३ जुलै रोजी पंढरपूर, येथे मुक्काम व २६ जुलै रोजी काल्याचे किर्तन होणार आहे. तरी सक्त भक्तगणांनी या पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## राष्ट्रीय स्तरावरील तीर्थंकर ऋषभदेव आलेख स्पर्धेत पवन उखळकर यांना तृतीय क्रमांक

■ प्रतिनिधी | कारंजा ■

अखिल भारत वर्षीय धर्म जागृती संस्थान युवा प्रकोष्ठ, दिल्ली यांच्या वतीने जैन आचार्य श्री वसुनंदीजी महाराज यांच्या मंगल आशीर्वादाने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील ’तीर्थंकर ऋषभदेव आलेख (निबंध) स्पर्धेत’ कारंजा लाड येथील श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम हायस्कूलचे सहाय्यक शिक्षक पवन उखळकर यांनी देशभरातून तृतीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे कारंजा शहरासह विदर्भाचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल झाले आहे.



भगवान ऋषभदेव यांच्या जीवनकार्य, मानवकल्याणासाठीचे योगदान, अहिंसेचा संदेश, नारीशक्तीचा गौरव, भारतीय संस्कृतीवरील त्यांचा प्रभाव आदी विविध विषयांवर आधारित या राष्ट्रीय स्पर्धेत देशातील विविध राज्यांमधून सुमारे सहाशेहून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. अत्यंत चुरशीच्या आणि उच्च दर्जाच्या या स्पर्धेत पवन उखळकर यांनी आपल्या प्रभावी लेखनशैली, सखोल अभ्यास आणि विषयावरील प्रभुत्वाच्या जोरावर भारतातून तृतीय क्रमांक प्राप्त केला. या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांना २१ हजार रुपये रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## पतंजली परिवाराचा आंतरराष्ट्रीय योग दिन संपन्न

**अकोला :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पतंजली परिवारातर्फे जिल्हाभर विविध ठिकाणी योग कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांमुळे तसेच भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या पुढाकाराने सन २०१५ पासून सुरू झालेला आंतरराष्ट्रीय योग दिन संपूर्ण जगभर उत्साहात साजरा झाला. यावर्षी योग दिनाच्या १२ वर्षांच्या निमित्ताने पतंजली परिवाराने हरिद्वार येथून निश्चित करण्यात आलेल्या ४५ मिनिटांच्या योग प्रोटोकॉलनुसार विविध कार्यक्रम आयोजित केले. अकोला, मूर्तिजापूर, बाळापूर पातुर आणि अकोट तेल्हारा सह विविध शहरांमध्ये हरिद्वार मान्यता प्राप्त योग शिक्षकांनी नागरिकांना मोफत योग प्रशिक्षण दिले. जिल्ह्यात शेकडो ठिकाणी झालेल्या या कार्यक्रमां मध्ये मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेत योगाचा लाभ घेतला.अकोला येथे पतंजली परिवार आणि प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात भव्य योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पतंजली जिल्हा प्रभारी डॉ. सुहास कांटे, भारत स्वाभिमान अध्यक्ष हरीश माखीजा, पतंजली सह-जिल्हा प्रभारी हरीश पारवानी तसेच योग शिक्षिका डॉ. सुनीता कावड़े यांनी हजारो नागरिकांना योगाभ्यासाचे मार्गदर्शन केले. या शिवाय तिलक पार्क योगा ग्रुपच्या सदस्यांनी आकर्षक योगनृत्य सादर केले. या कार्यक्रमात डॉ. सुनीता कावड़े, क्षितिजा वडी, कल्पना गायकवाड, सीमा फडणीस, सतीश फडणीस, मीना थोटे, दीपिका भाटिया, समृद्धी शिरवळकर आदींनी नोंदविला.

# डायल ११२ च्या तत्परतेने दोन दिवसांत १.३० लाखांची रोख रक्कम परत

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

वाशिम जिल्हा पोलीस दलाच्या डायल ११२ आपत्कालीन सेवा पथकाने दाखविलेल्या तत्परता, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीमुळे एका नागरिकाचे तब्बल १ लाख ३० हजारांचे आर्थिक नुकसान टळले. समृद्धी महामार्गावरील पेट्रोल पंपावर विसरलेली रोख रकमेची बॅग अवघ्या दोन दिवसांत शोधून तिच्यासह संपूर्ण रक्कम मूळ मालकाच्या ताब्यात देण्यात आल्याने मालेगाव पोलिसांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दि. २४ जून रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास डायल ११२ नियंत्रण कक्षाला समृद्धी महामार्गावरील एका पेट्रोल पंपावर रोख रक्कम असलेली बॅग विसरल्याचा आपत्कालीन कॉल प्राप्त झाला. कॉल करणारे मनोज जगदीश मुजुमदार (रा. नेवासा, जि. अहमदनगर) यांनी बॅगेत सुमारे ?१.३० लाखांची रोख रक्कम असल्याची माहिती दिली.



माहिती मिळताच मालेगाव पोलीस ठाण्यातील डायल ११२ पथकावरील पोहेका सुखनंदन तांबारे यांनी पोलीस निरीक्षक राजेश खेरडे यांना घटनेची माहिती देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने शोधमोहीम सुरू केली. त्यानंतर पोहेका तांबारे व चालक पोलीस कॉन्स्टेबल पवन भालेराव यांनी समृद्धी महामार्गावरील चॅनल क्रमांक २३१ जवळील संबंधित पेट्रोल पंपावर धाव घेतली.

शोधादरम्यान संबंधित बॅग पेट्रोल पंपाच्या कार्यालयात सुरक्षित ठेवलेली आढळून आली. पंचांसमक्ष बॅग उघडून तपासणी केली असता त्यामध्ये ?१ लाख ३० हजारांची रोख रक्कम सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले.

यानंतर पोलिसांनी मनोज मुजुमदार यांच्याशी संपर्क साधून रकमेची खात्री केली. दुसऱ्या दिवशी येणे शक्य नसल्याने त्यांनी २६ जून रोजी मालेगाव पोलीस ठाण्यात येऊन रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली. तोपर्यंत पोलिसांनी संपूर्ण रक्कम पोलीस ठाण्यात सुरक्षित ठेवली.

दि. २६ जून रोजी मनोज मुजुमदार पोलीस ठाण्यात हजर झाल्यानंतर त्यांची ओळख पडताळून आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आणि ?१.३० लाखांची रोख रक्कम त्यांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आली.

रक्कम सुरक्षित परत मिळाल्यानंतर मनोज मुजुमदार यांनी डायल ११२ पथक, पोलीस निरीक्षक राजेश खेरडे, पोहेका सुखनंदन तांबारे, पोलीस कॉन्स्टेबल पवन भालेराव तसेच संपूर्ण वाशिम पोलीस दलाचे मनःपूर्वक आभार मानले. ’पोलिसांच्या तत्परतेमुळे माझे मोठे आर्थिक नुकसान टळले. पोलीस हे खऱ्या अर्थाने नागरिकांचे मित्र आहेत,’ अशा शब्दांत त्यांनी भावना व्यक्त केल्या.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २१० ■ शनिवार, २७ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

### नेत्रा'ला अभय कुणाचे

# वर्ध्यात 'नेत्रा आय'ची सातमजली इमारत वादाच्या भोवऱ्यात

## परवानगी नाकारली, तरी टोलेजंग इमारत उभी : पालिकेच्या भूमिकेवर संशयाचे सावट

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरात सर्वसामान्यांच्या घरांवर आणि छोट्या व्यावसायिकांच्या दुकानांवर नियमांचा बडगा उगारणारे नगर परिषद प्रशासन आता स्वतःच संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. कारण, बॅचलर रोडवरील इंदिरा मार्केटजवळ उभारण्यात आलेल्या नेत्रा आय हॉस्पिटल'च्या सातमजली इमारतीला नगर परिषदेने तब्बल १२ गंभीर त्रुटी दाखवत बांधकाम परवानगी नाकारली, तरीही कोट्यवधी रुपयांची इमारत पूर्ण उभी राहिली. त्यामुळे 'नियम फक्त सर्वसामान्यांसाठीच का असा प्रश्न शहरभरातून उपस्थित होत आहे.

नगर परिषद प्रशासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम १८, ४५ व ६९ अंतर्गत या इमारतीचा प्रस्ताव फेटाळला होता. मात्र, परवानगीच नसताना भूतळ, तळमजल्यासह तब्बल सात मजल्यांचे बांधकाम पूर्ण झाले. बांधकाम सुरू असताना पालिका प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने या संपूर्ण प्रकरणात 'अर्थपूर्ण व्यवहार' झाल्याची चर्चा आता उघडपणे रंगू लागली आहे.

विशेष म्हणजे, २४.४६ मीटर उंचीची ही इमारत विशेष श्रेणीत मोडत असतानाही अग्निशमन वाहनाला आत प्रवेश करण्यासाठी आवश्यक जागाच सोडण्यात आलेली नसल्याचा ठपका नगर परिषदेनेच ठेवला आहे. भविष्यात आग किंवा अन्य आपत्कालीन घटना घडल्यास रुग्ण, त्यांचे नातेवाईक, डॉक्टर आणि कर्मचारी यांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे हा केवळ बांधकाम नियमभंग नसून नागरिकांच्या सुरक्षेशी केलेला खेळ असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या इमारतीत नेत्ररोग, त्वचारोग तज्ज्ञ, मेडिकल स्टोअर्स, ऑप्टिकल्ससह विविध व्यावसायिक दालने सुरू आहेत. रोज शेकडो रुग्ण आणि नागरिक येथे ये-जा करतात. अशा परिस्थितीत सुरक्षिततेच्या मूलभूत निकषांनाच हरताळ फासण्यात आल्याचा आरोप होत आहे.

या इमारतीचे वास्तूविशारद अनुराग पशिने यांच्या देखरेखीत बांधकाम झाल्याचे नोंदीत आहे. त्यांची भूमिका जाणून घेण्यासाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे समोर



आले आहे. दुसरीकडे, संबंधित प्रकरण सध्या नागपूर येथील सहसंचालकांकडे सुधारित परवानगीसाठी प्रलंबित असल्याची माहिती नगररचना विभागाच्या प्रमुख भाग्यश्री बोरकर यांनी दिली आहे.

मात्र, खरा प्रश्न वेगळाच आहे. परवानगी नसताना सात मजली इमारत उभी राहत असताना नगर परिषद झोपली होती का बांधकामाचा प्रत्येक टप्पा प्रशासनाच्या नजरेआड कसा गेला नियम मोडले जात असताना नोटिसा, कारवाई किंवा बांधकाम थांबविण्याची जबाबदारी कुणी पार पाडली नाही की सर्व काही जाणूनबुजून दुर्लक्षित करण्यात आले अशा अनेक प्रश्नांनी हे प्रकरण अधिकच गडद झाले आहे.

नगरपालिका वर्तुळातही मोठ्या बांधकामांच्या प्रस्तावांमागे कोणत्या अधिकाऱ्यांचे आशीर्वाद आणि कोणते व्यवहार दडले आहेत, याची चौकशी व्हावी, अशी जोरदार मागणी होत आहे. गेल्या काही वर्षांत मंजूर नकाशे आणि प्रत्यक्ष उभ्या राहिलेल्या इमारती यांची स्वतंत्र पडताळणी करण्याची वेळ आता आली असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत. वर्ध्यातील हा प्रकार केवळ एका इमारतीपुरता मर्यादित नाही; तर तो प्रशासनातील शिथिलता, नियमांची पायमल्ली आणि नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेल्या धोकादायक खेळाचे प्रतीक ठरत आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता शहरातून जोर धरू लागली आहे. अन्यथा 'नियम' हा शब्द केवळ सामान्य नागरिकांसाठीच राखीव असल्याचा संदेश प्रशासन स्वतःच देत असल्याची भावना अधिक तीव्र होईल.

### नगरपालिका पाडणार की तारणार

नगर परिषदेने स्वतःच बांधकाम प्रस्ताव नाकारला आहे. अशा परिस्थितीत नियमांनुसार पुढील पाऊल काय असणार अनधिकृत बांधकामावर पाडकामाची नोटीस बजावली जाणार, की सुधारित परवानगीच्या नावाखाली इमारतीला कायदेशीर संरक्षण मिळणार याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### नियम' सर्वांसाठी समान की बड्यांसाठी वेगळे

लहान व्यावसायिकांवर अतिक्रमणविरोधी कारवाई करणारी नगरपालिका कोट्यवधींच्या बहुमजली इमारतीबाबत मात्र मवाळ का राहिली नियम सर्वांसाठी समान आहेत की प्रभावशालींसाठी वेगळे, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

# देवळी पोलिसांचा गुटखा माफियांवर धडक छापा

## ३२ हजारांचा प्रतिबंधित तंबाखूचा साठा जप्त

**देवळी जनमाध्यम :** सार्वजनिक आरोग्यास घातक ठरणाऱ्या प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात देवळी पोलिसांनी धडक कारवाई करत वायगाव (निपाणी) येथे छापा टाकून ३२ हजार ८२६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तंबाखू पुरवठा साखळीचा तपास सुरू आहे.



देवळी पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे देशमुख लेआऊट, वार्ड क्र. ५, वायगाव (निपाणी) येथील सतीश गंगाधर नांदे यांच्या घरावर छापा टाकण्यात आला. घरझडतीदरम्यान महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित तंबाखू, गुटखा, पान मसाला व इतर तंबाखूजन्य पदार्थांचा मोठा साठा पोलिसांनी हस्तगत केला.

कारवाईत जनम सुगंधित तंबाखूची ५० पॅकेट, भाग्य गुटख्याची ३६३ पॅकेट, रत्ना तंबाखूचे १० टिन तसेच ५०० ग्रॅम खर्रा असा एकूण ३२ हजार ८२६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्राथमिक चौकशीत हा माल अवैध विक्री व वितरणासाठी साठवून ठेवण्यात आल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ तसेच भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २२३, २७४ व २७५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या अवैध व्यवसायामागील पुरवठादार, वितरक व इतर संबंधितांचा शोध पोलीस घेत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशीव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी वंदना कारखेले यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार संदीप कापडे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश दरवरे, पोलीस कर्मचारी गणेश बावणे, पंकज चामचोर, अमित पटले तसेच अन्न सुरक्षा विभागाचे अधिकारी टोपले व त्यांच्या सहकाऱ्यांनी संयुक्तरीत्या पार पाडली. नागरिकांनी प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री अथवा साठवणुकीची माहिती तातडीने पोलिसांना द्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# वाहतूक शिस्तीचा धडा, व्यसनमुक्तीचा संदेश; सेंट अँथोनी स्कूलमध्ये पोलिसांची जनजागृती

**वर्धा जनमाध्यम :** विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांचे पालन, रस्ते सुरक्षेची जाणीव आणि अमली पदार्थांविरोधात जनमत निर्माण करण्याच्या उद्देशाने वाहतूक नियंत्रण शाखा, वर्धा यांच्या वतीने सेंट अँथोनी स्कूल येथे जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच शालेय वाहन चालक-क्लिनर यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यशाळेत पोलीस निरीक्षक विलास पाटील व सहाय्यक फौजदार रियाज खान यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे महत्त्व समजावून सांगितले. दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर, सिग्नल व वाहतूक चिन्हांचे पालन, वेगमर्यादेचे भान आणि अपघात टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी ड्रग्ज फ्री वर्धा मोहिमेअंतर्गत विद्यार्थ्यांनी व युवकांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले. परिसरात अमली पदार्थांची विक्री, तंबाखू, गुटखा किंवा खर्रा विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यास त्वरित पोलिसांना कळविण्याचे आवाहनही करण्यात आले.

शालेय वाहन चालक व क्लिनर यांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या. वाहनांची नियमित फिटनेस तपासणी, चालकांचे वैद्यकीय परीक्षण, ओळखपत्र व ड्रेसकोड यांची अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला. तसेच शालेय वाहनांवर ११२, १०८ आणि १०९८ हे आपत्कालीन मदत क्रमांक दर्शनी भागावर नमूद करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अपघातमुक्त, व्यसनमुक्त आणि सुरक्षित वर्धा घडविण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घ्यावा, असा संदेश या जनजागृती कार्यक्रमातून देण्यात आला. विद्यार्थ्यांनीही वाहतूक शिस्त आणि व्यसनमुक्तीचा संकल्प करत कार्यक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला.

# शाहूंच्या विचारांचा जागर; पुलगावात सामाजिक न्याय दिनी शिक्षणाला मानवंदना

## गुणवंत व शासकीय सेवेत यशस्वी २५ युवकांचा गौरव

**पुलगाव जनमाध्यम :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुलगावात सामाजिक न्याय दिन उत्साहात साजरा झाला. सिद्धार्थ नवयुवक वाचनालय, आंबेडकर नगर आणि फुले-शाहू-आंबेडकर बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात शिक्षण, समता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.



यावेळी शाळेतील ५७ गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच दहावी-बारावी परीक्षेत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची प्रत देऊन गौरव करण्यात आला. स्थानिक वाचनालयातून अभ्यास करून शासकीय सेवेत रुजू झालेल्या २५ युवक-युवतींचाही विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमोद कळवले होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा श्रीमती ब्राम्हणकर, शिक्षण विभागाचे शरद चौगुले, माजी पोलीस अधिकारी धर्मेंद्र मानकर, काँग्रेसचे शहराध्यक्ष सुनील ब्राम्हणकर आणि संस्थेचे अध्यक्ष आकाश गौरखेडे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. मान्यवरांनी शाहू महाराजांच्या सामाजिक न्याय, शिक्षण आणि समतेच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन सुशील बांगर यांनी, तर आभार प्रदर्शन रवींद्र बोदिले यांनी केले. कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी व नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

# स्मार्ट मीटर अचूक बिलिंग आणि बचतीची संधी; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** वीज ग्राहकांना अधिक सक्षम, पारदर्शक आणि प्रगत सेवा देण्यासाठी महावितरणकडून स्मार्ट मीटर बसवण्याची मोहीम वेगाने राबवली जात आहे. वर्धा मंडळात आतापर्यंत १.४२ लाखांहून अधिक ग्राहकांकडे स्मार्ट मीटरची यशस्वी स्थापना करण्यात आली असून, या तंत्रज्ञानामुळे वीज बिलिंग प्रक्रियेत आमूलाग्र बदल होत आहेत.

स्मार्ट मीटरबाबत काही गैरसमज पसरले असले तरी, वस्तुस्थिती पाहता हे मीटर ग्राहकांच्या फायद्याचेच असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. स्मार्ट मीटरचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामुळे वीज वापराची अचूक आणि रिअल-टाइम माहिती उपलब्ध होते. मानवी हस्तक्षेप कमी झाल्यामुळे बिलिंग प्रक्रियेत पारदर्शकता आली असून, रीडिंगमधील मानवी चुकांना पूर्णपणे आळा बसला आहे. विशेष म्हणजे, दिवसा वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी हे मीटर अत्यंत फायदेशीर ठरत आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वीज वापरल्यास ग्राहकांना प्रति युनिट ८५ पैशांपर्यंत सवलत मिळू शकते, ज्यामुळे वीज बिलात मोठी बचत करणे शक्य होणार आहे.

स्मार्ट मीटरमुळे वीज बिल वाढते, या दाव्याचे महावितरणने खंडन केले आहे. उन्हाळ्याच्या काळात एसी, कुलर आणि पंख्यांचा वापर वाढल्यामुळे वीज वापर वाढतो आणि परिणामी बिल वाढते, याचा स्मार्ट मीटरच्या कार्यक्षमतेशी कोणताही संबंध नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, हे मीटर पूर्णपणे सुरक्षित असून, ते बीआयएस (घ्ए) मान्यताप्राप्त आणि एएमआय (ींइ) तंत्रज्ञानावर आधारित आहेत. सायबर सुरक्षेचे कडक नियम पाळून हे मीटर कार्यरत आहेत.

या मीटरसाठी ग्राहकांकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही, हे विशेष. सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या ग्राहकांनाही या मीटरमुळे वापराचे नेमके मोजमाप समजत असल्याने, सौर प्रकल्पाची क्षमता आणि प्रत्यक्ष वापर यांचा ताळमेळ राखणे सोपे झाले आहे.

कोणतीही अफवा न पसरवता ग्राहकांनी अधिकृत माहितीवर विश्वास ठेवावा आणि शंका असल्यास नजीकच्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन वर्धा मंडळाचे अधीक्षक अभियंता स्मिता पारखी यांनी केले आहे.

# उद्या शिवराज्याभिषेक आणि आजचे वर्तमान विषयावर सत्यशोधक कट्टयाचे आयोजन

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा फुले जयंती शताब्दी वर्ष उपक्रमांतर्गत सत्यशोधक समाज आणि समविचारी सामाजिक संघटना, वर्धा जिल्ह्याच्या वतीने सत्यशोधक कट्टा या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवराज्याभिषेक सोहळा, छत्रपती शाहू महाराज जयंती आणि आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त हा कार्यक्रम शिवराज्याभिषेक आणि आजचे वर्तमान' या विषयावर आयोजित करण्यात आला आहे.


या कार्यक्रमात रमेश बिजेकर (नागपूर) हे बीजभाषण करणार असून, प्रसिद्ध विचारवंत चंद्रकांत वानखेडे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुषार जोगी राहणार असून, बाबा बिडकर, सविता घोडे आणि संगीता वढे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे संचालन मा. कल्पना सातव - पुसाटे करणार आहेत.

हा कार्यक्रम रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता, हनुमान मंदिरासमोर, कुरंजेकर ले-आऊट, रेल्वे कॉलनी, सिंदी (मेघे), ता. वर्धा येथे होणार आहे.

आयोजकांनी समाजातील नागरिक, युवक, महिला आणि विचारप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# वरुणराजाची दमदार बॅटिंग; आष्टी तालुक्यात पावसाचा जल्लोष, पेरणीला वेग

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यात शुक्रवारी (दि. २६) वरुणराजाने दमदार हजेरी लावत शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला. गेल्या काही दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या बळीराजाच्या आशा अखेर पूर्ण झाल्या असून, धुव्वाधार पावसामुळे खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना वेग आला आहे.



तालुक्यातील वडाळा, बोरगाव, झाडगाव, टूमनीसह अनेक भागांत जोरदार पाऊस झाला. मुसळधार सरींमुळे शेततळे, नदी-नाले आणि ओढे तुडुंब भरले असून परिसराला नवसंजीवनी मिळाली आहे. काही भागात पावसाचे प्रमाण तुलनेने कमी असले, तरी एकूणच समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. बुधवारपासूनच अनेक शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली होती. मात्र, दि. २६ रोजी सायंकाळच्या सुमारास झालेल्या जोरदार पावसाने पेरणीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले. त्यामुळे आता उर्वरित क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर पेरणी होण्याची शक्यता आहे. दमदार पावसानंतर आष्टी शहरातील कृषी सेवा केंद्रांवर बियाणे व खत खरेदीसाठी शेतकऱ्यांनी मोठी गर्दी केली. यंदाचा खरीप हंगाम भरघोस होईल, अशी आशा बळीराजाने व्यक्त केली असून शेतीच्या कामांना आता खऱ्या अर्थाने गती मिळाली आहे.

वरुणराजाच्या या दमदार आगमनामुळे आष्टी तालुक्यातील शेतकरी सुखावला असून, शेतीसह ग्रामीण अर्थचक्रालाही नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र दिसून येत आहे.

# स्मार्ट मीटरचा फटका; विधवा महिलेची प्रशासनाकडे धाव

**हिंगणघाट जनमाध्यम :** हिंगणघाट येथील तेलीपुरा चौक, जुनी वस्ती परिसरातील विधवा मंगला प्रेमलाल जोशी यांनी स्मार्ट मीटरमुळे वीजबिलात प्रचंड वाढ झाल्याचा आरोप करत महावितरण प्रशासनाकडे जुने मीटर पुन्हा बसविण्याची मागणी केली आहे. या संदर्भात सहाय्यक अभियंत्यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी तीन दिवसांत कारवाई न झाल्यास टोकाचे पाऊल उचलण्याचा इशाराही दिल्याने खळबळ उडाली आहे.

जोशी यांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी साध्या मीटरवर त्यांना सुमारे ७२० रुपयांचे वीजबिल येत होते. मात्र, स्मार्ट मीटर बसविल्यानंतर घरात कोणतेही नवीन वीज उपकरण न वापरताही बिल थेट सुमारे २,३६० रुपयांवर पोहोचले. हलाखीच्या आर्थिक परिस्थितीत चार जणांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असताना एवढे वाढीव बिल भरणे अशक्य असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

स्मार्ट मीटर तातडीने काढून पूर्वीचे साधे मीटर बसवावे, अशी मागणी त्यांनी केली असून प्रशासनाने या तक्रारीची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी नागरिकांतूनही होत आहे. दरम्यान, निवेदनात टोकाचे पाऊल उचलण्याचा उल्लेख असल्याने प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित महिलेशी तातडीने संवाद साधून त्यांच्या अडचणीचे निराकरण करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वर्धेकरांची फरफट थांबणार : जिल्ह्यात नवी महसूल कार्यालये, सरकारी कामांना मिळणार वेग

### राज्य सरकारचा मोठा निर्णय; नागरिकांचा वेळ, पैसा आणि प्रवासाचा त्रास होणार कमी

**मुंबई/वर्धा जनमाध्यम :** राज्यातील लाखो नागरिकांना महसूल कार्यालयांच्या उंबरठ्यावर हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी राज्य सरकारने मोठा प्रशासकीय निर्णय घेतला आहे. राज्यातील २९ जिल्ह्यांमध्ये नवीन अप्पर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि अप्पर तहसीलदार कार्यालये स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून त्यासंदर्भातील अधिसूचना जारी करण्यात आली आहे. प्रस्तावांवर हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत.

लोकसंख्या वाढ, विस्तीर्ण भौगोलिक क्षेत्र, दुर्गम भागातील नागरिकांची गैरसोय आणि वाढता प्रशासकीय ताण लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. अनेक गावांतील नागरिकांना साध्या महसुली कामासाठीही जिल्हा किंवा उपविभागीय मुख्यालयापर्यंत तासन्तास प्रवास करावा लागत होता. आता ही फरफट थांबण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. नवीन कार्यालयांच्या स्थापनेसाठी लोकसंख्या, तालुक्यांची संख्या, क्षेत्रफळ, आदिवासी व दुर्गम भाग, जिल्हा मुख्यालयापासूनचे अंतर तसेच सर्वाधिक दूरच्या गावांपर्यंतचे अंतर अशा विविध निकषांचा विचार करण्यात आला आहे. त्यामुळे महसूल प्रशासन अधिक गतिमान, लोकाभिमुख आणि नागरिकांच्या दारात पोहोचेल , असा सरकारचा दावा आहे. लातूर, अकोला, वाशिम, वर्धा, भंडारा आणि गडचिरोली या २९ जिल्ह्यांतील नागरिकांना होणार आहे. महसूल कार्यालये जवळ आल्याने वेळ, पैसा आणि प्रवासाचा खर्च वाचणार असून शासकीय कामांना वेग येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
e paper www.janmadhyam.com



# व्हेनेझुएला भूकंपात आतापर्यंत 589 जण ठार

## 3000 जखमी; 39,000 जण बेपत्ता, ढिगा-यांतून येत आहेत आवाज











**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएला या देशात झालेल्या दोन भूकंपांमध्ये आतापर्यंत ५८९ लोकांचा मृत्यू झाल्याची आणि २,९८० जण जखमी झाल्याची पुष्टी झाली आहे. बुधवार, २५ जून रोजी, व्हेनेझुएलामध्ये १८२१ च्या काराबोबो युद्धाच्या स्मरणार्थ राष्ट्रीय सुट्टी होती. त्यामुळे, बहुतेक लोक घरात बसून फिफा विश्वचषक सामने पाहत होते. परिणामी, ढिगा-याखाली गाडल्या गेलेल्या लोकांची संख्या अधिक असण्याची शक्यता आहे.स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, ढिगा-याखालून आवाज ऐकू येत आहेत. सरकारने काल रात्री उशिरा जाहीर केले की, ३९,००० हून अधिक लोक बेपत्ता आहेत. भूकंपाच्या तीव्रतेचे खरे स्वरूप अद्याप स्पष्ट झालेले नाही. यूएस जिओलाजिकल सर्व्हेनुसार, भूकंपात १०,००० हून अधिक लोकांचा मृत्यू होण्याची ४४% शक्यता आहे. १,००,००० लोकांचा मृत्यू होण्याची ३०% शक्यता आहे. या आपत्तीमुळे व्हेनेझुएलाच्या अर्थव्यवस्थेला ९.५ ट्रिलियन रुपयांचे नुकसान होउ शकते. कार्यवाहक राष्ट्रपती डेल्सी राड्रिग्ज यांनी आणीबाणी जाहीर केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राड्रिग्ज यांच्याशी संवाद साधला असून मदतीचा हात पुढे केला आहे. व्हेनेझुएलामधील हा गेल्या १२६ वर्षांतील सर्वात मोठा भूकंप आहे. यापूर्वी १९०० मध्ये ७.७ तीव्रतेचा भूकंप आला होता. कार्यवाहक अध्यक्ष डेल्सी राड्रिग्ज यांनी राष्ट्रीय आणीबाणी घोषित केली.

व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्रपतींनी जगभरातील बचाव पथकांचे स्वागत केले.व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्रपती, डेल्सी राड्रिग्ज यांनी शुक्रवारी सांगितले, 'आम्ही ढिगा-याखाली अडकलेल्यांना बाहेर काढू. आम्ही या कामासाठी रात्रंदिवस प्रयत्न करत आहोत.'व्हेनेझुएलातील भूकंपातील मृतांचा आकडा ५८९ वर पोहोचला असून, २,९८० जण जखमी झाले आहेत, अशी घोषणा कार्यवाहक राष्ट्रपती डेल्सी राड्रिग्ज यांनी शुक्रवारी केली.राड्रिग्ज म्हणाल्या की, ला ग्वायरा राज्याला सर्वाधिक फटका बसला आहे. बचाव कार्याला गती देण्यासाठी आणि अन्न व पाणी पोहोचवण्यासाठी या भागात लष्कर तैनात करण्यात आले आहे.

**भारताकडून व्हेनेझुएलाला मदत सामग्री रवाना-** भूकंपग्रस्त व्हेनेझुएलाला मदत करण्यासाठी भारताने 'ऑपरेशन अमिस्ताद' सुरू केले आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी सांगितले की, भारतीय हवाई दलाची दोन 'सी-१७' (क-१७) विमाने व्हेनेझुएलासाठी रवाना झाली आहेत; या विमानांमधून भारतीय लष्कराचे 'फील्ड हास्पिटल' युनिट आणि ३५ टनांहून अधिक मदत सामग्री नेली जात आहे. या कठीण काळात भारत व्हेनेझुएलाच्या पाठीशी खंबीरपणे उभा असून, मदत आणि बचाव कार्यासाठी शक्य ती सर्व मदत पुरवण्यास कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**ढिगा-याखाली शेकडो लोक अडकल्याची भीती-** व्हेनेझुएलामध्ये भूकंपाने उद्ध्वस्त झालेल्या इमारतींच्या ढिगा-याखाली शेकडो लोक अडकल्याची भीती व्यक्तकेली जात आहे. आपत्तीग्रस्त भागात आंतरराष्ट्रीय बचाव पथके आणि मानवीय मदत पोहोचत असतानाच तेथे आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे.

**तुर्की व्हेनेझुएलाला बचाव पथके आणि मदत साहित्य पाठवणार-** तुर्कीच्या आपत्ती व्यवस्थापन संस्थेने जाहीर केले आहे की, व्हेनेझुएलामधील भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी ते दोन लष्करी विमाने पाठवणार आहेत. पहिल्या A-400M विमानातून ३८ सदस्यांचे शोध आणि बचाव पथक, मानवीय मदत कर्मचारी, पाच सदस्यांचे वैद्यकीय बचाव पथक, तुर्की रेड क्रिसेंटचे दोन सदस्य, दोन शोध-श्वान आणि पूर्ण सुसज्ज अशी तीन बचाव वाहने नेली जातील. दुस-या A-400M विमानातून २२ सदस्यांचे मानवीय मदत पथक आणि त्यांचे साहित्य नेले जाईल. AFAD च्या माहितीनुसार, ही दोन्ही विमाने शुक्रवारी स्थानिक वेळेनुसार सकाळी ११:१५ वाजता इस्तंबूल विमानतळावरून रवाना होणार आहेत. व्हेनेझुएलामधील 'बोका दे अरोआ' या किनारी शहरात भूकंपानंतर मदतकार्य सुरू आहे. 'वर्ल्ड सेंट्रल किचन' या मदतकार्य करणा-या संस्थेने माहिती दिली आहे की, त्यांच्या भागीदार रेस्टारंट्सनी बाधित लोकांना गरम जेवण पुरवले आहे. संस्थेने सोशल मीडियावर सांगितले की, भूकंपानंतर शहराचा वीजपुरवठा खंडित झाला असून अनेक घरे कोसळली आहेत. 'बोका दे अरोआ' हे शहर राजधानी 'काराकस'च्या पश्चिमेस सुमारे २२० किलोमीटर अंतरावर स्थित आहे.

## लोहगड केतन अग्रवाल प्रकरणात ॲड.निकमांची एंट्री



**मुंबई :** लोहगड येथे लोणावळा ग्रामीण परिसरात झालेल्या केतन अग्रवाल यांच्या दुर्दैवी हत्येच्या प्रकरणात केतन अग्रवाल यांचे वडिल विशाल अग्रवाल यांनी आज पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. आपल्या मुलाला न्याय मिळावा, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे केली. याप्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी कोणतीही कसूर ठेवली जाणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी त्यांना दिले. या प्रकरणात जलदगती न्यायालय आणि विशेष सरकारी वकिल म्हणून ऊज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची त्यांची मागणी सुद्धा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ मान्य केली आणि तसे निर्देश विधी व न्याय विभागाच्या सचिवांना दिले. ज्येष्ठ विधिज्ञ ऊज्वल निकम यांनीही या प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहण्यास संमती प्रदान केली आहे.लोहगड येथे लोणावळा ग्रामीण परिसरात झालेल्या केतन अग्रवाल यांच्या दुर्दैवी हत्येच्या प्रकरणात केतन अग्रवाल यांचे वडिल विशाल अग्रवाल यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून राज्यभरात खळबळ उडवून देणा-या लोहगड हत्या प्रकरणाने पुरुषांवरील अत्याचार किंवा हल्ल्यासंदर्भातील दुसरी बाजू समोर आल्याचे बोलले जात आहे. आपल्या प्रियकरासोबत कट रचून होणा-या नव-याला निर्दयीपणे संपवल्याच्या गुन्ह्यात आरोपी सिया आणि तिचा प्रियकर चेतनला पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी, पुणे पोलिसांनी कसून चौकशी सुरू केली असून दररोज नवनवीन खुलासे समोर येत आहेत. पोलिसांनी आता आपला मोर्चा आरोपी सिया गोयलच्या कुटुंबाकडे वळवला असून थेट सियाच्या भावाला चौकशीसाठी ताब्यात घेण्या आले आहे. दुसरीकडे आपल्या मुलाच्या न्यायासाठी अग्रवाल कुटुंबीय मुख्यमंत्र्यांकडे पोहोचले होते.

## चांगल्या घरातील मुलांमध्ये सूडबुद्धी का तयार होते?

**मुंबई :** लोहगडावरुन ढकलून हत्या करण्यात आलेल्या केतन अग्रवाल केस प्रकरणावर मुख्यमंत्र्यांनी भाष्य केले आहे. अशा शिकल्या सवरलेल्या, चांगल्या घरातील मुलांमध्ये सूडबुद्धी का तयार होते? यामागे सामाजिक अँगल तपासला पाहिजे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्र्यांनी दिली. त्याचवेळी नसरापूर प्रकरणात न्यायालयाने जलदगतीने तपास पूर्ण केला असून आरोपीला मृत्यूदंडाची शिक्षा होईल अशी अपेक्षाही व्यक्त केली.पुण्यातील लोहगड केसमध्ये केतन अग्रवाल याची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा ब?यफ्रेंड चेतन चौधरी यांनी हत्या केली. या घटनेमुळे महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणातील आरोपी सिया आणि चेतनला पोलिसांनी अटक केली आहे. लोहगड प्रकरणावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ही घटना खरोखरच अनाकलनीय



आहे. समाज म्हणून आपण कुठेतरी याचा विचार केला पाहिजे. शिकल्या सवरलेल्या, चांगल्या घरच्या मुलांमध्ये अशी सूडबुद्धी का तयार होते? यामागे गुन्हेगारीसोबतच सामाजिक अँगल तपासला गेला पाहिजे.नसरापूरमध्ये एका चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या केल्या प्रकरणात आरोपी भिमराव कांबळे याला न्यायालयाने दोषी ठरवलं आहे. येत्या २९ जून रोजी त्याला शिक्षा सुनावण्यात येणार आहे. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री म्हणाले की, नसरापूर प्रकरण हे दुर्मिळ प्रकरण असून दोषीला शिक्षा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी आम्ही केली आहे, ती न्यायालय मान्य करेल अशी आम्हाला अपेक्षा आहे. न्यायालयाने सुटीच्या काळातही ही केस सुरू चालवली आणि विक्रमी वेळेत निकाल दिला. या केसमुळे पुन्हा अशा घटना घडल्या तर त्यामध्ये जलदगतीने शिक्षा मिळेल, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

## आयोगाने कोणतेही एकतर्फी निर्णय घेऊ नये

**पुणे/प्रतिनिधी :**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएसी) परीक्षा ऑनलाइन घेण्याच्या निर्णायामुळे विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता आहे. मात्र आयोगाने कोणतेही एकतर्फी निर्णय घेउ नयेत. विद्यार्थ्यांबरोबर व्यापक चर्चा करूनच योग्य तो निर्णय घ्यावा अशी सूचना आयोगाच्या अध्यक्षांना केली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे शुक्रवारी दिली.

दरम्यान या प्रश्न राजकीय नाही. एमपीएसीच्या परीक्षांमध्ये मोठे बदल केले जाणार आहेत. ही स्पर्धा पारदर्शी आणि नियोजित वेळेत व्हावी यासाठी राज्य शासनाचे प्रयत्न आहेत. त्यामुळे या निर्णयावरून खासगी शिकवणी चालकांनी त्यासाठी विद्यार्थ्यांना वेठीस धरू नये असा इशाराही त्यांनी दिला. सारथीच्या वतीने यूपीएससी आणि एमपीएसी मधील यशस्वी विद्यार्थी आणि त्यांच्या पालक सत्कार समारंभात ते बोलत होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील महापौर मंजुशा नागपूरे यांच्यासग विविध प्रशासकीय अधिकारी सारथीचे अधिकारी आणि आमदार उपस्थित होते.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या



अध्यक्षांनी विविध स्पर्धा परीक्षा ऑनलाइन घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यावरून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांमध्ये अव्स्वस्थता आहे. यासंदर्भात आयोगाच्या अध्यक्षांबरोबर बोलणे झाले आहे. पुढील वर्षापासून नीट ची परीक्षा ही ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. एकतर्फी निर्णय संभ्रम निर्माण करतात तर चर्चेतून झालेले निर्णय विश्वासाचे आणि योग्य ठरतात. त्यामुळे एकतर्फी निर्णय घेउ नये असे अध्यक्षांना सांगितले आहे. ते चर्चा करूनच निर्णय घेतील असे फडणवीस यांनी सांगितले.

**परीक्षा पारदर्शकतेवर भर-** एमपीएससी परीक्षा पारदर्शी आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. त्यादृष्टीने काही निर्णय घेण्यात येतील असेही त्यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले मराठा समाजातील, तसेच विस्थापित आणि आर्थिक मागास वर्गातील युवक आणि युवतींना पुढे आणण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने बार्टीच्या धर्तीवर सारथी संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. अलीकडे एक समाज दुस-या समाजाबरोबर स्पर्धा करत असल्याचे चित्र दाखविले जात आहे. मात्र आपण सर्व शिवाजी महाराजांचे मावळे आहोत. छत्रपतींनी मावळ्यांना जातीत अडकविले नाही. याच शिकवणीनुसार प्रत्येक समाजासाठी सर्व काही केले जाईल. कोणत्या समाजाचे काही काढून दुस-या समाजाला दिले जाणार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## केतनला टक्कल; विग वापरत असल्याने दुरावा

**पुणे :** केतन अग्रवाल मृत्यू प्रकरणाच्या तपासात आता धक्कादायक बाबी समोर येत आहेत. आरोपी सिया गोयल हिला केतनसोबत लग्न करायचे नव्हते. केतनला टक्कल होते, तो डोक्यावर केसांचा विग वापरत असल्याचे सियाला खटकत होते आणि त्यातूनच दोघांमध्ये दुरावा निर्माण झाला होता. तपासानुसार, सिया गोयल आणि तिचा कथित प्रियकर चेतन चौधरी यांनी केतनची हत्या करण्याचा कट रचला. केतनला ट्रेकिंगची आवड असल्याची माहिती दोघांना होती. याच गोष्टीचा फायदा घेत त्याला एखाद्या किल्ल्यावर नेउन खोल दरीत ढकलून अपघाताचा बनाव करण्याचा कट आखण्यात आला. यासाठी लोहगड किल्ल्याची निवड करण्यात आली. आरोपींनी तीन वेळा किल्ल्यावर जाउन रेकी केल्याचे तपासातून समोर आले आहे. कोणत्या ठिकाणी खोल दरी आहे, कुठून ढकलल्यास अपघातासारखे भासेल, याची त्यांनी पाहणी केल्याचा पोलिसांचा दावा आहे. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, १४ जून रोजी केतन आणि सिया प्रथमच लोहगड किल्ल्यावर गेले होते. तेथे एका टोकावरून केतनला ढकलण्याचा कथित प्रयत्न झाला.

## राज ठाकरेंच्या घरी येऊन जैन समाजाने मागितली माफी

**मुंबई/प्रतिनिधी :** काही दिवसांपूर्वी मालाड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिरेटोपावर जैन समाजाचा झेंडा लावल्याची एक वादग्रस्त घटना घडली होती. या घटनेमुळे शिवप्रेमींमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात होता. या पार्श्वभूमीवर, मालाड येथील जैन समाजाच्या मुख्य पदाधिका-यांनी आणि शिष्टमंडळाने आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी भेट घेतली. घडलेल्या प्रकाराबाबत जैन समाजाच्या वतीने लेखी माफीनामा सुपूर्द करण्यात आला.



यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठी अस्मितेचा मान राखत, आपल्या खास शैलीत जैन समाजाच्या प्रतिनिधींना समज दिली. मुंबईत सध्या ठिकठिकाणी दुकानांच्या पाटया किंवा मराठी फलकांवर पांढरे पट्टे मारण्याचे प्रकार समोर येत आहेत. यामुळे जैन आणि मराठी समाजात विनाकारण वाद निर्माण होत आहेत. हे वाद तातडीने थांबले पाहिजे आणि मराठी अस्मितेचा आदर राखला गेलाच पाहिजे, अशा कडक शब्दांत राज ठाकरे यांनी जैन समाजाच्या शिष्टमंडळाला सुनावले आहे.

**जैन समाजाची मनापासून दिलगिरी-** जैन समाजाच्या प्रतिनिधींनी घडलेल्या घटनेबद्दल मनापासून दिलगिरी व्यक्त केली असून, कोणत्याही समाजाच्या किंवा छत्रपती शिवाजी महाराजांच्या अस्मितेला ठेच पोहोचवण्याचा आमचा हेतू नव्हता, असं स्पष्ट केलंय. तसेच, भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत आणि सामाजिक सलोखा राखला जाईल, अशी ग्वाही त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना दिली आहे.

## 'ऑपरेशन सिंदूर' मध्ये 6 जवान शहीद

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गेल्या वर्षी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पीओके आणि पाकिस्तानमध्ये घुसून दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते. यासाठी भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर राबवत पराक्रम गाजवला होता. पाकिस्तानला धडा शिकवणा-या या ऑपरेशन सिंदूर दरम्यान पराक्रमाची शर्थ करणा-या भारताच्या ६ जवानांना वीरमरण आले होते. आता या जवानांची नावे सरकारने पहिल्यांदाज अधिकृतपणे जाहीर केली आहेत. या शूरवीर जवानांच्या नावांचा समावेश समावेश राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या रोल ऑफ ऑनर्समध्ये करून ती दिल्लीतील स्मारकावर कोरण्यात आली आहेत. राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या २०२५ या विभागातील वाल ३डीवर या सहा वीर जवानांची नावे कोरण्यात आली आहेत. वीरमरण आलेल्या जवानांमध्ये लष्कर




आणि वायुसेनेच्या जवानांचा समावेश आहे. रायफलमन सुनील कुमार यांना मरणोत्तर वीर चक्र, तर सार्जंट सुरेंद्र कुमार यांना वायू सेना पदक देण्यात आले. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात २६ निष्पाप नागरिक ठार झाले होते. यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध भडकले होते. चार दिवस चाललेल्या या युद्धादरम्यान भारताचे किती नुकसान झाले हे समोर आले नव्हते. यावेळी राबवण्यात आलेल्या ऑपरेशन सिंदूर या मोहिमेतील शहीदांची नावे किंवा इतर माहिती जाहीर केली नव्हती. आता राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या संकेतस्थळावर आणि स्मारकावर या नावांचा समावेश केल्यामुळे या मोहिमेत बलिदान देणा-यांची ओळख देशसमोर आली आहे.

## राज्यात एफडीएचे महिनाभरात ९०४ छापे

**मुंबई :** महाराष्ट्रात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, भेसळयुक्त अन्नपदार्थ तसेच बेकायदेशीर औषध व्यवसायाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) महिनाभरात राज्यव्यापी धडक मोहीम राबवत ९०४ ठिकाणी छापे टाकले. यामध्ये ३४ कोटी ६६ लाख ९० हजार ६२४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ४५७ जणांना अटक करण्यात आली आहे. ३२२ आस्थापना सील करून ४२ वाहने जप्त करण्यात आली अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

तुकाराम मुंढे म्हणाले, २५ मे ते २४ जून २०२६ या कालावधीत मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर विभागात या कारवाया करण्यात आल्या. प्रतिबंधित गुटखा व पानमसाला विरोधातील मोहिमेत ४४६ आस्थापनांवर छापे टाकून ५ कोटी ५५ लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणांमध्ये ४५७ आरोपींना अटक करण्यात आली. याशिवाय भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांवर कारवाई करत एफडीएने ४४० आस्थापनांची तपासणी केली.



आंबे, बाटलीबंद पाणी, खवा, बेकरी पदार्थ, मसाले, खाद्यतेल, तूप, कुल्फी, फ्रोजन डेझर्ट यांसह विविध खाद्यपदार्थांचा २९ कोटी ११ लाख रुपयांचा आणि २२ लाख किलोहून अधिक साठा जप्त करण्यात आला असे तुकाराम मुंढे यांनी सांगितले.औषध विभागानेही मोठी कारवाई करत एका महिन्यात ५५ धाडी टाकल्या. औषधे, वैद्यकीय उपकरणे, सौंदर्यप्रसाधने आणि इतर उत्पादनांवर एकूण ५ कोटी ५२ लाख रुपयांची प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. दिशाभूल करणा-या औषध जाहिरातींवर ३१ कारवाया करण्यात आल्या, तर ९५ प्रकारच्या २९७ उत्पादनांवर नियामक कारवाई झाली असे मुंढे म्हणाले. पुणे मद्य विषबाधा प्रकरणाच्या तपासात भिवंडीतील पुरवठादाराकडून ५९२९ किलो मिथेनाल जप्त करण्यात आले. तसेच मुंबई, भिवंडी आणि पालघर येथे वैद्यकीय उपकरण नियमांचे उल्लंघन करणा-या आस्थापनांवर २ कोटी १७ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला. एफडीएने बोगस औषध व्यवसाय, बनावट औषधे, एनडीपीएस कायद्यांतर्गत औषधांचा गैरवापर, तसेच परवान्याविना औषध उत्पादन आणि विक्री याविरोधातही कठोर पावले उचलली. ९ एफआयआर दाखल करण्यात आले असून २ आरोपींना अटक करण्यात आली, असेही मुंढे यांनी सांगितले.

**नागरिकांना दर्जेदार उत्पादने देण्याला प्राधान्य-**महाराष्ट्रातील नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि कायदेशीर उत्पादने उपलब्ध करून देण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाची कठोर अंमलबजावणी सुरू राहील. सार्वजनिक आरोग्याशी तडजोड करणा-या कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी यावेळी दिला.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## संकटावर मात

संकटे येताना नेहमी एकदम येतात, तशीच जातानाही ती एकत्र जावीत ही प्रत्येकाची अपेक्षा असते.मार्च ते जून हा अत्यंत क्लेशदायक आणि चिंताजनक काळ अनुभवणाऱ्या प्रत्येक भारतीयाने याच अपेक्षेत १०० दिवसांचा टप्पा पार केला. एकीकडे प्रचंड उष्णता आणि 'अल निनो'मुळे वाढलेली मान्सूनची चिंता, तर दुसरीकडे इंधनटंचाईमुळे उद्‌भवलेले दैनंदिन जीवनातील प्रश्न, असा दुहेरी मारा सहन करत सर्वसामान्य मेटाकुटीला आले होते. एरव्ही जगात घडणाऱ्या घडामोडींशी आपला काय संबंध, असे मानून त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या गावखेड्यातल्या सामान्य माणसाचे 'होर्मुझ'शी संबंधित अमेरिका-इराण यांच्या नेत्यांकडून होणाऱ्या वक्तव्यांकडे लक्ष लागून राहिले होते. त्याचवेळी त्याची नजर आकाशाकडेही होती. चार दिवसांपूर्वी मान्सूनची बरसात सुरू झाली आणि पाठोपाठ आखातातील युद्धविराम टिकाऊ ठरणार असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे कच्च्या तेलाच्या दरामध्ये मोठी घसरणही सुरू झाली. भारतासाठी हा दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल. कारण, या दोन्ही घडामोडी भारतीय अर्थकारणापुढील अनेक चिंतांचे ओझे कमी करणाऱ्या आहेत. मान्सून हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला, तर इंधन हे अर्थव्यवस्थेचे वंगण आहे.या दोन्हींचा पुरवठा कमी झाल्यास भारताचे आर्थिक चक्र कोलमडते. इंधनाच्या पातळीवरील दिलासा सरकार, उद्योजक आणि सर्वसामान्यांसाठी अत्यंत मोलाचा आहे. गेल्या तीन महिन्यांचा कालखंड कच्च्या तेलाच्या दरातील विक्रमी घुसळणीसाठी ओळखला जाईलडोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानांमुळे या काळात एकाच दिवसातील ८०० ते १,२००अंकांपर्यंतचे चढ-उतार एमसीएक्स क्रूडमध्ये पाहायला मिळाले. कमोडिटी मार्केटमध्ये क्रूड ऑईलच्या क्षेत्रात ट्रेडिंग करणाऱ्या अनेकांनी लाखो रुपयांचा नफा मिळवला, तर अनेकांना मोठा फटकाही सहन करावा लागला. तथापि, ६० दिवसांचा शस्त्रसंधी करार हा विश्वासार्ह वाटू लागल्यामुळे तेल बाजारात घसरणीचे वारे वेगाने वाहत आहेत. होर्मुझमधून खनिज तेलाची वाहतूक सुरक्षितपणे सुरू झाल्याने या घसरणीला वेग आला आहे. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर हल्ला केल्यानंतर तेलाचे भाव प्रतिबॅरल १२० ते १२५ डॉलर्सवर गेले होते. आता ते थेट ७२ ते ७५ डॉलर्सवर आलेत. गेल्या आठवड्यात तेलाच्या किमतीत सुमारे ८ टक्क्यांची घसरण होऊन दर चार महिन्यांच्या नीचांकी पातळीवर आलेत. होर्मुझमध्ये अडकलेली सुमारे ५० लाख बॅरल्स कच्चे तेल वाहून नेणारी तीन मोठी जहाजे सुरक्षितपणे बाहेर पडली आहेत. ओमानने या व्यापारी मार्गावर कोणताही कर न लावता जहाजांच्या सुरक्षित प्रवासासाठी दोन स्वतंत्र मार्ग उपलब्ध करून दिले. आगामी काळातही इराण आणि ओमान यांच्याकडून या तेलवाहू जहाजांकडून करवसुली करण्यात येणार नाहीये. तेलपुरवठ्याबाबत निर्माण झालेली चिंता बऱ्याच अंशी दूर झाल्यामुळे विकसनशील, गरीब देशांच्या अर्थव्यवस्थांना दिलासा मिळणार आहे. अमेरिकेने इराणवरील आर्थिक निर्बंध उठवले. दीर्घकाळानंतर आता इराणचे तेल जागतिक बाजारात खळाळणार आहे. २१ ऑगस्टपर्यंत इराणला कच्चे तेल, पेट्रोलियम आणि पेट्रोकेमिकल उत्पादनांचे उत्पादन व आंतरराष्ट्रीय बाजारात विक्री करण्याची परवानगी मिळाली आहे. होर्मुझमधील सागरी वाहतूक सुरक्षित ठेवण्याच्या कराराचा हा एक भाग आहे. जागतिक तेल बाजारात इराणचे स्थान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. इराणकडे कच्च्या तेलाचा मोठा साठा असून तो 'ओपेक' या खनिज तेल उत्पादक देशांच्या संघटनेचा संस्थापक सदस्य आहे. इराणचे तेल मध्यम दर्जाचे सल्फरयुक्त असून आशियाई देशांमधील तेल शुद्धीकरण कारखान्यांसाठी तांत्रिकदृष्ट्या अत्यंत योग्य मानले जाते. एकेकाळी भारताला कच्चे तेल पुरवणारा इराण हा तिसरा सर्वात मोठा देश होता. २०१९ मध्ये अमेरिकेमुळे भारताला इराणकडून होणारी तेल आयात पूर्णपणे बंद करावी लागली. यानंतर रशिया आणि सौदी अरेबियावर भारताचे अवलंबित्व वाढले.आता इराणचे तेल पुन्हा भारताचे दार ठोठावते आहे. हे तेल भारतीय रिफायनरीजना प्रक्रिया करण्यासाठी सोपे आहे. तसेच, भौगोलिकदृष्ट्या इराण भारताच्या जवळ असल्याने वाहतुकीचा खर्चही कमी होतो. युद्धबंदीचा तात्पुरता निर्णय कायमस्वरूपी करारामध्ये बदलला, तर भारताला इराणच्या रूपाने एक विश्वासार्ह आणि स्वस्त तेलपुरवठादार पुन्हा मिळेल. यामुळे परकीय चलनाची मोठी बचत होईल आणि देशांतर्गत इंधनाचे दर नियंत्रणात ठेवण्यासही मोठी मदत होईल. तथापि, पश्चिम आशियातील बदलती समीकरणे पाहता, भारताला या व्यापारी संधीचा लाभ घेताना भूराजकीय पातळीवर संतुलन साधावे लागेल. कारण, सौदी अरेबिया व यूएई हे देश भारताला तेलपुरवठा करण्याबरोबरच अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूकही करत आहेत. इराण या देशांचा पारंपरिक वैरी आहे. तेलव्यवहारातून आर्थिकदृष्ट्या बळकट झाल्यास इराण या भागात आपले वर्चस्व वाढवेल, अशी भीती या देशांना आहे. त्यामुळे भारताने इराणकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी सुरू केल्यास त्याचा मध्य पूर्वेतील देशांशी संबंधांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. अडचणीच्या काळात तेलपुरवठा अखंडित ठेवून भारताच्या पाठीशी राहणाऱ्या यूएई, रशियाचा विचार भारताला करावा लागेल. तेल बाजारातील स्पर्धेचा आणि घसरलेल्या दरांचा लाभ आता भारताला मिळणार आहे.तेल कंपन्यांनी येणाऱ्या काळात तो ग्राहकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत प्रतिबॅरल १ डॉलरने कमी झाली, तर भारताच्या वार्षिक आयात बिलात सुमारे १.२० ते १.३० अब्ज डॉलर्स म्हणजेच जवळपास १० ते ११ हजार कोटी रुपयांची बचत होते. एप्रिल महिन्यात आंतरराष्ट्रीय बाजारात भारतासाठीच्या कच्च्या तेलाची सरासरी किंमत प्रतिबॅरल ११४.४८ डॉलर्सवर पोहोचली होती. या एकाच महिन्यात भारताने अवघे २०.१ दशलक्ष टन तेल आयात करूनही त्यासाठी तब्बल १,३६,००० कोटी रुपये मोजले. गतवर्षीच्या तुलनेत आयात ४.३ टक्क्यांनी कमी होऊनही बिल ५० टक्क्यांनी वाढले. आता ११४ डॉलर्सवरून ७४ डॉलर्सपर्यंत झालेली तेल दरातील घसरण ५० हजार कोटींची बचत करून देणारी आहे. यामुळे चालू खात्यावरील तूट कमी होणार असून रुपयालाही बळकटी मिळू शकेल. देशातील कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्रही या घसरणीने आनंदले आहे. रंगनिर्मिती, टायरनिर्मिती, विमान वाहतूक क्षेत्र, प्लास्टिक यासह सर्वच उद्योग-व्यवसायांसाठी तेल दरातील घसरण उत्पादन खर्च कमी करून नफा वाढवण्यास हातभार लावणारी आहे. मान्सून आणि इंधनाचा दिलासादायक प्रवास असाच सुरू राहिल्यास काल-परवापर्यंत दाटलेले आर्थिक संकटांचे मळभ दूर होण्यास मोठा हातभार लागेल.

# भेसळीच्या दाही दिशा..

**आपण जगातील मधुमेहाची राजधानी का ठरत आहोत? कर्करोगाचे प्रमाण चौपट-दहापट वेगाने का वाढत आहे? श्वास का गुदमरतो आहे? मूत्रपिंडे का निकामी होत आहेत? हृदयविकार का वाढत आहेत?**



युरोपियन देशांनी भारतातून निर्यात होणाऱ्या फळे-भाजीपाल्यावर निर्बंध आणले. आपण विश्वास ठेवणारे लोक आहोत. दुकानदाराने एकदा सांगितले की, सर्व काही शुद्ध आहे की आपण मानून टाकतो. हळदीचा पिवळेपणा एखाद्या कृत्रिम रंगामुळे आहे की नाही, याची आपल्याला चिंता नसते. पाकिटावर शुद्ध असे लिहिलेले असते, म्हणजे सर्व काही उत्तमच असणार. आपल्या पणजोबांच्या काळापासून हेच खाल्ले जात आहे. आपल्याला काही चिंता करण्याचे कारण नाही. चिंता असली तरी आपण काय करू शकतो? पर्यायांच्या अभावाची ही सक्ती आहे. म्हणून प्रारब्धाला दोष द्या आणि रस्त्याकडेला मिळणारे मोमो, चाऊमीन आणि चाट यांचा आस्वाद घेत राहा.

अलीकडेच एक बातमी वाचनात आली. एखाद्या कोपऱ्यात लहानशी छापून आली होती आणि तशीच विरूनही गेली. बातमी अशी होती की, युरोपियन युनियनने भारतातून जाणाऱ्या फळे, भाज्या आणि इतर अनेक खाद्यपदार्थांवर निर्बंध घातले आहेत. कारण त्यामध्ये जड धातू, कीटकनाशके आणि रासायनिक घटकांचे असे प्रमाण आढळले, जे कर्करोगास कारणीभूत ठरू शकते आणि म्हणूनच युरोपमध्ये निषिद्ध मानले जाते. याआधी जपाननेही याच कारणामुळे भारतातील आंबे स्वीकारण्यास नकार दिला होता.

आपल्या वस्तूंना, विशेषतः अन्नपदार्थांना,यापूर्वीही अनेकदा परदेशी बाजारपेठांनी नकार दिलेला आहे. त्यामुळे हा काही नवीन प्रकार नाही. म्हणूनच अशा बातम्या मोठ्या मथळ्यांत झळकत नाहीत. वर्तमानपत्रात एखाद्या सूचनेप्रमाणे छापून येतात आणि दूरचित्रवाणीवर तर त्यांना स्थान मिळण्याची शक्यताच नसते. आश्चर्य वाटण्यासारखेही काही नाही. ही काही फार मोठी गोष्ट नाही. आपण तर सर्व काही खातो. हे जड धातू, कीटकनाशके, रासायनिक अवशेष वगैरे नेमके काय असते, हे आपल्याला ठाऊकही नसते. कुणी सांगितलेलेही नसते. आणि सांगण्याची गरज कुणाला वाटलेलीही नसते. देशात असंख्य समस्या डोक्यावर आहेत. पोटभर अन्न मिळाले तरी मोठी गोष्ट मानली जाते. धान्य, भाजीपाला आणि फळांमध्ये रसायने आहेत की नाहीत, याचा विचार कधीतरी फुरसत मिळाली तर करता येईल.

आपण विश्वास ठेवणारे लोक आहोत. दुकानदाराने एकदा सांगितले की सर्व काही शुद्ध आहे की आपण मानून टाकतो. युरोप-अमेरिकेतील लोक जरा जास्तच भित्रे असावेत. पैसा अधिक झाला की नखरेही वाढतात. त्यांना कोण समजावणार की १५० कोटी लोक शेतीतून येणारी प्रत्येक गोष्ट डोळे झाकून खातात. आपल्या वस्तूंवर बंदी घालणे ही नक्कीच एखादी कटकारस्थानाची बाब असावी. त्यांना आपला हेवाही वाटत असणार. आपल्या वस्तूंमध्ये काही दोष असता तर सरकारने आपल्याला सांगितले नसते का? सरकारने सांगितले नाही, म्हणजे सर्व काही अगदी शुद्ध आहे, एवढेच. फळे-भाज्या धुऊन घेतल्या की त्यांच्यावरील सर्व रासायनिक पापे धुऊन निघून जातात, असे आपण समजतो. दूध उकळले की ते स्वच्छ झाले, असे मानतो.

मसाल्यांच्या पाकिटावर शुद्ध असे लिहिलेले असते, म्हणून त्यावर विश्वास ठेवतो. कधीकाळी 'रविवार असो की सोमवार, रोज खा अंडी' असा सरकारी प्रचार झाला होता. त्यामुळे आजही आपण अंड्यांमधून ताकद मिळवत आहोत. मात्र अंड्यात नेमके काय आहे, हे जाणून घेण्याची गरज आपल्याला वाटत नाही.

आगीमध्ये तापवले आणि पाण्याने धुतले की सर्व काही निष्कलंक होते, अशी आपली धारणा आहे. खरेतर ते श्रीमंत परदेशी लोक मेहनत करायला तयार नसतात. तळून खाणार नाहीत, नीट धुणार नाहीत, सोलणार नाहीत; फक्त पुसून खातील आणि मग घाबरतील. संशोधन करून वेळ वाया घालवतील. आपण त्यांच्याकडून नव्हे, त्यांनी आपल्याकडून शिकायला हवे. खाण्यापिण्याच्या वस्तूंवर संशोधन करण्यात आपल्याला वेळ वाया घालवायचा नाही.

आपल्याकडे महानगरपालिका आहेत, अन्नसुरक्षा विभाग आहेत, अधिकारी-कर्मचाऱ्यांची मोठी यंत्रणा आहे. त्यांना सर्व काही ठाऊक असते. होळी-दिवाळीत मिठाई आणि खवा पकडण्याच्या बातम्या येतात. उर्वरित वर्षभरही ते काहीतरी करतच असतील. त्यांच्यावर आपला पूर्ण विश्वास आहे. आपले आंबे, केळी, पपई ही सर्व झाडावरच नैसर्गिकरीत्या पिकतात आणि तिथून थेट आपल्या भोजनाच्या ताटात येतात, असे आपण समजतो. आपणही दररोज एक सफरचंद खाऊन डॉक्टरला दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. पण कसे कोण जाणे, आरोग्य मात्र दगा देते आणि डॉक्टर अधिकाधिक जवळ येत जातो. सफरचंदावर आपल्याला संशय नाही; दोष कदाचित मागील जन्माच्या कर्मांचा असावा.

प्रत्येक पद्धतीचे, प्रत्येक शाखेचे डॉक्टरउपलब्ध आहेत. चिंता करू नका. आरोग्य विमा आहेच. सर्व खर्च भरून निघेल. तुम्ही फक्त खात राहा आणि श्वास घेत राहा. मोठ्या लोकांशी स्वतःची तुलना करण्याची चूकही करू नका. ते आपल्यासारखे नाहीत की दुकानातून ५ किलो मोकळे पीठ घेतील, पिशवी घेऊन भाजी आणायला जातील, एखाद्या शुद्ध शाकाहारी भोजनालयात बसून शुद्ध तूप आणि शुद्ध मध खात राहतील. काळ्या धुराने भरलेल्या बसमधून प्रवास करत खोल श्वास घेतील. त्यांना देश चालवायचा असतो. आपल्याला रुग्णालयांच्या भेटवस्तू मिळवायच्या असतात. ते आपल्यासारखे नाहीत की जे मिळेल ते खातील. ते निवडक वस्तू घेतात. त्यांना कधी रुग्णालयांच्या रांगेत उभे पाहिले आहे का? सेवा करत करत थकले की ते जलउद्यानात उड्या मारत नाहीत किंवा एखाद्या खाऊगल्लीत जाऊन चाट खात नाहीत. ते स्वीडन किंवा स्वित्झर्लंडला जाऊन येतात. तेही आवश्यकच असते. ते आपल्यासारखे खिशात निर्जंतुकीकरण द्रव घेऊन फिरत नाहीत किंवा प्रत्येकाशी हस्तांदोलन करत नाहीत. दूरून नमस्कार करून काम भागवतात. त्यांचे प्रारब्धही उत्तमच असते. तुम्ही युरोपमध्ये जाऊन पाहा. तिथे भारतातून निर्यात होणारी फळे-भाज्या खा. ती आपल्याच देशातून आली आहेत, हे ओळखणेही कठीण जाईल. चवही आश्चर्यचकित करेल. तो सर्व निवडक, सर्वोत्तम दर्जाचा माल असतो. वेगळ्या पद्धतीने पिकवलेला, वेगळ्या पद्धतीने परिपक्व केलेला आणि वेगळ्या पद्धतीने प्रक्रिया केलेला. त्यामध्ये कर्करोगाचा धोका निर्माण करणारा किंचितसा घटकही नसतो. आणि चुकून कधीतरी काही आकडेवारी दिसली तर ती दुर्लक्षित करा.

दूरचित्रवाणीवरील अधिक महत्त्वाच्या चर्चांकडे लक्ष द्या. त्यांचा उपयोग अधिक होईल. आपल्या देशात १० कोटी लोक मधुमेहाने ग्रस्त आहेत, १३ कोटी लोक त्याच्या उंबरठ्यावर उभे आहेत, ३१ कोटी लोकांना उच्च रक्तदाब आहे, २५ कोटी लोक स्थूलतेशी झुंज देत आहेत, दरवर्षी १८ ते २० लाख लोकांना मेंदूविकाराचा झटका येतो, कर्करोगग्रस्तांची संख्या २० लाखांच्या पुढे पोहोचत आहे आणि वायुप्रदूषण लाखो लोकांचे प्राण घेत आहे? तरीही काळजीचे कारण नाही. रुग्णालये उघडली आहेत, वैद्यकीय महाविद्यालये सुरू होत आहेत, विमा योजना कार्यान्वित आहेत. आपल्याला काही चिंता करण्याचे कारण नाही. चिंता असली तरी आपण काय करू शकतो? पर्यायांच्या अभावाची ही सक्ती आहे. म्हणून आपण देवाच्या भरवशावर आहोत. सरकारच्या खैरातींची बरसात सुरूच आहे. आता आपणच स्वतःला आजारांपासून वाचवू शकलो नाही, तर त्यात दुसरे कोण काय करणार? म्हणून प्रारब्धाला दोष द्या आणि रस्त्याकडेला मिळणारे मोमो, चाऊमीन आणि चाट यांचा आस्वाद घेत राहा.

**योगेश मिश्र**

## 'मराठी' भाषा आणि 'राजकारणा'ची लक्तरे !

**माझेही मत**

सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात दिवंगत पद्मविभूषण आशा भोसले यांच्या निधनाचा शोकप्रस्ताव अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मांडला. कागदावर लिहून दिलेला प्रस्ताव वाचताना, त्यांनी आशा भोसले यांचे वडील 'संगीतसूर्य दीनानाथ मंगेशकर' यांचा उल्लेख 'दीनदयाल मंगेशकर' असा केला. अनवधानाने त्यांच्याकडून एक चूक झाली, असे एकवेळ मानलेही असते. पण, पुढेही त्यांच्याकडून अनेक चुका झाल्या. कागदावर लिहिलेला मराठी मजकूर जर नार्वेकर नावाच्या मराठी; आणि विधानसभाध्यक्ष या महत्त्वाच्या पदावर बसलेल्या लोकप्रतिनिधीला वाचता येत नसेल. तर, आपण कोणाला निवडून देतो? हा प्रश्न प्रत्येक मतदाराने स्वतःलाच विचारण्याची वेळ आली आहे. आश्चर्य म्हणजे, मुख्यमंत्री व एकाही आमदाराने त्यावर आक्षेप न घेणे ही लोकशाही व भाजपसाठी अत्यंत लाजिरवाणी गोष्ट तर आहेच. पण, तेवढीच ती निषेधार्हही आहे. नंतर, नार्वेकरानी 'प्रत अस्पष्ट असल्याने व टाईप छोटा असल्याने वाचण्यात चूक झाली', असे स्पष्टीकरण ( की सारवासावर ) देत दिलगिरी व्यक्त केली. पण, ती बुद्धीला अजिबात पटणारी नाही. दुस-या दिवशी राज ठाकरे यांनी



'....हा तर मराठीच्या निधनाचा शोकप्रस्ताव' अशी जहरी टीका केली.

फडणवीस, शिंदे, मोदी आणि शहा यांची काविळ झालेल्या; आणि राजकारणात स्वतःला अतिविद्वान (?) समजणा-या एका 'सं''पादकला तर गरळ ओकण्यासाठी 'आयते कोलीतच' हातात भेटले.ही 'सुवर्णसंधी' समजून, नित्यनियमाप्रमाणे त्याने सर्वांवरच मनसोक्त तोंडसुख घेतले. 'मी विधानसभेत असतो तर, अध्यक्षांना पेपरवेट फेकून मारला असता' असे म्हणत, नार्वेकराच्या राजिनाम्याची मागणीही केली. एकवेळ राज ठाकरेंनी केलेली टीका समजू शकतो.

एकंदरीत, नार्वेकरानी मराठी उच्चारातील आणि तपशिलातील काही गंभीर चुका केल्या, त्यामुळे मराठीच्या एकूणच दुरवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला, हे मात्र नक्की. त्यांनी माफीनामा जरी दिला असला तरी, हा प्रश्न फक्त त्यांच्यापुरता मर्यादेत नाही. एकूणच राजकीय क्षेत्रात वापरली जाणारी भाषा किती नीच पातळीवर गेली आहे, हे दिसतेय. राजकीय संवादक्षेत्र इतके बिभत्स होण्यामागची नक्की कारणे काय आहेत? हा फक्त भाषेच्या दर्जाचा प्रश्न आहे की, एकूण समाजाचाच प्रश्न आहे? असा गंभीर प्रश्न नक्कीच सर्वांना पडला असेल, यात तिळमात्र शंका नाही.

**प्रदीप खोलमकर,** नाशिक.
मोबाईल-८७६७५९२९८०

## बालविवाह रोखण्यासाठी आता लग्नपत्रिकेवर जन्मतारीख ?

महाराष्ट्रात बालविवाह रोखण्यासाठी राज्य सरकार राजस्थानच्या धर्तीवर लग्नपत्रिकेवर वधू - वराची जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याचे विचाराधीन असल्याचे नुकताच विधानसभेत पंचतारांकित प्रश्नाला उत्तर देताना सांगण्यात आले निश्चितच हा निर्णय स्वागतार्ह म्हणावा लागेल.आजही महाराष्ट्राच्या काही भागात ऐन शिक्षण घ्यायच्या वयातच मुलींचे विवाह उरकले जात आहेत असले विवाह रोखण्यासाठी राज्य शासनाकडून विविध मोहिमा राबवल्या जात असल्या तरी काही भागात बालविवाहाची अत्यंत विदारक आणि चिंताजनक परिस्थिती आहे. अल्पवयातचं मुलींचे हात पिवळे होत असल्याने त्यांचा शिक्षणाचा अधिकार हिरावला जात असल्याचे अशा वास्तवावरुन समोर आले आहे.एवढेच नव्हे तर शारीरिक प्रगल्भता येण्यापूर्वीच मातृत्व लादले जात असल्याने मातामृत्यू आणि कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे.याला पायबंद घालण्यासाठी विशेष पथके, जनजागृतीवर लाखो रुपयांचा चुराडा करुनही बालविवाह थांबत नसल्याने शासन, प्रशासन अपयशी ठरले आहे. त्यामुळे आता बालविवाह रोखण्यासाठी राजस्थानच्या धर्तीवर लग्नपत्रिकेवर वधू व वराची अधिकृत जन्मतारीख छापणे बंधनकारक करायचा विचार असल्याचे थेट विधानसभेत सांगितल्याने याला आणखीन बळ मिळत आहे. त्यामुळे हा निर्णय चांगला असला तरी आज डिजिटल जगतात लग्नपत्रिका सोशल मिडियांवर व्हॉट्सॲप, फेसबुकच्या माध्यमातून अगदी सहजतेने आणि मोठ्या प्रमाणात शेअर केली जाते अशावेळी वधू व वराचे पूर्ण नांव, पत्ता आणि जन्मतारीख अशी वैयक्तिक माहिती सार्वजनिक केल्यामुळे काही अडचणी अथवा धोका निर्माण होतो का?

**राजू जाधव**

## जन्मतारीख छापून बालविवाह थांबतील का ?

राज्यासह देश प्रगतीपथावर मार्गक्रमण करत असताना बालविवाहांमध्ये मात्र वाढ होताना दिसत आहे. सरकारी माहितीनुसार राज्यातील परभणी जिल्ह्यात सर्वाधिक ४८ टक्के, बीड जिल्ह्यात ४७.३ टक्के, धुळ्यात ४०.५ टक्के, सोलापूरमध्ये ४०.३ टक्के विवाह हे मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण होण्याआधीच होतात. अन्य जिल्ह्यांमध्येही काहीशी अशीच स्थिती आहे. वाढते बालविवाह रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकार राजस्थान सरकारप्रमाणे लग्नपत्रिकेवर मुला-मुलीच्या नावासोबत त्यांची जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याच्या विचारात असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.बालविवाह रोखण्यासाठी व्यापक जनजागृती करणे, बालविवाहाचे तोटे ग्रामीण स्तरावर समजावून सांगणे यासाठी सरकारने प्रयत्न करायला हवेत. त्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावीपणे वापर करता येईल. प्रत्येक गावातील ग्रामपंचायात कार्यालय किंवा पोलीस पाटील यांच्याकडे सबळ कागदी पुराव्यांसह विवाहपूर्व नोंदणी बंधनकारक करावी. ज्या गावांत बालविवाह होत असल्याचे लक्षात येईल अशा गावांतील सरकारी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. शाळा महाविद्यालयानातूनही विद्यार्थ्यांचे नियमित प्रबोधन करावे.

**मोक्षदा घाणेकर**

## तामिळनाडू सरकार देणार नवजात बालकांना तब्बल एक ग्राम सोने

तामिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय यांना १५ सप्टेंबर पासून नवजात बालकासाठी एक योजना सुरु केली आहे.'थायमन बंगा मोतीराम थीट्टम' या नावाने ही योजना सुरु होत आहे.या योजनेच्या अंमलबजावणी व व्यवस्थापनासाठी एक राज्य युनिट स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.मामाकडून भेट असे नाव या योजनेला दिले आहे.सध्याच्या सोन्याच्या किमतीनुसार हे सोने तब्बल १३,६०० रुपये किमतीचे आहे.निवडणुकी पूर्वी विजय यांच्या पक्षाने नवजात बालकाला एक ग्राम सोने देण्याचे वाचन दिले होते या उपक्रमासाठी तामिळनाडू सरकारने ७५५.८३ कोटीची तरतूद केली आहे.आज देशात लाडकी बहीण,काही युनिट पर्यंत वीज मोफत वगेरे योजना सुरु आहेत.त्यात तामिळनाडूच्या या योजनेची भर पडत आहे सरकारच्या आदेशात एक ग्राम सोन्याची अंगठी ही प्रसूतीचा आनंद,व मातृत्वाचे महत्व साजरे करते असे म्हटले आहे.

**शांताराम वाघ**

## सर्वसमावेशक 'नागरिकत्व दस्तऐवज' करणे गरजेचे

'पासपोर्ट' हा केवळ परदेशातील प्रवासासाठीचा एक दस्तऐवज असून परदेशात प्रवास करताना तो तुमचे राष्ट्रीयत्व दाखवतो.त्याला नागरिकत्वाचा अंतिम किंवा निर्णायक पुरावा मानले जाऊ शकत नाही, या केंद्रीय परराष्ट्र मंत्रालयाच्या स्पष्टीकरणामुळे देशातील नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. कायदेशीरदृष्ट्या 'पासपोर्ट कायदा १९६७' आणि 'नागरिकत्व कायदा १९५५' हे दोन्ही स्वतंत्र अन भिन्न कायदे आहेत हे मान्य केले तरी पासपोर्ट नाही, तर मग नागरिकत्व सिद्ध करणारा दस्तावेज कोणता असा प्रश्न यामुळे सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.वास्तविक पासपोर्ट मिळवण्यासाठी नागरिकाला अत्यंत कडक पोलीस पडताळणी, जन्मदाखला आणि विविध रहिवासी पुराव्यांच्या प्रक्रियेतून जावे लागते. एवढ्या उच्चस्तरीय आणि किचकट प्रशासकीय तपासणीनंतर मिळणारा दस्तऐवजही देशाचे नागरिकत्व सिद्ध करू शकत नाही, हे सर्वसामान्यांना समजण्यापलीकडे आहे. आधारकार्ड (ओळख व वास्तव्याचा पुरावा),पॅनकार्ड (व्यवहारांसाठीचे ओळखपत्र),मतदार ओळखपत्र (मतदानाचा अधिकार दर्शवणारे पत्र) आणि आता पासपोर्ट (परदेशात प्रवास करण्यासाठीचा दस्तऐवज) ही सर्व ओळखपत्रे भारतीय नागरिकत्वाची पुष्टी करत नसतील तर अशा गोंधळाच्या परिस्थितीत सरकारने यावर केवळ कायदेशीर स्पष्टीकरणे न देता राष्ट्रीय पातळीवर एकच डिजिटल आणि सर्वसमावेशक 'नागरिकत्व दस्तऐवज' (सिटिझनशिप कार्ड) तयार करण्याबाबत धोरणात्मक विचार करावा. यामुळे 'नागरिकत्वा'च्या संदर्भातील जनतेमधील संभ्रम कायमचा दूर होईल.

**- प्रदीप मोरे**

शनिवार, दि. २७ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# ‘ना एनए ऑर्डर, ना लेआउट परमिशन’प्लॉट विक्री जोमात..!

## यवतमाळात विनापरवाना प्लॉट विक्रीचा सुळसुळाट! ,कागदपत्रांची पडताळणी करण्याचे प्रशासनाचे आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २६ :** शासकीय नियमांची पायमल्ली करत आणि महसूल विभागाची कोणतीही रीतसर परवानगी न घेता जंगलातील व अकृषक (Non-Agricultural) नसलेल्या जमिनींवर बेकायदेशीर लेआउट टाकून सर्वसामान्यांची फसवणूक करण्याचा गोरखधंदा सध्या शहरात व जिल्ह्यात जोरात सुरू आहे.




‘ना ले-आउट परमिशन, ना एनए ऑर्डर’ अशी स्थिती असतानाही केवळ मोठमोठ्या जाहिराती आणि भूलथापांच्या जोरावर हे अवैध प्लॉट सर्रास खपवले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अनेक ठिकाणी थेट जंगलाच्या किंवा दुर्गम भागातील जमिनींवर ले-आउटचे रेखांकन केले जाते. काही भ्रष्ट अधिकाऱ्यांशी संगनमत करून अर्धवट किंवा तकलादु मान्यता मिळवायची आणि त्यानंतर त्याचा मोठा गाजावाजा व जाहिरात करायची,अशी नवी शक्कल भू-माफियांनी लढवली आहे. भव्य उद्घाटनांचे सोहळे करून नागरिकांकडून बुकिंग च्या नावाखाली लाखो रुपये उकळले जातात. मात्र, प्रत्यक्ष खरेदीच्या वेळी लेआउट मालकांकडून विविध तांत्रिक कारणे पुढे करून ग्राहकांना वेठीस धरले जाते. यामध्ये मूलभूत सुविधांचा पत्ताच राहत नाही. गुंतवणुकीच्या लालसेपोटी सामान्य नागरिक या जाळ्या मध्ये अडकतात. या अनधिकृत ले-आऊट मध्ये पिण्याचे पाणी,सह वापरण्याचे पाणी,वीज, रस्ते किंवा सांडपाण्याची व्यवस्था यांसारख्या कोणत्याही मूलभूत सुविधा उपलब्ध नसतात.

### ले-आउटसाठी आवश्यक परवानग्या

उपविभागीय अधिकारी (SDO) यांच्याकडून अधिकृत अकृषक (NA) आदेश. नगररचना विभाग (Town Planning) व स्थानिक स्वराज्य संस्थेकडून मंजूर ले-आउट नकाशा. पहिला शिक्का, दुसरा शिकवा तसेच न.प. टाऊन प्लॅनिंग नाहरकत प्रमाणपत्र, भूमी अभिलेख कार्यालया कडून (Land Records) मोजणी आणि हद्द निश्चिती प्रमाणपत्र.

### प्रशासनाचा इशारा

"उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अंतिम परवानगीशिवाय कोणत्याही ले-आऊट कायदेशीर मान्यता मिळत नाही. नागरिकांनी केवळ जाहिरातींवर विश्वास न ठेवता भूमी अभिलेख आणि महसूल कार्यालयात जाऊन कागदपत्रांची तातडीने खात्री करावी. कायदेशीर कागदपत्रे असल्याशिवाय अशा भूखंडांमध्ये गुंतवणूक करू नये, अन्यथा भविष्यात होणाऱ्या फसवणुकीला नागरिक स्वतः जबाबदार असतील असे स्पष्ट मत प्रशासकीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

# शिवस्मारकाचा सन्मान की प्रशासनाची उदासीनता?

## अनावरणाच्या मागणीसाठी उमरखेडमध्ये आमरण उपोषण सुरू

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २६ :** उमरखेड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे अनावरण अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याच्या पार्श्वभूमीवर, स्मारक परिसरातील कथित नियमबाह्य पेट्रोल पंप हटवून स्मारकाचे तात्काळ अनावरण करण्यात यावे, या मागणीसाठी शिवप्रेमी तथा मराठा सेवा संघाच्या वतीने सरोज नंदकुमार देशमुख यांनी २५ जूनपासून आमरण उपोषण सुरू केले आहे.



आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी अनेक निवेदने, आंदोलने आणि प्रशासनाशी चर्चा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे अखेर लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाचा निर्णय घेण्यात आला. उपोषणाच्या पहिल्याच दिवशी शिवप्रेमी, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा दिला. स्मारक परिसरातील कथित अतिक्रमणाबाबत वारंवार तक्रारी होत असतानाही संबंधित प्रकरणात प्रशासनाची भूमिका अद्याप स्पष्ट नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कार्यवाहीस विलंब का होत आहे, याचे स्पष्ट उत्तर प्रशासनाने जनतेसमोर मांडावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचे प्रतीक आहेत. त्यांच्या स्मारकाच्या अनावरणासाठी उपोषण करावे लागणे ही दुर्दैवी बाब आहे," अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. स्मारकाच्या अनावरणाबाबत ठोस निर्णय आणि कथित अतिक्रमणाबाबत स्पष्ट कार्यवाही होईपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे आता प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे उमरखेडकरांचे लक्ष लागले आहे.

# बसपाच्या वतीने शाहू महाराज जयंती साजरी

## जयंतीनिमित्त सामाजिक न्यायाचा निर्धार..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २६ :** बहुजन समाज पार्टी, यवतमाळ जिल्ह्याच्या वतीने सामाजिक न्यायाचे प्रणेते छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची १५२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले



तसेच त्यांच्या समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रमात बसपाचे जिल्हाध्यक्ष संदेश ढोले यांनी शाहू महाराजांच्या लोककल्याणकारी कार्याचा आढावा घेताना शिक्षणाचा प्रसार, मागासवर्गीयांसाठी १९०२ मध्ये आरक्षणाची अंमलबजावणी, शेतकरी, कामगार, महिला आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयांचे महत्त्व अधोरेखित केले. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता व संविधानिक मूल्यांच्या विचारांवर बहुजन समाज पार्टी ठामपणे कार्यरत असून, आजच्या काळात हे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष गुणवंत गणवीर, लोकसभा इन्चार्ज दिलीप बेलसरे, पंडित दिघाडे, प्रकाश राऊत, जिल्हा उपाध्यक्ष तथा नगरसेवक विपुल खोब्रागडे, जिल्हा कोषाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, जिल्हा सचिव हर्षवर्धन ठमके, ॲड. सुनील घोडेस्वार, शंकर धनकुलवार, महेंद्र ढेपे, संजय तागडे, शिवप्रसाद राऊत, सत्यप्रकाश भगत, धनराज धवने, हेमंत सुखदेवे, दिलीप गणवीर, मारोती सातपुडके यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त वणीत भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. २६ :** मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री मा. संजयभाऊ राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना, युवासेना व महिला आघाडी (वणी विधानसभा) यांच्या वतीने लता मंगेशकर हॉस्पिटल, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने यवतमाळ जिल्हा संघटक विजय बाबू चोरडिया यांच्या पुढाकारातून भव्य मोफत आरोग्य शिबिर व औषध वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.




हे आरोग्य शिबिर सोमवार, दिनांक २९ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत जैताई मंदिर,वणी येथे आयोजित करण्यात आले असून परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. शिबिरात जनरल फिजिशियन, सर्जरी, बालरोग,नेत्र तपासणी व नेत्र चिकित्सा,मोफत चष्मे वाटप, अस्थिरोग, कान-नाक-घसा, स्त्रीरोग, त्वचारोग आदी विविध विभागांतील तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वाटपही केले जाणार आहे. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली असून वणी, मारेगाव व झरी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य सेवांचा लाभ घ्यावा,असे आवाहन शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केले आहे. या उपक्रमासाठी वणी येथील तालुका प्रमुख प्रसाद ठाकरे, शहर प्रमुख शिवराज पेचे, मारेगावचे तालुका प्रमुख विशाल किन्हेंकार,शहर प्रमुख विजय मेश्राम तसेच झरीचे तालुका प्रमुख बाळू चेडे व शहर प्रमुख नाना सुगंधे यांच्यासह शिवसेना,युवासेना व महिला आघाडीचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

## थोडक्यात

### एम ए (संस्कृत) विषयात समीक्षा अग्रवालची सुवर्णकामगिरी

**परीक्षेत अव्वल ९७.२० टक्के गुणांसह घवघवीत यश.!**

**पुसद:** येथील श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयाची



विद्यार्थिनी कु. समीक्षा अखिलेश अग्रवाल हिने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या एम.ए. (संस्कृत) अंतिम परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन करत ९७.२० टक्के गुण प्राप्त केले असून ती अव्वल ठरली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयासह पुसद शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा नुकताच जाहीर झालेल्या निकालात समीक्षा हिने नाट्यशास्त्र व नाटक, गद्य व महाकाव्य, संस्कृत साहित्य, संस्कृत पत्रलेखन, अर्जलेखन, निबंध तसेच रिसर्च प्रोजेक्ट रिपोर्ट या सर्व विषयांत विशेष प्राविण्य मिळवत आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच समीक्षा विविध स्पर्धात्मक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेत आली आहे. तिला यापूर्वी ‘बेस्ट स्टुडन्ट अवॉर्ड’ने गौरविण्यात आले असून राज्यस्तरीय तसेच आंतरमहाविद्यालयीन निबंध स्पर्धांमध्ये तिने अनेक पुरस्कार प्राप्त केले आहेत. तिच्या सातत्यपूर्ण परिश्रम, अभ्यासू वृत्ती आणि जिद्दीचे हे यश फलित मानले जात आहे. समीक्षा ही येथील हिंदी वाचनालयाचे सचिव तथा ज्येष्ठ पत्रकार अखिलेश अग्रवाल यांची कन्या आहे. आपल्या यशाचे श्रेय तिने आई-वडील, आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाला दिले आहे. तिच्या या नेत्रदीपक यशाबद्दल विविध क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### आणीबाणीचा ‘काळा अध्याय’ उजाळला..!

**लोकशाही रक्षणाच्या संघर्षाला भाजपकडून अभिवादन**

**यवतमाळ :** भारतीय जनता पार्टीच्या यवतमाळ जिल्हा कार्यालयात २५ जून १९७५ रोजी लागू करण्यात आलेल्या आणीबाणीच्या ५१व्या वर्षानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. "आणीबाणी ही लोकशाहीवरील काळा डाग" असल्याची भूमिका मांडत, त्या काळात तुरुंगवास भोगलेल्या मिसाबंदी व जनसंघ स्वयंसेवकांच्या संघर्षगाथांना उजाळा देण्यात आला. सत्याग्रहींनी अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील निर्बंध, तुरुंगातील अनुभव आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी केलेल्या संघर्षाच्या आठवणी कथन केल्या. त्यांच्या अनुभवांनी उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये लोकशाही मूल्यांबाबत जागरूकता आणि प्रेरणा निर्माण झाल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमात श्रीधरराव देशपांडे, अरुण भिसे, लक्ष्मणराव खत्री यांच्यासह अनेक सत्याग्रहींचा शाल-श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. अनुभव कथनाच्या मुलाखती राजू पडगिलवार यांनी घेतल्या, तर संचालन शंतनू शेटे यांनी केले. समारोपात जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल चौहान यांनी लोकशाही रक्षणासाठी संघर्ष करणाऱ्यांच्या योगदानाचा गौरव केला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुसदमध्ये ६५० महिलांचा निर्धार

## उमेद अभियानाची तालुकास्तरीय कार्यशाळा संपन्न

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २६ :** उमेद–महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत पुसद तालुक्यातील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित व प्रौढ अविवाहित अशा एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी जुनी पंचायत समिती येथील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात तालुकास्तरीय एकदिवसीय मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत तालुक्यातील विविध गावांतील ६५० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदवून स्वावलंबनाकडे वाटचाल करण्याचा निर्धार व्यक्त केला.



कार्यशाळेत शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया, स्वयंरोजगाराच्या संधी, बचत गट व ग्रामसंघांची भूमिका, तसेच महिलांचे सामाजिक व कायदेशीर हक्क याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित महिलांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर आवश्यक सूचना व उपाययोजनाही मांडण्यात आल्या. कार्यक्रमाला पुसद शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सेवानंद वानखेडे, नायब तहसीलदार चंपा राठोड, संरक्षण अधिकारी गायभाय, आरोग्य विभागाचे सरकुंडे सर, तसेच उमेद अभियानाचे तालुका अभियान व्यवस्थापक गौरव कांबळे, तालुका व्यवस्थापक राठोड, अर्शद आणि विविध प्रभागांचे समन्वयक, व्यवस्थापक व कॅडर उपस्थित होते. ग्रामीण भागातील एकल महिलांना शासनाच्या योजनांशी जोडून आर्थिक, सामाजिक आणि संस्थात्मकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अशा कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरत असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# उमरखेड तालुक्यात अवैध दारूविक्रीवर एलसीबीची कारवाई..!

## साखरा-देवसरीत छापा, २३ हजारांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २६ :** यवतमाळ जिल्ह्यातील अवैध धंद्यां विरोधात स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) पुन्हा एकदा धडक कारवाई करत उमरखेड तालुक्यातील देवसरी व साखरा येथे सुरू असलेल्या अवैध देशी-विदेशी दारूविक्रीचा पर्दाफाश केला. या कारवाईत २३,२७० किमतीचा देशी व विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला असून दोन आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



जिल्ह्यात अवैध दारू, शस्त्रे, उत्खनन आणि इतर बेकायदेशीर धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक कुमार चिता यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेची विशेष मोहीम सुरू आहे. त्याअंतर्गत २६ जून रोजी उमरखेड उपविभागात गस्ती दरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे एलसीबीच्या पथकाने दोन ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले. या कारवाईत फकिरा मुकुंद दवणे (रा. देवसरी) आणि शिवराम बाबुराव गंदेवार (रा. साखरा) हे अवैधरीत्या देशी व विदेशी दारूची विक्री करताना आढळून आले. त्यांच्या ताब्यातील दारूचा साठा जप्त करून दोघांविरुद्ध पोलीस स्टेशन उमरखेड येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हे नोंदविण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धिरज बांडे, पोउपनि अमोल राठोड तसेच एलसीबीच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. जिल्ह्यात अवैध दारू विक्री विरोधात एलसीबीने सुरू केलेली आक्रमक मोहीम कायम राहणार असल्याचे संकेत या कारवाईतून स्पष्ट झाले असून, बेकायदेशीर धंदे करणाऱ्यांना यापुढे कायद्याचा कठोर सामना करावा लागणार आहे.

# मंत्री संजय राठोड यांच्याकडे भटक्या-विमुक्तची राष्ट्रीय नेतृत्वाची धुरा

## विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या जमाती समाजाच्या सक्षमीकरणासाठी निवड

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**ढाणकी, दि. २६ :** विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या जमाती (DNT) समाजाच्या संघटनात्मक सक्षमीकरणासाठी शिवसेनेचे मंत्री संजय राठोड यांची राष्ट्रीय नेतेपदी निवड करण्यात आल्याचा दावा शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केला आहे.



> मसनजोगी समाजातील माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला ढाणकी नगरपंचायतीत स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी देऊन पालकमंत्री संजय राठोड यांनी भटक्या-विमुक्त समाजावरील विश्वास दाखविला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व संजय राठोड यांच्या नेतृत्वामुळे या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न अधिक बळकट होईल.
>
> — संजय सल्लेवाड,
> शिवसेना शहरप्रमुख, ढाणकी तथा स्वीकृत नगरसेवक,
> नगरपंचायत ढाणकी.

या निर्णयाचे ढाणकी येथे मसनजोगी समाज व शिवसेना कार्यकर्त्यांनी स्वागत करत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. देशातील सुमारे १० ते १२ कोटी, तर महाराष्ट्रातील जवळपास १.५ कोटी विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या समाजाला शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवास, जातप्रमाणपत्र, आरक्षण व इतर मूलभूत सुविधांबाबत अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर विविध DNT समाजांना एकत्र आणून त्यांच्या प्रश्नांवर प्रभावी पाठपुरावा करण्यासाठी संजय राठोड यांच्यावर राष्ट्रीय स्तरावरील जबाबदारी सोपविण्यात आल्याचे सांगण्यात आले. यापुढे राज्य व देशभरात जिल्हा, तालुका व गावपातळीवर संघटन मजबूत करणे, युवक व महिलांना नेतृत्वात संधी देणे तसेच शासनाकडे प्रलंबित मागण्यांसाठी समन्वित लढा उभारण्यावर भर दिला जाणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. शिवसेनेच्या या निर्णयामुळे विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या समाजाला संघटित नेतृत्व मिळून त्यांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरणाला चालना मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरण विरोधात एल्गार..!

## ३० जून रोजी विधान भवनाला घेराव घालणार !, उपवर्गीकरण करणे आरक्षण संपविण्याचा घाट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २६ :** अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाला यवतमाळातील विविध आंबेडकरी संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला असून, हा निर्णय आरक्षण व्यवस्थेला कमकुवत करण्याच्या प्रक्रियेची सुरुवात असल्याचा आरोप करण्यात आला. शासकीय विश्रामगृह येथे शुक्रवारी झालेल्या पत्रकार परिषदेत संघटनांच्या प्रतिनिधींनी ही भूमिका मांडली. ३० जून रोजी मुंबई येथे विधानभवनावर मोर्चा काढुन घेराव घालण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.



यावेळी प्रा. मीनाक्षी सावळकर यांनी उपवर्गीकरणाला विरोध करताना, हा केवळ प्रशासकीय बदल नसून आरक्षणाच्या मूळ संकल्पनेवर आघात असल्याचे सांगितले. “आज जातींचे उपवर्गीकरण केले जाईल, उद्या आरक्षणाची टक्केवारी कमी होईल आणि भविष्यात आरक्षणच संपुष्टात आणण्याचा प्रयत्न होईल,” असा इशारा त्यांनी दिला. मातंग समाजाचे नेते नवनीत महाजन यांनी, “समाजाला स्वतंत्र कोटा नको असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या १५ टक्के आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, हीच आमची अपेक्षा आहे,” असे मत व्यक्त केले. मांग-गारुडी समाजाचे प्रतिनिधी चंदन हातागळे यांनी अनुसूचित जातीतील सर्व घटक एकत्र असल्याचा दावा करत, समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होऊ नये, असे आवाहन केले. अनुसूचित जातीतील ५९ जाती एकत्रितपणे उपवर्गीकरणाला विरोध करतील, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. पत्रकार परिषदेत ॲड. जयसिंह चव्हाण, उमेश मेश्राम, आनंद भगत, रवींद्र कांबळे, ॲड. धनंजय मानकर, ॲड. प्रशांत किर्दक, नामदेव थुल, प्रा.अंकुश वाकडे, प्रमोदीनी रामटेके, हेमंत काबळे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी ३० जून रोजी मुंबई येथे विधानभवनावर आयोजित करण्यात आलेल्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. सरकारने उपवर्गीकरणाचा निर्णय मागे घेतला नाही, तर जिल्ह्यात साखळी उपोषण, तहसील कार्यालयांवर आंदोलन आणि जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे काढण्यात येतील, असा इशाराही संघटनांनी दिला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांची गरज-आ. संजय खोडके

## प्रशासकीय व्यवस्थेकडून आकडेवारी लपविले जात असल्याचा आरोप

**अमरावती/का.प्र.**

आज पर्यंत शासनाच्या वतीने मातामृत्यू-बालमृत्यू रोखण्यासह कुपोषण मुक्तीसाठी कोट्यव धींचा निधी खर्च केला असला तरीही या बाबतची गंभीर परिस्थिती 'जैसे थे' आहे. या संदर्भात न्यायालयाने दखल घेतली असतांना मात्र शासन या गंभीर प्रश्नाबाबत संवेदनशील नसल्याचा समज कुपोषणग्रस्त भागात काम करणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाला आहे. प्रशासकीय व्यवस्थेने दिलेल्या आकडेवारीवर विश्वास व्यक्त न करता मेळघाट सारख्या कुपोषित भागात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या माहितीच्या आधारे व उच्च न्यायालयाचे दिशानिर्देश सोबतच सार्वजनिक आरोग्य विभाग व महिला बाल विकास विभागाने समन्वय राखून पुढे जाण्याची गरज असल्याची लक्षवेधी सुचना विधान परिषद आ.संजय खोडके यांनी राज्यविधिमंडळासमक्ष केली.

राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये आमदार संजय खोडके यांनी कुपोषणबाधित जिल्ह्यांमध्ये वाढते माता मृत्य व बाल मृत्यूचे प्रमाण एक गंभीर समस्या असल्याचे सांगून या संवेदनशील विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांनी याबाबतची आकडेवारी मांडतांना सांगितले कि, सद्यास्थितीत राज्यभरात वर्ष २०२५-२६ या वर्षात १२ हजार बालमृत्यू झालेत, त्यापूर्वी वर्ष २०२१-२०२२ मध्ये १६हजार बालमृत्यू झाले ,वर्ष २०२३-२००४ मध्ये १३ हजार बालमृत्यू , तर वर्ष २४-२५ मध्ये १३ हजार बालमृत्यू होते. याबाबतचे आकडे हे प्रशासकीय यंत्रणेने दिले नसून ते माहितीच्या अधिकारातून समोर आले असल्याची धक्कादायक बाब सुद्धा



आ.संजय खोडके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. आदिवासी भागात वर्षानुवर्षे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना सुद्धा आकडेवारी दिली जात नाही. त्यांना माहिती दिल्यास कुपोषण व बालमृत्यू कमी करण्यासंदर्भातील त्रुटी , सुधारणा व उपाययोजना बाबत संस्था काही सूचना करून शकतात.त्यामुळे आता नवसंजीवनी प्रोजेक्ट्चे कार्यकर्ते आता हायकोर्टात पोहोचल्याने बालमृत्यूच्या वाढत्या परिस्थितीसंदर्भात न्यायालयातूनच दिशा-निर्देश आल्याने शासन व्यवस्था या संदर्भात असंवेदनशील असल्याच्या भावना निर्माण होत असल्याचे सुद्धा आ.संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष स्पष्ट केली.

अमरावती जिल्ह्यतील मेळघाट -धारणी भागात बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी पेडियाट्रिक्स डॉक्टर सह अँम्ब्युलन्स सुविधा सुद्धा उपलब्ध करणे आवश्यक आहे. शासन पोषण आहारामध्ये निधी वाढवून प्रति लाभार्थी ४५ रुपये करणार होते, तर स्पर्श योजनेतून अँम्बुलंस वाहक चालकांना डिझेलचे पैसे अजूनही नियमित नसल्याने पेट्रोल पंपचालकांनी अँम्ब्युलन्सला १५-१५ दिवस डिझेल देणे बंद केले आहे. आरोग्य विभागात मनुष्यबळाचा अभाव असून सीडीपीओ ची पदे सुद्धा कमी आहेत.शासनाच्या महिला व बाल विकास विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांच्या समन्वयाने काम करण्याबरोबरच स्थानिक भागात काम करणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी यांना सोबत घेऊन,बैठक लावून काम काम करण्याची गरज असल्याची लक्षवेधी सूचना आ.खोडके यांनी सभागृहासमक्ष केली.

यावर विधान परिषदेमध्ये उत्तर देतांना राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री- ना. प्रकाश आबिटकर म्हणाले कि, देशात बालमृत्यू कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात जे काही राज्य सक्रिय आहेत त्यात महाराष्ट्र अव्वल आहे.कुपोषण बाबत अधिक चांगले काम करण्यासाठी काही एकापेक्षा एक शासन निर्णय काढून समिती गठीत करण्यात आल्यात.कुपोषणाच्या आकडेवारी संदर्भात उत्तर देतांना मंत्री ना. आबिटकर म्हणाले कि, नवसंजीवनीच्या कार्यकर्त्यांना जी काही आकडेवारी पाहिजे त्या संदर्भात आरोग्य विभाग , महिला व बालविकास विभाग आणि आदिवासी विभाग एकत्रित विचारणा करण्याची आवश्यकता असल्याचे न्यायालयाचे निर्देश आहेत. त्यामुळे कुपोषणबाधित क्षेत्रात बाल मृत्यू रोखण्यासाठी विशेष बाब म्हणून जे काही देण्याच्या उच्च न्यायालयाच्या ज्या काही तरतुदी आहेत. त्या संदर्भात उपाययोजना व निराकरण करण्यासह आपल्याला जे काही उद्यीष्ट गाठायचे आहे.

# सरकी टोपणी...



खल्लार परिसरात दोन दिवस पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्याच्या शेतात सरकी टोपतांना महिला वर्ग..(छाया-युवराज डोंगरे)

# मयूर कोलटके आणि संदीप सावंत 'अग्निवीर' म्हणून निवड

**अमरावती/का.प्र.**

तक्षशिला महाविद्यालय श्याम नगर अमरावतीच्या राष्ट्रीय छात्र सेना विभाग अंतर्गत एनसीसी प्रशिक्षण घेतलेल्या व कला शाखेत शिक्षण घेत असलेल्या मयूर कोलटके आणि संदीप सावंत या दोन विद्यार्थ्यांची भारतीय नेव्हीच्या 'अग्निवीर' (एस.एस.आर) म्हणून निवड झाली आहे. तक्षशिला महाविद्यालय, एनसीसी विभाग यांच्यासाठी ही गौरवास्पद बाब आहे.

या विद्यार्थ्यांना तक्षशिला महाविद्यालय एनसीसी विभागाचे प्रमुख असोसिएट एनसीसी



ऑफिसर लेफ्टनंट प्रा. सचिन कुमरे यांचे मार्गदर्शन लाभले.

'अग्निवीर' मध्ये निवड झालेल्या या दोनही विद्यार्थ्यांची घरची परिस्थिती अत्यंत बेताची असून प्रतिकूल परिस्थितीतून ते शिक्षण घेत आहेत. सैन्यात भरती होण्याचे स्वप्न बाळगून या विद्यार्थ्यांनी अमरावती येथील तक्षशिला महाविद्यालयात एनसीसी साठी प्रवेश घेतला, त्यांच्या मेहनतीमधून त्यांचा हा उद्देश फळाला आला आहे, असे एनसीसी विभाग प्रमुख मार्गदर्शक लेफ्टनंट प्रा. सचिन कुमरे यांनी सांगितले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष कीर्तीताई अर्जुन, सचिव डॉ. कमलाकर पायस, प्रशासकीय अधिकारी सचिन पंडित, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधुरी कि. फुले, उपप्राचार्य डॉ. प्रितेश पाटील, एनसीसी चे सर्व कॅडेट्स, सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी या दोनही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# रहिमापूर चिंचोलीत 'प्रशांत पॅटर्न'

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील रहिमापूर चिंचोली पोलीस स्टेशनच्या हद्दीत मागील दोन वर्षांपासून अवैध दारू विक्रीने हैदोस घातला होता. या अवैध धंद्यांमुळे परिसरात गुंडशाही वाढली असून गुन्हेगारीचे प्रमाणही लक्षणीयरित्या वाढले होते. मात्र, नवनियुक्त ठाणेदार प्रशांत देशमुख यांनी पदभार स्वीकारताच अवैध दारू व्यवसायिकांच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी केलेल्या धडक कारवाईमुळे अवैध दारू विक्रेत्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

रहिमापूर चिंचोली पोलीस स्टेशनची हद्द ही पूर्णपणे ग्रामीण भागात येते. गेल्या दोन वर्षांपासून या परिसरात अनेक अवैध व्यवसाय खुलेआम सुरू होते. अवैध दारूमुळे गावात भांडणे, मारामाऱ्या आणि इतर गुन्हेगारी कृत्यांमध्ये वाढ झाली होती. स्थानिक नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनही अवैध धंद्यांना आळा बसत नव्हता. ठाणेदार प्रशांत



देशमुख यांनी सूत्रे हाती घेताच अवैध दारू अड्ड्यांवर छापेमारी सत्र सुरू केले. पोलिसांनी अवैध दारूचा साठा जप्त करून अनेकांवर गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईमुळे अवैध व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली असून अनेकांनी पोलीस स्टेशनची हद्द सोडण्याची तयारी सुरू केली आहे.पोलिसांच्या या धडक कारवाईचे स्थानिक नागरिकांकडून स्वागत होत आहे.'दोन वर्षांपासून गावातील वातावरण बिघडले होते. तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात होती. आता कुठे दिलासा मिळाला,' अशी प्रतिक्रिया एका ग्रामस्थाने दिली.

# संक्षिप्त

## गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळावर विठ्ठल नामाचा गजर

**दर्यापूर-** सालाबादाप्रमाणे यंदाही तालुक्यातील माहुली ( धांडे ) येथील भक्त मंडळी द्वारे गाव ते पंढरपूर पालखी दिंडीचा शुभारंभ झाला . श्री नारायणगुरु महाराज मंदीर पूजनानंतर गावातून वाजगाजत निघाल्या नंतर आपल्या पाच वर्षांच्या परंपरे नुसार गाव शिवारात स्थापीत गाडगेबाबा गोरक्षण संस्थेच्या विशाल परिसरात सर्व भक्त मंडळी तथा संस्थेच्या गो सेवकांनी गोपूजन करून एकत्रित वृक्षारोपण केले . या वेळी सर्व उपस्थितांद्वारे केल्या गेलेल्या श्री विठ्ठल नामाच्या गजराने संपूर्ण गोरक्षण परीसर दणाणून गेला.पालखीचे पूजन गोरक्षण संस्थेचे कार्यकारिणी उपाध्यक्ष विजय पाटील धुमाळे ( साखरे ) यांनी केले . संस्थेचे व्यवस्थापक बाळासाहेब ( अनिल ) नामदेवराव भारसाकळे यांचा पालखी संचाद्वारे श्रीधरजी धांडे यांनी दैनंदीन गोसेवेबद्दल पालखीचा नारळ - दुपट्टा अर्पण करून गौरव केला . सेवा कार्यात वैभव ठाकरे, संदीप पवार ,आशिष ठाकरे, संतोष गवई, ज्ञानेश्वर गवई, अंकुश घरडे, श्रीकृष्ण पोटे यांचेसह संस्थेचे विश्वस्त प्रा गजानन भारसाकळे यांनीही सेवा दिली .

## आषाढी निमित्त पंढरपूरसाठी विशेष ट्रेन

**अमरावती-** आषाढी एकादशीनिमित्त विदर्भातील वारकऱ्यांसाठी मध्य रेल्वेने अमरावती, नागपूर आणि खामगाव येथून पंढरपूरसाठी विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. २१ व २४ जुलै रोजी दुपारी २.४० वाजता गाडी संख्या ०१११९ नवा अमरावती-पंढरपूर स्पेशल रवाना होईल, जी दुसऱ्या दिवशी सकाळी ९.१० वाजता पोहोचेल. परतीसाठी २२ व २५ जुलै रोजी गाडी संख्या ०१९२० पंढरपूर-नवा अमरावती स्पेशल संध्याकाळी ७.३० वाजता निघून पुढील दिवशी दुपारी १२.५० वाजता पोहोचेल. १८ डब्यांच्या या ट्रेनला बडनेरा, मुर्तिजापूर, अकोला, शेगाव, जळंब, नांदुरा, मलकापूर, बोदवड, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, अंकाई, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर, दौंड आणि कुर्डुवाडी येथे थांबा असेल. नागपूर व खामगाववरून अतिरिक्त गाड्या-२३ व २४ जुलै रोजी सकाळी ८.५० वाजता गाडी संख्या ०१२०५ नागपूर-मिरज स्पेशल रवाना होईल. परतीसाठी २४ व २५ जुलै रोजी गाडी संख्या ०१२०६ मिरज-नागपूर स्पेशल दुपारी १२.५५ वाजता सुटेल. तसेच २२ व २५ जुलै रोजी दुपारी १.३० वाजता गाडी संख्या ०११२१ खामगाव-पंढरपूर विशेष ट्रेन धावेल. परतीसाठी २३ व २६ जुलै रोजी सकाळी ५ वाजता गाडी संख्या ०११२२ पंढरपूर-खामगाव ट्रेन रवाना होऊन त्याच दिवशी संध्याकाळी ७.३० वाजता पोहोचेल.

## अंमली पदार्थ दिनानिमित्य दुचाकी रॅली

**खल्लार-** अंमली पदार्थ दिनानिमित्य ऑपरेशन कवच व हेल्मेट सक्ती संबंधाने पोलिस स्टेशन खल्लारच्या वतीने आज (दि. २६) ला खल्लार गावातून ते खल्लार फाट्यापर्यंत दुचाकी रॅली काढण्यात आली. या रॅलीत खल्लार पोलिस स्टेशनचे अधिकारी, अंमलदार, पोलिस कर्मचारी, होमगार्ड सहभागी झाले होते.



# नारायणपूर कापुसतळणी येथे बेकायदेशीर गोवंश मांस विक्री

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन हद्दीतील नारायणपूर (कापुसतळणी) येथे बेकायदेशीर पणे गोवंश मांसाची विक्री करणाऱ्या दोन तरुणांविरुद्ध पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत सुमारे ३५ किलो गोमांस आणि कत्तलीचे साहित्य जप्त करण्यात आले असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

२३ जून रोजी पोलीस पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली.

नारायणपूर येथील एका बंद शेडमध्ये शेख अयान हा गोवंश जनावराची कत्तल करून मांस विक्री करत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ कारवाई केली. पोलिसांनी पंचासह संबंधित शेडवर छापा टाकला असता, आरोपी ताडपत्रीवर मांसाचे तुकडे करून विक्री करताना रंगेहाथ आढळून



### दोघांवर गुन्हा दाखल, ३५ किलो मांस जप्त

आला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, सदर मांस बैलाचे असल्याचे त्याने कबूल केले. मात्र, ते जनावर कोठून आणले याबाबत आरोपी समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. त्यामुळे चोरी करून जनावराची कत्तल केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.घटनास्थळावरून पोलिसांनी ३५ किलो मांस व कत्तलीसाठी वापरण्यात आलेले साहित्य जप्त केले. जप्त केलेल्या मांसाचा नमुना सीलबंद करून पशुवैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे.या प्रकरणी आरोपी शेख अयान शेख जाहिर(वय २१, रा. नारायणपूर) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्यासह आणखी एका व्यक्तीवर अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम २०१५ चे कलम ५, ५(ब), ५(क), ९, ९(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार सूरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हेपोकाँ राहुल पिंपोळे, पोकाँ युवराज सोळंके व पोकाँ अंकुश सयाम करीत आहेत.

पशुवैद्यकीय अहवालानंतर कारवाईला अधिक गती मिळण्याची शक्यता आहे.


# प्रा.बी.टी.देशमुख सरांना भावपूर्ण श्रद्धांजली

**अमरावती/का.प्र.**

नांदगाव पेठ येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयात महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देणारे ज्ञानयोगी प्रा.बी.टी. देशमुख सरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी श्रद्धांजली सभा घेण्यात आली.सभा महाविद्यालयातील प्रा. बी.टी. देशमुख ज्ञान स्त्रोत केंद्रात आयोजित करण्यात आली.प्रारंभी प्रा.बी.टी.देशमुख सरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळत श्रद्धांजली वाहिली.

त्यानंतर मान्यवरांनी त्यांच्या शैक्षणिक कार्याचा आणि विदर्भाच्या सिंचन अनुशेषासाठी केलेल्या संघर्षमय योगदानाचा गौरव केला.

सभेच्या अध्यक्षस्थानी स्व.दत्तात्रय पुसदकर शिक्षण संस्थेचे अध्यक्षा वृषाली पुसदकर या होत्या.यावेळी डॉ.गोविंद तिरमनवार यांनी आपल्या मनोगतातून प्रा.बी.टी.देशमुख



सरांच्या शैक्षणिक कार्यासंदर्भात सविस्तर माहिती देतांना बी.टी.सरांनी शिक्षकांच्या हक्कासाठी केलेल्या कार्याची आठवण करून दिली. महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.विकास अडलोक यांनी महाविद्यालयातील ग्रंथालयाला २१ ऑगस्ट २०१८ रोजी प्राध्यापक बी.टी. देशमुख ज्ञानस्त्रोत केंद्र असे जे नाव देण्यात आले होते त्या प्रसंगाविषयी आणि नामकरण सोहळयाविषयी उपस्थितांना माहिती दिली.

याप्रसंगी त्यांनी बी.टी. देशमुख सरांचे नाव असलेल्या ग्रंथालयाची गरिमा कायम ठेवणार असल्याचे सांगितले. महाविद्याल याचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांनी प्रा. बी.टी. सरांनी विदर्भातील सिंचन अनुशेषासाठी केलेल्या कार्याविषयी माहिती दिली. बी.टी. सरांसोबत महाविद्यालयाचे संस्थापक सोमेश्वरभाऊ पुसदकर यांनी विदर्भाचा सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी व अप्पर वर्धा धरणाचे पाणी वाचविण्यासाठी केलेला संघर्ष आणि दिलेला न्यायालयीन लढा याविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाला स्व.दत्तात्रय पुसतकर शिक्षण संस्थेचे संचालक रेवन पुसदकर, महाविद्यालयातील प्रा. डॉ. पी.आर.जाधव,डॉ.राजेश ब्राह्मणे, डॉ.श्रीकांत माहुलकर, डॉ.सुनिता बाळापुरे,डॉ.सुभाष पवार, डॉ.पंकज मोरे शिक्षकेतर कर्मचारी रेखाताई पुसतकर, दिलीप पारवे, विनायक पावडे ,राहुल पांडे, अनिल शेवतकर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष निदान बारस्कर, सचिव श्रीकृष्ण बाळापुरे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर हिवसे यांचे मार्गदर्शन लाभले.

# चांदूरबाजार तालुक्यात ,पावसाची दमदार हजेरी

**चांदूरबाजार/ वार्ताहर**

सर्व हवामान तज्ञांचे अंदाज खोटे ठरवत,तालुक्यात आद्राच्या पावसाने चोर पावलांनी प्रवेश केला . मंगळवारी सायंकाळी पाचच्या सुमारास, तालुक्यात पावसाने दमदार एन्ट्री घेतली.अंदाजे ३० मिनिटे तालुक्यात, सर्व दूर धुंवाधार पाऊस झाला. त्यानंतर मध्यरात्री पर्यंत सारखा पाऊस सुरूच होता.

एल नीनो च्या वातावरणात पावसाबद्दल शासंक असलेल्या, शेतकऱ्यांसह बाजारपेठेत सर्वदूर आनंदी वातावरण निर्माण झाले आहे.

जून महिन्यात २५ जून पर्यंत सरासरी, ९४ मी.मी.इतका पाऊस झाला आहे.हा पाऊस मागिल दहा दिवसांत झाला असून, २४ व २५ जून या दोन दिवसांत सरासरी ५६ मी.मी.इतका पाऊस झाला आहे. परिणामी गुरुवार सकाळपासूनच, शेतकऱ्यांमध्ये पेरणीची लगबग सुरू झाली आहे.सध्या तालुक्यात कापूस व तूर या दोन पिकांची,पेरणी जोरात सुरू झाली आहे. मात्र सोयाबीन पेरणी साठी, शेतकऱ्यांना अद्यापही चांगल्या पावसाची प्रतीक्षा आहे.

शासनाने व कृषी विभागाने आवाहन केल्यानंतर ही, तालुक्यातील शेतकऱ्यांनी धुळ पेरणी केली होती. तालुक्यात अंदाजे २० टक्के



### धुळ पेरणी साधली; कापूस व तूर पेरणीची लगबग

धुळपेरणी करण्यात आली होती.पावसाच्या ओढी मुळे झालेली ही धुळ पेरणी , साधरणार की दुबार पेरणीची वेळ येणार.या बाबत कृषी विभागच नव्हे तर, स्वतः शेतकरी ही शासंक होते.मागील दोन दिवसांत झालेल्या चांगल्या पावसाने, तालुक्यात झालेली २० टक्के धुळ साधली आहे. त्यामुळे शेतकरीच नव्हे तर,कृषी विभागाने ही सुटकेचा श्वास सोडला आहे.

तालुक्यात २३ व २४ जून या दोन दिवसांत,सरासरी ५६ मी.मी.इतका पाऊस झाला.

यात सर्वाधिक पाऊस बेलोरा महसूल मंडळात झाला आहे.तर सर्वात कमी पाऊस तळेगाव मोहना मंडळात झाला आहे.या दोन दिवसांत मंडळ निहाय झालेला पाऊस या प्रमाणे आहे. चांदूरबाजार (५२.५ मी.मी.),बेलोरा (८२.मी.मी.), करजगांव (६२.८ मी.मी.),आसेगांव (५७.३ मी.मी.),तळेगांव मोहना ( ३५.६ मी.मी.), शिरजगांव कसबा ( ५७.८ मी.मी.),ब्राम्हणवाडा थडी ( ४५ मी.मी.) इतक्या पावसाची नोंद झाली आहे. १ जून ते २५ जून दरम्यान तालुक्यात,९४ . १ मी.मी.इतक्या पावसाची नोंद झाली आहे.या तारखेपर्यंत झालेल्या पावसाची २५ जून पर्यंतची, एकूण सरासरी ही १०१ टक्के इतकी नोंदविली गेली आहे.हे विषेश.मागील १० ते १२ दिवसांत, तालुक्यात ८० .७ मी.मी. इतका पाऊस झाला आहे.त्यामुळे खरीपाच्या पेरणीला चांगलाच वेग आला आहे.पावसाच्या येण्यात असेच सातत्य राहीले तर , येत्या १५ दिवसांत खरीपाची पेरणी पूर्ण होईल.

# प्रा.बी.टी देशमुख यांच्या लक्षवेधीने ३२ हजार रुपयांची तरतूद १३ कोटी रुपयांवर गेली

प्रा.बी.टी देशमुख यांनी आपल्या ३० वर्षाच्या आमदारकीच्या काळामध्ये अमरावती विभागातील मूलभूत सुविधा,शिक्षण,जलसिंचन अनुशेष,पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा योजना व पदवीधरांचे प्रश्न सभागृहामध्ये मांडले. त्यांचे विधान परिषदेमधील कार्य आजच्या पिढीला व लोकप्रतिनिधींना मार्गदर्शक ठरणारे आहे. आजच्या काळात लोकप्रतिनिधी निधी मिळत नाही या कारणावरून जन्मदात्या राजकीय पक्षाला रामराम ठोकतात.यावेळेस सभागृहातील लोकप्रतिनिधी सक्षम,प्रामाणिक व अभ्यासू असेल तर त्यांची एक लक्षवेधी सरकारला निधी देण्यास भाग पाडते हे प्रा.बी.टी.देशमुख यांच्या सभागृहातील कार्यावरून लक्षात येते.

आज अमरावतीकर जे पाणी पितात त्याचे श्रेय आदरणीय बी.टी भाऊंना आहे असे म्हटल्यास चूक ठरणार नाही.पाण्याअभावी मानवाच्या अनेक वस्त्या विस्थापित झाल्या.तीच वेळ अमरावती शहरावर सुद्धा येणार होती. १९८२ ते १९८९ हा काळ अमरावतीकरांसाठी पिण्याच्या पाण्याच्या संघर्षाचा राहिला आहे.तेव्हा लोकसंख्या होती ४ लाख, आता ही लोकसंख्या दहा लाखाच्या जवळपास पोहचली आहे. अमरावती शहराच्या आसपास पाचशेच्या वर बोर करून या शहराचा पाणीपुरवठा होत होता. वडाळी,पेढी,पूर्णा या नदीचे प्रवाह आटायला लागले होते. या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचा दुर्भिक्षामुळे अमरावती शहरातील लोकसंख्या हलविण्याचा दुर्दैवी प्रसंग या शहरावर येण्याची शक्यता होती.याबाबतचे शासकीय दप्तरातील दोन अधिकृत पुरावे प्रा. बी.टी देशमुख यांनी सभागृहाला सादर केले.१)१४ जानेवारी १९८६ ला नगर विकास मंत्री यांनी मा. मुख्यमंत्री यांना पत्र लिहून कळवले की,या दोन-तीन वर्षांमध्ये आपण अप्पर वर्धा धरणातून पाणीपुरवठा देण्याचे काम व्यवस्थितरित्या पूर्ण करू शकलो नाही तर शहराची लोकसंख्या हलवावी लागणार. तिला पुरेसा पाणीपुरवठा होणार नाही.२)१९ जून १९८६ रोजी प्रा. बी.टी देशमुख यांनी सभागृहात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना नगर विकास मंत्री श्री सुब्रमण्य यांनी खालील प्रमाणे कबुली दिली.'परिस्थिती नेमकी काय आहे, हे मला पूर्णपणे समजते. या विषयाचे गांभीर्यही माझ्या लक्षात आले आहे;दुर्दैवाने,आजवर आपण याबाबतीत पुढे जाऊ शकलेलो नाही.मी तुम्हाला खात्री देऊ इच्छितो की,या गोष्टीकडे आम्हाला त्वरित लक्ष द्यावे लागेल;कारण तसे न केल्यास,कदाचित संपूर्ण शहर रिकामे करण्याची वेळ ओढवू शकते.'

अमरावती शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. भाई सुदाम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली कृती समितीचे गठन झाले होते. उपाध्यक्ष दादासाहेब उर्फ रा.सू गवई,भाई रामदास पाटील, सचिव श्याम देशपांडे तत्कालीन आमदार डॉ. देवीसिंह शेखावत,डॉ.अनिल वऱ्हाडे, बाळासाहेब मराठे ही मंडळी कृती समिती सोबत होती.अमरावती शहरांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी मोठा जनसंघर्ष उभा राहिला.

१९८८-८९ मध्ये नगर विभाग विकास विभागाने अंदाजपत्रकामध्ये ५५ कोटी रुपयांची 'अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजना' दाखवण्यात आली व काम पूर्ण करण्याची वर्ष मार्च १९९१ नमूद केले होते. अमरावती शहराच्या ५५ कोटी रुपयांच्या योजनेला फक्त ३२ हजार रुपयांची तरतूद या अंदाजपत्रकामध्ये दाखविण्यात आली होती. या कृतीमुळे अमरावती विभागातील लोकप्रतिनिधीमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती.

**भाऊंनी लक्षवेधी लावली :**



१९८८ च्या अंदाजपत्रकी अधिवेशनामध्ये '३२ हजाराची गोष्ट' तपशीलवार मांडून झाली होती पण मंत्री महोदय कोणत्या सभागृहात उत्तर देत नव्हते. मंत्री महोदयांना प्रश्नोत्तरे टाळता येणार नाही अशा संसदीय आयोगाचा वापर करून १९ एप्रिल १९८८ रोजी च्या कामकाज पत्रिकेवर प्रा.बी.टी देशमुख व श्री पु.ब.सोमवंशी यांची लक्षवेधी सूचना स्वीकृत झाली.लक्षवेधी सूचना लागल्यामुळे मंत्रिमहोदयांची फजिती होईल,अधिकाऱ्यांना धारेवर धरले जाईल हे लक्षात घेऊन १९ एप्रिल ला सकाळी पाणीपुरवठा मंडळातील एक ज्येष्ठ अधिकारी जे आधी अमरावतीला होते, त्यांनी भाऊंची भेट घेतली.त्यांनी आपण मंत्री महोदयांना सकाळीच ब्रीफिंग करून एक कोटी ७८ लाख रुपये निधी उपलब्ध असल्याचे सांगून या वर्षात १३ कोटी रुपये या योजनेवर खर्च करण्याची नियोजन करू शकतो,असे बी.टी भाऊंना सांगितले. भाऊंनी तुमचे मंत्री महोदय हे सभागृहात कबूल करतील काय?असे विचारले.त्यावर अधिकाऱ्याने सांगितले 'तुमचे समाधान होत असेल तर १३ कोटी रुपये यावर्षी खर्ची पडावे असे आश्वासन मंत्री महोदयांनी द्यावे म्हणून आम्ही प्रयत्न करतो,सभागृहात आमची फजिती होणार नाही एवढी तुम्ही पहा.'भाऊ म्हणाले 'केवळ सभागृहात कोणाची फजिती करणे यात आम्हाला काय आनंद आहे?१३ कोटी रुपये या वर्षात अमरावती पाणीपुरवठा योजनेवर खर्च होणार असेल तर ती समाधानाची गोष्ट आहे.'

त्याच दिवशी सभागृहामध्ये भाऊंनी मंत्री महोदयांना प्रश्न केला की,'५५ कोटीच्या योजनेसाठी ३२ हजार रु. आता या वर्षासाठी मंजूर करण्यात आले तर येत्या ५५ वर्षामध्ये तरी ही योजना पूर्ण होईल कि नाही याची शंका आहे.' नगर विकास मंत्री डॉ.सुब्रम्हण्यन यांनी '५५ कोटी रुपयांच्या या योजनेमधील १३ कोटींची आपण तरतूद केली आहे.'असे सांगितले.अश्याप्रकारे ३२ हजाराची गोष्ट,१३ कोटीवर गेली.

**दहा टक्के लोकवर्गणीचा प्रश्न :**

सदर पाणीपुरवठा योजनेकरिता दहा टक्के लोकवर्गणीची अट सरकारने ठेवली. ती अट १३ दिवसामध्ये बदलविण्यासाठी सभागृहात प्रा.बी.टी.देशमुख ,भाई सुदामकाका देशमुख ,दादासाहेब गवई ,दे.मा.कराळे ,बाबासाहेब सोमवंशी ,डॉ.अनिल वऱ्हाडे व डॉ.देवीसिंह शेखावत यांनी सरकारला भाग पाडले.२ ऑगस्ट १९८७ रोजी विदर्भ महाविद्यालयाजवळ या योजनेचा भूमीपूजन समारंभ पार पडला.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री शंकरराव चव्हाण यांचे हस्ते पार पडला.त्यावेळेला मुख्यमंत्री म्हणाले 'या दोन देशमुखांमुळे अमरावतीचा पाण्याचा प्रश्न सुटत आहेत. एक विधान परिषदेमध्ये बी.टी.देशमुख व विधानसभेमध्ये सुदाम देशमुख. हे दोघेही आम्हाला स्वस्थ बसू देत नाहीत.' मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले कि दहा टक्के लोकवर्गणी ची अट काढून टाकण्यात येत आहे. अश्या प्रकारे अमरावतीची पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना कार्यान्वित झाली.

एक जागृत लोकप्रतिनिधींची पिढी येणाऱ्या दहा पिढ्यांसाठी सुरक्षित जीवन निश्चित करते.हेच कार्य भाऊंनी सभागृहात केले .अमरावती च्या किमान दहा पिढ्यातरी भाऊंना विसरणार नाही.

१९९६ साली राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र तर्फे महाराष्ट्र विधान परिषदेतील पहिला 'उत्कृष्ट संसदपटू'पुरस्काराने प्रा.बी.टी.देशमुख यांना सन्मानित करण्यात आले.महाराष्ट्र विधानमंडळाच्या अमृत महोत्सवानिमित्त 'नोंदी: विधानमंडळातील निवडक भाषणे' या ग्रंथामध्ये प्रा.बी.टी.देशमुख यांचा परिचय खालील प्रमाणे देण्यात आला.

प्रा.बी.टी.देशमुख १९८० ला विधानपरिषदेवर प्रथम निवडून आले आणि शिक्षकांचे प्रश्न किती आक्रमकपणे मांडता येतात याचे दर्शन सभागृहाला झाले. विषय कोणताही असो बी.टी.भाऊ उभे राहिले की जेष्ठ मंत्री ही त्यांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकत असत. अचूक तपशील आणि आकडेवारी या जोरावर प्रा. देशमुख आपला युक्तिवाद एवढा प्रभावी करत की शासनाला त्याकडे गंभीरपणे लक्ष देणे अनिवार्य होत असे. शिक्षकांची वेतनश्रेणी,विकासाचा अनुशेष आणि अमरावती विभागातील पायाभूत सुविधांची कामे याबाबत बोलताना प्रा. देशमुख यांची वाणी अधिक धारदार होत असे. अनेकदा आपल्याकडील तपशील सभागृहासमोर मांडताना प्रा. देशमुख कालमर्यादेकडे लक्ष ठेवू शकत नसत.अशावेळी इतर सदस्य आपल्या वाट्याचा वेळ त्यांना देऊन त्यांचे भाषण सुरू ठेवण्याची विनंती पिठासीन अधिकाऱ्यांना करीत.प्रा. देशमुख सतत तीस वर्षे सभागृहात असूनही त्यांनी एकदाही कोणाबद्दल वैयक्तिक कटू उल्लेख केला नाही. विधिमंडळाच्या बाबतीत त्यांचे वर्णन अजातशत्रू असे करता येईल.

**डॉ.महेंद्र वि.मेटे**
संपादक, नुटा बुलेटीन
अमरावती
मो.९४२१७३९९९६

# विवाह ठरवतांना...

आजच्या काळात विवाहाबाबत समाजात दोन टोकाच्या प्रवृत्ती दिसून येतात. एकीकडे काही जण विवाहाला केवळ एक सामाजिक औपचारिकता समजतात, तर दुसरीकडे काही जण अवास्तव अपेक्षांच्या ओझ्याखाली नातेसंबंध गुदमरवून टाकतात. प्रत्यक्षात विवाह हा ना केवळ उत्सव आहे, ना केवळ कायदेशीर बंधन; तो दोन व्यक्ती, दोन कुटुंबे,दोन संस्कार आणि दोन आयुष्यांचा जबाबदारीपूर्ण प्रवास आहे.या प्रवासात प्रेमाइतकीच विश्वास, समजूतदारपणा, संयम आणि त्यागाची आवश्यकता असते.

वकील आणि विवाहपूर्व-विवाहोत्तर समुपदेशक म्हणून काम करताना अनेक वैवाहिक वाद जवळून पाहण्याची संधी मिळाली.त्या अनुभवातून एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते की,बहुतांश संसार मोठ्या कारणांमुळे तुटत नाहीत.'माझे कोणी ऐकत नाही','माझ्या भावनांचा आदर होत नाही','मला समजून घेतले जात नाही' अशा छोट्या वाटणाऱ्या भावना मनात साचत जातात आणि एक दिवस नात्यात दरी निर्माण होते.

म्हणूनच विवाह ठरवताना फक्त समोरची व्यक्ती आवडते का,एवढाच विचार करू नका.ती व्यक्ती संकटाच्या वेळी खंबीरपणे उभी राहील का?मतभेद असतानाही संवाद साधेल का? आपल्या कुटुंबाचा आदर करेल का?आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आयुष्यभराची जबाबदारी स्वीकारण्यास तयार आहे का? हे प्रश्न स्वतःला विचारणे आवश्यक आहे.

आज सोशल मीडियाच्या युगात अनेकदा लोक व्यक्तीपेक्षा तिच्या प्रतिमेच्या प्रेमात पडतात. आकर्षक फोटो, महागडी जीवनशैली आणि बाह्य यश यामुळे वास्तव झाकले जाते. पण संसार हा फिल्टरशिवाय जगायचा असतो. तिथे सौंदर्यापेक्षा सहनशीलता, पैशापेक्षा परस्पर आदर आणि दिखाव्यापेक्षा विश्वास अधिक महत्त्वाचा ठरतो.म्हणूनच जोडीदार निवडताना व्यक्तिमत्त्वाचा पाया मजबूत आहे का,हे पाहणे आवश्यक आहे.



आर्थिक बाबींवरही विवाहपूर्वी स्पष्ट चर्चा होणे गरजेचे आहे.उत्पन्न किती आहे यापेक्षा आर्थिक सवयी कशा आहेत,बचत करण्याची वृत्ती आहे का,कर्ज आहे का,जबाबदाऱ्या कोणत्या आहेत, हे अधिक महत्त्वाचे असते.आर्थिक बाबतीत पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा असेल तर अनेक भविष्यातील वाद टाळता येऊ शकतात.

विवाहानंतर दोन वेगळ्या संस्कारांच्या व्यक्तींना एकत्र जगायचे असते. त्यामुळे मतभेद होणे स्वाभाविक आहे. परंतु मतभेद म्हणजे नाते संपण्याचे कारण नसते. उलट मतभेद समजून घेऊन त्यावर मार्ग काढण्याची क्षमता हेच यशस्वी वैवाहिक जीवनाचे खरे लक्षण आहे. अनेक जोडपी अशी पाहिली आहेत की ज्यांनी योग्य वेळी मनमोकळा संवाद साधला असता, तर कदाचित त्यांना न्यायालयाची पायरी चढावी लागली नसती.

संवाद थांबतो तेव्हा शंका वाढतात,शंका वाढतात तेव्हा अंतर वाढते आणि अंतर वाढले की नात्याची उब हरवते. म्हणूनच संवाद हा कोणत्याही वैवाहिक नात्याचा प्राण आहे. ज्या घरात संवाद जिवंत असतो,तिथे मोठ्यात मोठे प्रश्नही सोडवले जाऊ शकतात.

याहूनही महत्त्वाची बाब म्हणजे मुले. पती-पत्नी विभक्त होण्याचा निर्णय घेतात, पण त्याचे सर्वात गंभीर परिणाम मुलांवर होतात. ज्यांचा त्या वादात काहीही दोष नसतो,ती मुले मानसिक तणाव, असुरक्षितता आणि भावनिक जखमा घेऊन मोठी होतात.काही मुलांचे बालपण कोर्टाच्या तारखांमध्ये हरवते, तर काहींचा नातेसंबंधांवरील विश्वास कायमचा ढासळतो.म्हणूनच विवाहाचा निर्णय घेताना केवळ आजचा आनंद पाहू नका;पुढील तीस-चाळीस वर्षांचे आयुष्य डोळ्यासमोर ठेवा.फक्त लग्नाचा दिवस सुंदर असणे महत्त्वाचे नाही, तर संपूर्ण वैवाहिक जीवन सुंदर असणे महत्त्वाचे आहे.

कारण शेवटी, योग्य जोडीदार निवडणे म्हणजे केवळ स्वतःचे भविष्य ठरवणे नाही;तर आपल्या होणाऱ्या मुलांचे, कुटुंबाचे आणि समाजाचे भविष्य घडवणे आहे.भावना आणि वास्तव यांचा समतोल साधा. प्रेम करा, पण विचारपूर्वक करा. विश्वास ठेवा,पण जबाबदारीने ठेवा.कारण यशस्वी विवाह हे नशिबाने घडत नाहीत; ते समजूतदार निर्णय, परस्पर आदर, संयम आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांनी घडवावे लागतात.

**ॲड. धनंजय देशमुख**
विवाहपूर्व व विवाहोत्तर समुपदेशक
मो.९२८४३८२१०२

# आपले काही चुकत तर नाही ना ?

नुकतीच पुण्याच्या एका तरुणीने आपल्या होणाऱ्या नवऱ्याचा कट कारस्थान करून घात केल्याने संपूर्ण देश हादरला. नेमक काय झाले ह्याची सविस्तर माहिती काही दिवसात कळेलच. परंतु प्राथमिक माहिती नुसार आपल्या गर्भ श्रीमंत, सुंदर, देखण्या तरुण होणाऱ्या नवऱ्याचा त्याच्या होणाऱ्या पत्नीने घात केला.या प्रकरणाने प्रश्न तरुणांपासून जेष्ठ नागरिकांपर्यंत घडलेल्या घटनेबद्दल घोंगावत आहेत.तर मुलाच्या आई-वडिलांना काय वाटत असेल? त्याच्या नातेवाईकांना काय वाटत असेल? त्यांच्यावर किती मोठा दुःखाचा डोंगर कोसळला असेल? हल्ली असे प्रकार फार वाढीस लागलेले आहते. ह्याची कारण मीमांसा समाजाच्या दृष्टिकोनातून होणे फार गरजेचे आहे. हल्ली तरुणाई कुठल्या टप्प्यावर आहे ? कुठल्या परिस्थितीतून जात आहे ? त्यांचे प्रश्न समजून घेण्याची गरज आहे. ते का टोकाची भूमिका घेतात ? जन्मदाते आई-बाबा त्यांना जवळचे का वाटत नाही ? का त्यांना घर सोडावेसे वाटते ? कुठले संस्कार कमी पडतात ? आई-बाबा कुठे कमी पडतात ?भारत देश हा तरुणांचा देश आहे. तरुणाई ही आपली ऊर्जा, शक्ती व संपत्ती आहे. ही मेख आपण संपूर्ण विश्वात मिरवितो पण त्याची वास्तविकता काय आहे? का सुजाण तरुणाई घडत नाही आहे. ह्याला काही अपवाद असतील ते पण फार नगण्यच. समाजात अजूनही मोठेपणा, बडेजावपणा आहे. ह्या मोठेपणाचा सुद्धा समाजावर विपरीत परिणाम पडत असतो. पिढी बदल आहे. जेनरेशन गॅप मोठी आहे. संवादात मोठी दरी आहे. समजुदारपणाचा फार मोठा अभाव आहे. आपण जो निर्णय घेणार आहोत त्याचा आपल्यावर, दुसऱ्यावर, कुटुंबावर व समाजावर काय परिणाम होईल? ह्याचा काहीच विचार केला जात नाही.तरुणाईला योग्य त्या रोजगारात गुंतवून ठेवण्याची गरज आहे. ह्याला रोजगार नाही मिळाला तर मग तो गुन्हेगारीत, प्रेम प्रकरणात तसेच व्यसनाकडे वळतो व आयुष्यभर दारू पिऊन स्वतःला संपवितो. तरुणाई एकतर स्वतःला संपवीत आहे नाही तर दुसऱ्याला तरी.

**अरविंद सं. मोरे,**
मो. ९८२०८२२८८२

# आण्विक निदानःसंसर्गजन्य रोगांविरूद्धच्या लढ्यातील एक शक्तिशाली शस्त्र

कोविड-१९ च्या महामारीने जगाला एक महत्त्वाचा धडा शिकवला: वेळेवर आणि अचूक निदान केल्याने लोकांचे प्राण वाचू शकतात. कोविड-१९, क्षयरोग, डेंग्यू, हिपॅटायटीस, इन्फ्लूएंझा किंवा इतर कोणतेही नवीन उद्भवणारे संसर्ग असोत, रोगाची त्वरित ओळख पटवणे हे प्रभावी उपचार आणि प्रतिबंधाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. या संदर्भात, मॉलिक्युलर डायग्नोसिस (आण्विक निदान) ही आधुनिक आरोग्य सेवेतील सर्वात महत्त्वाची प्रगती म्हणून समोर आली आहे.

**समाजासाठी फायदे**

अचूक निदानामुळे केवळ वैयक्तिक रुग्णांनाच फायदा होतो असे नाही, तर यामुळे आरोग्य व्यवस्था देखील बळकट होते.हे अँटीबायोटिक्सचा अनावश्यक वापर कमी करते, रोगांच्या साथीवर लक्ष ठेवण्यास मदत करते, लसीकरण मोहिमांना पाठबळ देते आणि सार्वजनिक आरोग्य नियोजनात सुधारणा करण्यास हातभार लावते.भारतासारख्या देशामध्ये, जेथे संसर्गजन्य आजार हे अजूनही आरोग्यापुढील एक मोठे आव्हान आहे, तिथे मॉलिक्युलर डायग्नोस्टिक्स आजारांच्या निरीक्षणात सुधारणा करण्यासाठी आणि वेळेवर वैद्यकीय उपचार सुनिश्चित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे पी. जी डिप्लोमा इन मॉलिक्युलर डायग्नोसिस ऑफ इन्फेक्शियस डिसीजेस अभ्यासक्रम**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या पुढाकाराने विविध प्राधिकारिणींच्या मान्यतेने आरोग्य क्षेत्रात करिअरसाठी सज्ज व्यावसायिक घडवण्यासाठी पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॉलिक्युलर डायग्नोसिस ऑफ इन्फेक्शियस डिसीजेस (संसर्गजन्य आजारांचे मॉलिक्युलर निदान यातील पदव्युत्तर पदविका) हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. विद्यापीठाच्या प्रगत सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नोसिस अँड रिसर्च द्वारे संचलित हा विशेष अभ्यासक्रम, शैक्षणिक लाईफ सायन्सेस (जीवन विज्ञान) आणि सध्या मोठ्या प्रमाणावर मागणी असलेल्या क्लिनिकल डायग्नोस्टिक्स (वैद्यकीय निदान क्षेत्र) मधील दरी सांधण्याचे काम करेल.

जागतकि आरोग्य यंत्रणा साथीच्या आजारांचा मुकाबला करण्यासाठी आणि रुग्णांच्या गुंतागुंतीच्या उपचारांचे व्यवस्थापन करण्यासाठी वेगाने आणि अचूकपणे केल्या जाणाऱ्या अनुवांशिक ओळखीवर अधिकाधिक अवलंबून आहे. पारंपारिक चाचणी पद्धतींची जागा आता हाय-थ्रुपुट मॉलिक्युलर वर्कफ्लो (उच्च क्षमतेच्या अत्याधुनिक मॉलिक्युलर कार्यपद्धती) घेत आहेत. हा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमथेट बाजारातील गरजांशी सुसंगत आहे, ज्यामुळे पदवीधरांना आधुनिक निदान प्रयोगशाळा, सार्वजनिक आरोग्य संस्था आणि फार्मास्युटिकल (औषध निर्माण) संशोधन केंद्रांमध्ये स्पर्धात्मक आघाडी मिळते.

हा अभ्यासक्रम सर्वसमावेशक प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यासाठी विशेष पायाभूत सुविधांचा वापर करतो. विद्यार्थी केवळ पुस्तकी सिद्धांतांपलीकडे जाऊन उद्योगासाठी आवश्यक असलेल्या प्रमाणित कार्यपद्धतींमध्ये प्राविण्य मिळवतात. ज्यामध्ये प्रगत प्रयोगशाळा जैवसुरक्षा, कडक जैवसुरक्षा पातळीचे व्यवस्थापन, निर्जंतुक नमुने गोळा करण्याचे तंत्र आणि नमुन्यांच्या अचूक साठवणुकीचे व्यवस्थापन यात प्राविण्य. न्यूक्लिक ॲसिड तंत्रज्ञान डी.एन.ए. आणि आर.एन.ए. काढण्यासाठी मॅन्युअल आणि ऑटोमेटेड दोन्ही कार्यपद्धतींचा सर्वसमावेशक प्रत्यक्ष अनुभव.रिअल-टाइम पीसीआर आणि आरटी-पीसीआर, विविध प्राइमर केमिस्ट्री, थर्मल सायकल्स आणि व्हायरल लोडचे प्रमाण मोजण्याचे सखोल प्रात्यक्षिक ज्ञान. डेटा विश्लेषण आणि साथीच्या आजारांचा मागोवा घेणे, रुग्णांच्या निदान प्रणालीचे विश्लेषण, गुणवत्ता नियंत्रण तपासणी आणि विषाणूंच्या बदलत्या स्वरूपाचा मागोवा घेण्याचे सखोल प्रशिक्षण.

**करिअरच्या संधी आणि उद्योगातील मागणी**

या अभ्यासक्रमाचे पदवीधारक सरकारी आणि खाजगी लाईफ सायन्स (जीवन विज्ञान) क्षेत्रातील विविध प्रकारच्या तत्काळ उपलब्ध नोकऱ्यांसाठी सज्ज होतात,जसे की,मॉलिक्युलर डायग्नोस्टिक्स स्पेशालिस्ट,मेट्रोपोलिस लॅब्स किंवा अपोलो डायग्नोस्टिक्स सारख्या कॉर्पोरेट प्रयोगशाळांच्या जाळ्यांमध्ये काम करणे, रिसर्च असोसिएट, प्रगत वैद्यकीय चाचणी केंद्र, किंवा विद्यापीठांच्या मुख्य संशोधन सुविधांमध्ये संशोधन सहाय्यक म्हणून कार्य करणे. तांत्रिक सल्लागार, जागतिक बायोटेक कंपन्यांसाठी मॉलिक्युलर उपकरणांच्या उत्पादन विक्री आणि लॉजिस्टिक व्यवस्थेचे व्यवस्थापन करणे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी, प्रादेशिक पातळीवर पसरणाऱ्या आजारांचा मागोवा घेणे किंवा आरोग्याच्या आणीबाणीच्या काळात राज्य रोगराई नियंत्रण पथकांना मदत करणे.


**संस्थात्मक उत्कृष्टता सीएमडीआरचा फायदाः**

विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान आयोगाची पूर्ण मान्यता आहे. कोविड-१९ महामारीच्या काळात, विद्यापीठ आणि जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने विद्यापीठ आवारात कोविड-१९ मॉलिक्युलर डायग्नोस्टिक लॅबोरेटरी (आण्विक निदान प्रयोगशाळा) म्हणून सीएमडीआरची स्थापना करण्यात आली. अमरावतीमधील आयसीएमआर द्वारे संनियंत्रित केलेली ही एकमेव शासकीय मान्यताप्राप्त प्रयोगशाळा आहे. या प्रयोगशाळेने आतापर्यंत ५ लाखांपेक्षा जास्त नमुन्यांची तपासणी केली असून, कोविडच्या दुसऱ्या लाटेदरम्यान दररोज ३००० नमुन्यांची तपासणी करण्याची या प्रयोगशाळेची क्षमता होती. ही प्रयोगशाळा आता इतर श्वसनसंस्थेशी संबंधित विषाणूंचीही तपासणी करते.विद्यापीठातील सीएमडीआर उत्कृष्ट शैक्षणिक पायाभूत सुविधांनी परिपूर्ण असून अत्याधुनिक उपकरणे, मोठ्या वैद्यकीय केंद्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अचूक निदान प्रणालींवर थेट काम करण्याची संधी या ठिकाणी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना नॉलेज रिसोर्स सेंटर, विस्तृत शैक्षणिक ग्रंथालये आणि कॅम्पसवरील हक्काच्या हॉस्टेल (वसतिगृह) सुविधेचा पूर्ण लाभ मिळेल. याशिवाय अनुभवी मार्गदर्शक, आंतरराष्ट्रीय संसर्गजन्य रोग संशोधनाचा दांडगा अनुभव असलेल्या वरिष्ठ लाईफ-सायन्स प्राध्यापकांच्या थेट मार्गदर्शनाखाली अभ्यास करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळेल.

**प्रवेशासंबंधी माहिती**

या अभ्यासक्रमासाठी मायक्रोबायोलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, झूलॉजी, बायोकेमिस्ट्री, जेनोमिक सायन्सेस, ॲग्रीकल्चर, व्हेटर्नरी सायन्सेस, फिशरीज सायन्सेस, फार्मसीमध्ये प्रथम श्रेणीसह एम.एस्सी. पदवी; किंवा बायोटेक्नॉलॉजीमध्ये एम.टेक. किंवा एमबीबीएस, बीडीएस अथवा वैद्यकीय विद्याशाखेतील कोणतीही पदवी धारण केलेले उमेदवार पात्र आहेत. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे त्यांनी प्रवेशाचे सविस्तर वेळापत्रक, अर्ज करण्याची पद्धत आणि शुल्काचा तपशील यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अधिकृत पोर्टलला भेट द्यावी किंवा dir.cmdr@sgbau.ac.in या ई-मेलवर थेट विभागाशी संपर्क साधावा. तरी ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे त्यांनी ऑनलाईन अर्ज https://sgbauadm.samarth.edu.in वर करून आपला प्रवेश आधीच निश्चित घ्यावयाचा आहे. या केंद्राचे संचालक म्हणून डॉ. प्रशांत ठाकरे तर उपसंचालक डॉ. निरज घनवटे आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्याशी संपर्क साधता येईल.





डॉ. नीरज घनवटे डॉ. प्रशांत ठाकर

# शिक्षण व्यवस्थेच्या अपयशाविरोधात खा. राहुल गांधी यांचा 'कोटा'तून देशव्यापी एल्गार

## प्रश्नपत्रिका फुटी, परीक्षा घोटाळे, बेरोजगारी आणि भरतीतील विलंबावर सरकारला धरले धारेवर

■ प्रतिनिधी | अकोला ■

देशातील शिक्षण व्यवस्था आणि रोजगार प्रक्रियेसमोरील गंभीर संकटाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने राज्यव्यापी जनजागृती अभियान सुरू केले असून, विद्यार्थ्यांचे प्रश्न, परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचार आणि युवकांच्या भविष्याशी सुरू असलेला अन्याय जनतेसमोर आणण्यासाठी जिल्ह्यात व्यापक आंदोलनात्मक कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश तायडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी महानगर काँग्रेस अध्यक्ष महेंद्र गवई, बबनराव चौधरी, प्रशांत पाचडे, अतुल अमानकर, सुनील वानखेडे, प्रशांत प्रधान, योगेश पाटील, तश्वर पटेल, दीपक गवई, हर्षित दामोदर, नंदकिशोर काळे उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप



देशातील लाखो विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे उमेदवार आणि नोकरीच्या प्रतीक्षेत असलेले युवक आज प्रचंड असुरक्षिततेच्या वातावरणात जगत आहेत. प्रश्नपत्रिका फुटी, परीक्षा रद्द होणे, निकालातील गोंधळ, भरती प्रक्रियेतील विलंब, रिक्त पदे न भरणे आणि वाढती बेरोजगारी यामुळे तरुणांच्या भविष्याशी अक्षरशः खेळ सुरू असल्याचा गंभीर आरोप प्रकाश तायडे यांनी केला. केंद्र सरकारच्या निष्क्रिय आणि दिशाहीन धोरणांमुळे शिक्षण व रोजगार क्षेत्रात अभूतपूर्व अराजकता निर्माण झाली असून, त्याचा सर्वाधिक फटका सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना बसत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना तायडे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका करत, NEET, NTA, CBSE, PSC, VYAPAM यांसारख्या संस्थांच्या वारंवार होणाऱ्या अपयशामुळे देशातील विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास उडत चालल्याचे नमूद केले. परीक्षा प्रक्रियेत सातत्याने उघड होत असलेले गैरव्यवहार, प्रश्नपत्रिका फुटीच्या घटना, परीक्षा रद्द झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागण्याची वेळ, मानसिक तणाव आणि वाढत्या आत्महत्यांच्या घटनांबाबत सरकारची भूमिका अत्यंत असंवेदनशील असल्याचा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी राजस्थानातील कोटा येथे झालेल्या 'विद्यार्थ्यांची गूंज' या कार्यक्रमातून देशातील शिक्षण व्यवस्थेतील गंभीर त्रुटी, परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचार, एनटीएच्या कारभारावरील प्रश्नचिन्हे आणि युवकांच्या रोजगाराच्या हक्कांबाबत सविस्तर भूमिका मांडली होती. त्याच अनुषंगाने काँग्रेस पक्ष राज्यभर जिल्हास्तरीय जनप्रबोधन, विद्यार्थी संवाद आणि जनजागृती अभियान राबवत असून, शिक्षण व रोजगाराच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

महानगर काँग्रेस अध्यक्ष महेंद्र गवई यांनीही युवकांच्या प्रश्नांवर केंद्र सरकारने तातडीने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी केली. शिक्षण आणि रोजगार हा केवळ राजकीय मुद्दा नसून सामाजिक न्यायाशी संबंधित विषय असल्याचे सांगत, देशातील तरुणांना केवळ आश्वासनांची नव्हे तर गुणवत्तापूर्ण शिक्षण, पारदर्शक परीक्षा व्यवस्था आणि रोजगाराच्या ठोस संधींची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेदरम्यान 'विद्यार्थ्यांची गूंज' या सादरीकरणातील महत्त्वाचे मुद्दे मांडण्यात आले. शिक्षणक्षेत्रातील व्यवस्थात्मक अपयश, प्रश्नपत्रिका फुटीचे वाढते प्रमाण, भरती प्रक्रियेतील अनावश्यक विलंब, रिक्त पदांबाबतची सरकारी उदासीनता, वाढती बेरोजगारी आणि युवकांच्या भविष्यावर निर्माण झालेले संकट याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या राज्यव्यापी अभियानात विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे उमेदवार, शाळा-महाविद्यालयीन युवक, शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, माध्यम प्रतिनिधी, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले. देशाच्या भवितव्यासाठी शिक्षण आणि रोजगार हे दोन मूलभूत विषय केंद्रस्थानी आणण्याची गरज असून, विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि युवकांच्या भविष्याच्या संरक्षणासाठी काँग्रेसचा संघर्ष अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

**Change In Name**

I have change my name From
"ARIEF KHAN"
(As per Old Passport Name/ Wrong Name)
-TO-
"ARIF KHAN FATEH KHAN"
(New Name as per on Two Photo ID)
Address (If as per old passport or if change then as per Adhar)
"BE HIND KASHMIR LOJ BAIDPURA AKOLA-444001 (MAHARASHTRA)"

**जाहिर नोटिस**

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार जाकीया बी शेख इक्बाल यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

**मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे:-** मौजा शिलोडा, प्र. अकोला, ता. जि. अकोला महानगरपालिका अकोला च्या हद्दितील बि. के. नगर, वार्ड कं. क - १० घर/मालमत्ता क्रं. ५३६ नविन व १८७१ जुना प्लॉट अनु. क्रं. ६ ज्याची एकूण आराजी ४६.४५ चौ. मी. म्हणजेच ५००.०० चौ. फुट इतकी चतु:र्सिमा :- पुर्वेसः याच प्लॉट मधील उर्वरीत भाग, हुसेन खान यांचे घर पश्चिमेस: प्लॉट क्रं. ७ ची जागा, सोहेल खान यांचे घर उत्तरेस: ६ मिटर रूंदीचा रोड, दक्षिणेसः सर्विस लेन,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. १५,००,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
मो. नं. ९८६००४१३६१

**जाहिर नोटिस**

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार सतिश पंजाबराव काटकर यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

**मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे :-** मौजा अकोला, प्र. अकोला, ता. जि. अकोला महानगरपालिका अकोला च्या हद्दितील वार्ड कं. ब-६ घर/मालमत्ता कं.२८३७ नविन व ६८६ जुना येथील शेत सर्वे कं. २४/२ मधील प्लॉट क्रं. ८ ज्याची एकूण आराजी ९८.८८ चौ. मी. म्हणजेच १०६४.०० चौ. फुट इतकी असुन त्याची

**चतुः र्सिमा :-** पुर्वेसः रोड, पश्चिमेसः आधिचे मालक पांडुरंग भिरड व आताचे मालक रोठे यांची जागा, उत्तरेसः प्लॉट क्रं. ९/ मलगन घर, दक्षिणेसः याच प्लॉट चा उर्वरित भाग,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. १५,००,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
मो. नं. ९८६००४१३६१

**जाहीर सुचना**

सर्वत्र लोकांना, बॅक, वित्तीय संस्था व इतर यांना सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकार, यांनी १. गौतम प्रकाश शेगावकर २. नाजुक आनंदा शेगावकर, ३. पंडित आनंदा शेगावकर, ४. भारती प्रकाश शेगावकर, ५. भिमराव आनंदा शेगावकर, ६. राजेश आंनदा शेगावकर, ७. वंदना प्रकाश शेगावकर, ८. शोभा आंनदा शेगावकर, ९. सुनंदा आनंदा शेगावकर १०. मनोरमा गजानन इंगळे, ११. दिवाकर रमेश शेगावकर, १२. मनोज रमेश शेगावकर, १३. सुमित्राबाई रमेश शेगावकर, सर्व, रा. गोरेगाव खुर्द, ता. जि. अकोला यांचे कडुन त्यांच्या नावे सामाईकात असलेली त्यांच्या मालकीची व ताब्यातील शेत ज्याचे वर्णन :- मौजे. गोरेगाव बु, ता. जि. अकोला, चे कक्षेतील गट क्र. व उपविभाग क्र. ४९ ऐकुण क्षेत्रफळ ०.६५ हे. आर शेती त्यातील तदंगभुत सर्व झाडा, झुडपासह आमचे पक्षकारास विकण्याचा सौदा कायम केला आहे.

ज्यास चतुसिमा :- पुर्वेस - विजय ढोरे यांचे शेत, पश्चिमेस- प्रभाकर ढगे यांचे शेत, उत्तरेस -सुनिल रामेकर यांचे शेत, दक्षिणेस - श्रध्दा शेगावकर यांचे शेत.

येणेप्रमाणे वर्णनाची शेती विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे. तरी सदर शेती संदर्भात कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध, गहाण, बोजा असल्यास ही जाहीर सुचना प्रकाशित झाल्यापासुन ३ दिवसाचे आत संबंधीत कागदपत्रांसह आमचेशी संपर्क करून कळवावे. अन्यथा त्यानंतर कोणाचाही कोणतीही प्रकारची हरकत नाही असे समजुन आमचे पक्षकार सदर वरील नमुद शेती खरेदी करून घेतील व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारे हक्क, उजर, अधिकार वा हितसंबंध चालणार नाहीत याची नोंद घ्यावी. करीता ही जाहीर नोटीस.

अकोला.
दि. २३/६/२०२६.

**पक्षकारातर्फे अधिवक्ता**
**ॲड. दिपक ऐस. आगरकर,**
पत्ता :- गोरेगाव बु, अकोला, ता. जि. अकोला.
मो. क्र. ९९२३७१३९९६

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २००**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अकोट तहसील कार्यालयात घाणीचे साम्राज्य!

- मुतारीचा दुर्गंधीच 'स्वागतहार'
- आरओ पाणी व्यवस्था ठरली शोभेची वस्तू
- साफसफाईकडे प्रशासनाचे दुर्लक्ष
- नागरिक संतप्त, जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपाची मागणी



■ प्रतिनिधी | अकोट ■

जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी उभारण्यात आलेल्या अकोटच्या नव्या तहसील कार्यालयात सध्या घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र समोर आले आहे. लाखो रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या या प्रशासकीय इमारतीत स्वच्छतागृह, बाथरूम आणि मुतारींची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, नागरिकांना कामासाठी येताना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तहसील कार्यालयाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पोपटखेड रोडवरील वनविभाग कार्यालयाशेजारी उभारण्यात आलेल्या या कार्यालयात दररोज शेकडो नागरिक विविध शासकीय कामांसाठी येत असतात. मात्र कार्यालयात प्रवेश केल्यानंतर त्यांचे स्वागत विकासाच्या नव्हे, तर अस्वच्छता आणि दुर्गंधीच्या वातावरणाने होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत.

### स्वच्छतागृहांची अवस्था बिकट

कार्यालयातील अनेक स्वच्छतागृहे, बाथरूम आणि मुतारींमध्ये मोठ्या प्रमाणात घाण साचली आहे. नियमित साफसफाई होत नसल्याने दुर्गंधीने परिसर व्यापला असून, नागरिकांना नाक दाबूनच या सुविधांचा वापर करावा लागत आहे. विशेष म्हणजे, कार्यालयात सफाई कर्मचारी असतानाही अशी परिस्थिती निर्माण झाल्याने संबंधित यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

नागरिकांनी अनेकदा अधिकाऱ्यांकडे तोंडी तक्रारी केल्याचा दावा केला जात असला, तरी त्याची कोणतीही दखल घेतली गेली नसल्याचे बोलले जात आहे. परिणामी, प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात नाराजीचा सूर अधिक तीव्र होत आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालण्याची मागणी

तहसील कार्यालयासारख्या महत्त्वाच्या शासकीय कार्यालयात स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि मूलभूत सुविधांची अशी दयनीय अवस्था असणे ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून तत्काळ स्वच्छता मोहीम राबवावी, आरओ यंत्रणा सुरू करावी आणि दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात येत आहे.

### आरओ पाणी व्यवस्था केवळ फलकापुरतीच!

नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी तहसील कार्यालयात आरओ मशीन बसविण्यात आली. मात्र प्रत्यक्षात मशीनमध्ये पाणीच नसल्याचे दिसून येत आहे. काही मशीन नादुरुस्त अवस्थेत पडून आहेत, तर काहींवर कपडे टाकून ठेवण्यात आल्याचे चित्र पाहायला मिळते. त्यामुळे आरओ यंत्रणा जनतेसाठी नव्हे, तर केवळ देखाव्यासाठी उभारली आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### मुतारीत ठेवले कार्यालयीन बॅनर

धक्कादायक बाब म्हणजे, काही मुतारींमध्ये कार्यालयीन बॅनर ठेवण्यात आल्याचे आढळून आले. ?

त्यामुळे मुतारीचा वापर नागरिकांसाठी करायचा की कार्यालयीन साहित्य साठवण्यासाठी, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सार्वजनिक सुविधांचा असा अवमान होत असताना प्रशासन मात्र गप्प का, असा प्रश्नही विचारला जात आहे.

### जनतेच्या सेवेसाठी उभारलेले तहसील कार्यालय की घाणीचे केंद्र?

स्वच्छ भारत अभियानाचे फलक लावणाऱ्या प्रशासनालाच स्वतःच्या कार्यालयातील अस्वच्छता दिसत नसल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. तहसील कार्यालयातील ही परिस्थिती सुधारण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# उद्या निघणार पंढरपूरसाठी खरप खुर्द येथून आषाढ वारी पायदळ पालकी

■ प्रतिनिधी | अकोला ■



तालुक्यातील खरप खुर्द येथून पंढरपूरच्या आषाढ यात्रेसाठी पायदळ पालकी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. रविवार दि २८ जून रोजी रोजी सकाळी ९ वाजता येथून जवळच असलेल्या वाडेगाव रस्त्यावरील खरप खुर्द येथील हनुमान संस्थानच्या परिसरातून ही पायदळ पालकी वारकऱ्यां समवेत निघणार आहे. दिनांक २८ जून ते २१ जुलै पर्यंत आयोजित या आषाढी पायी पालखी सोहळ्याचे व्यवस्थापक व पालखी प्रमुख हभप मोहन महाराज गोंडचवर हे राहणार असून या पालखी सोहळ्यात कीर्तनकार हभप संजय महाराज राऊत, गायनाचार्य हभप तुषार महाराज ठाकरे, विणेकरी हभप ऋषिकेश महाराज, शांताराम पाटील टाले, हभप सुरेश महाराज गुलाने, हभप गोविंद महाराज नकासकर, चोपदार हभप पुरुषोत्तम मानकर, पालखी वाहक हभप प्रल्हादराव सावरकर, हभप रामेश्वर वाघ, कार्यवाहक म्हणून हभप गौरव महाराज पातोंड, साहेबराव उमाळे, गजानन खोडे व नियोजक म्हणून प्रशांत पाटील पिसे, गजानन अरबट यांची उपस्थिती लाभणार आहे.

# उद्या विदर्भ चेंबरची ९२ वी वार्षिक आमसभा

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला, वाशीम व बुलढाणा जिल्ह्यातील उद्योग व व्यवसायिकांच्या सेवेतील शतक पूर्ण करीत असणाऱ्या विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीची ९२ वी वार्षिक आमसभा रविवार दि २८ जून रोजी सकाळी ९-३० वाजता पोलीस लॉन येथे आयोजित करण्यात आली आहे. चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या अध्यक्षतेत आयोजित या वार्षिक आमसभेत प्रमुख पाहुणे म्हणून कॅटचे राष्ट्रीय सचिव ,दिल्ली येथील खा.प्रविण खंडेलवाल, कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतीया, कामानी ट्युबच्या संचालिका, महिला उद्योजक पद्मश्री कल्पना सरोज उपस्थित राहणार आहेत. या आमसभेत गतवर्षीचा लेखाजोखा व अंदाजपत्रक मंजूर करण्यात येऊन सन २०२६-२८ ची नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात येणार आहे.

**जाहीर नोटीस**

**वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५५७/२०२६ प्रोसेस नं.५०४५/२०२६
चौ.ता. १२/०६/२०२६ दिनांक : १०/०४/२०२६

**अर्जदार :** १. सौ. संजिवनी श्रीराम करमरकार रा. दातर कॉलनी, रेल्वे स्टेशन जवळ, उरळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे. ४१२२०२ २. भूषण श्रीधर बापट रा. केशव अर्चना, गांधी चौक, अकोला. ता. जि. अकोला. ४४४००६ ३. योगेश श्रीधर बापट रा. डॉ. हेडगेवार भवन, संघ बिल्डिंग महल, नागपूर, ता. जि. नागपूर. ४४००३२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. श्री. श्रीधर गंगाधर बापट २. श्रीमती विजया श्रीधर बापट
**पत्ता :-** रा. केशव अर्चना, गांधी चौक, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री. श्रीधर गंगाधर बापट यांचे दि. ०४/०९/२००१ रोजी व तसेच मयत श्रीमती विजया श्रीधर बापट यांचे दि. २७/०८/२०१३ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८९९/२०२६ प्रोसेस नं.७८६४/२०२६
चौ.ता. ०३/०८/२०२६ दिनांक : २२/०६/२०२६

**अर्जदार :** १. रविंद्र कन्हैयालाल पाली रा. फडके नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. अलका विजय पाली रा. प्लॉट नं ६, न्यु विराज नगर, बेसा रोड, पार्वती नगर, नागपूर, ता. जि. नागपूर. ३. सागर कन्हैयालाल पाली रा. कन्हैया बिल्डिंग, निशांत बँक जवळ, फडके नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कन्हैयालाल भगवती पाली
**पत्ता :-** रा. फडके नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कन्हैयालाल भगवती पाली यांचे दि. २५/०५/२०२५ रोजी राहते घरी फडके नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर असे होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# प्रभाग ७ मध्ये पावसाने उघड केला नियोजनाचा बोजवारा

## नगराध्यक्षा माया धुळे घटनास्थळी, स्वच्छतेसाठी तातडीचे आदेश
## जेसीबीसह युद्धपातळीवर गाळ उपसण्याची मोहीम

■ प्रतिनिधी | अकोट ■



अवघ्या काही तासांच्या मुसळधार पावसाने अकोट नगरपरिषदेच्या पावसाळापूर्व तयारीचा फज्जा उडाल्याचे चित्र प्रभाग क्रमांक ७ मध्ये पाहायला मिळाले. तुंबलेली गटारे, रस्त्यांवर साचलेले पाणी आणि घरांमध्ये घुसलेल्या पाण्यामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. या परिस्थितीची गंभीर दखल घेत नगराध्यक्षा सौ. माया विवेक धुळे यांनी आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळी धाव घेत पाहणी केली आणि प्रशासनाला तातडीने स्वच्छता मोहीम राबविण्याचे आदेश दिले.

पाहणीदरम्यान आरोग्य सभापती मनीष कराळे, नगरसेविका शारदा मिसळे, नगरसेविका गंगाबाई चंदन, स्वच्छता विभाग प्रमुख फरदळे यांच्यासह नगरपरिषदेचे कर्मचारी आणि जेसीबी यंत्रणा उपस्थित होती. परिसरातील नागरिकांनी घरांमध्ये शिरलेले पाणी, तुंबलेली गटारे आणि रस्त्यांवरील गाळ यामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा पाढा नगराध्यक्षांसमोर वाचला.

नागरिकांची गैरसोय अजिबात खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देत नगराध्यक्षा माया धुळे यांनी रस्त्यांवरील गाळ, कचरा आणि गटारांतील अडथळे तातडीने हटविण्याचे आदेश दिले. त्यांच्या उपस्थितीतच जेसीबीच्या साहाय्याने स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली. तसेच, प्रत्येक पावसात अशीच परिस्थिती निर्माण होणार नाही, यासाठी कायमस्वरूपी नियोजन करून जलनिस्सारण व्यवस्था सक्षम करण्याचे निर्देशही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

आरोग्य सभापती मनीष कराळे यांनी पावसाळ्यात साथीच्या आजारांचा धोका लक्षात घेऊन स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असल्याचे सांगितले. नगरसेविका शारदा मिसळे यांनीही नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

नगराध्यक्षांच्या निर्देशानंतर प्रभागात गाळ उपसणे, गटारे मोकळी करणे आणि कचरा हटविण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले. तत्पर कारवाईमुळे परिसरातील नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी प्रत्येक पावसात अशीच परिस्थिती उद्भवत असल्याने कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी नागरिकांकडून पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

# रविवारी युवा मंच उदय शाखेच्या वतीने बुद्धिबळ स्पर्धा

**अकोला :** मारवाडी युवा मंच उदय शाखेच्या वतीने महानगरात बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दिनांक २८ जून रोजी स ८-३० वाजता रामनगर परिसरातील अग्रवाल कोचिंग क्लासेस मध्ये ही एक दिवसीय बुद्धिबळ स्पर्धा होणार आहे. तीन वयोगटात आयोजित या बुद्धिबळ स्पर्धेत अ गटात ७ ते २० वर्ष, ब गटात २१ ते ३० वर्ष व क गटात ३० पेक्षा जास्त गटातील स्पर्धक राहणार आहेत. सर्वांसाठी असणाऱ्या या स्पर्धेचे परीक्षण व मार्गदर्शन बुद्धिबळ प्रशिक्षक जितेंद्र अग्रवाल करणार आहेत. मारवाडी युवा मंचचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या मार्गदर्शनात व



उदय शाखाचे माजी अध्यक्ष राहुल चितलांगे यांच्या पुढाकारात हा प्रकल्प लोकेश टावरी, युवा मंच उदय शाखा अध्यक्ष मानव भट्टड, सचिव अर्जुन अग्रवाल, कोषाध्यक्ष यश भट्टड यांनी साकार केला आहे. विठ्ठल ग्रुपचे संचालक सिद्धार्थ रुहाटीया यांच्या सहकार्याने आयोजित या एकदिवसीय बुद्धिबळ स्पर्धेचा समस्त बुद्धिबळ स्पर्धकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मारवाडी युवा मंच उदय शाखेचे यश अग्रवाल, हर्ष बजाज, यश चिराणीया, जतीन केडिया, कृष्णा केडीया, मनन चितलांगे, देवांश गुप्ता, शिवम अग्रवाल, शुभम सुरेका अक्षय कागलीवाल आदींनी केले आहे.

# अमली पदार्थाच्या उच्चाटनासाठी प्रत्येक घटकांनी पुढे यावे:पालकमंत्री

## आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिन; जनजागृती रॅलीचा पालकमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

**वर्धा/ जनमाध्यम**

भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. ज्या देशाकडे सर्वात जास्त तरुण शक्ती आहे, त्या देशाचे भविष्य अत्यंत उज्ज्वल असायला हवे. परंतु, आज तरुण शक्तीला व्यसनाधीनतेची एक भयानक कीड लागली आहे. ही कीड आपल्या देशाला आतून पोखरत चालली आहे. यामुळे स्वत:वर, कुंटूंबावर व समाजावर मोठा परिणाम होत आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी अमली पदार्थाच्या समुळ उच्चाटनासाठी एकत्र यावे, असे आवाहन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी आज आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिन कार्यक्रमात केले.

आतंरराष्ट्रीय अमली पदार्थ दिनानिमित्त पोलिस विभागाच्या वतीने जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा गांधी चौक येथून पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी रॅलीला



हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ केला व रॅलीमध्ये सहभागी होऊन स्वाध्याय मंदिर येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. या समारोपीय कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, कस्तुरबा हॉस्पीटलचे डॉ.इंद्रजीत खांडेकर, अतिरिक्त पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आदी मंचावर उपस्थित होते. पोलिस पाटील हा ग्रामीण भागातील मोठा घटक असून गांजा उत्पादन हे ग्रामीण भागात होत असते. गावांमध्ये गांजाचे उत्पादन होत असल्यास तात्काळ पोलिस प्रशासनाला पोलिस पाटीलांनी माहिती द्यावी. राज्य शासनाच्या निर्णयान्वये आता पोलिस विभागातील अधिकारी व कर्मचा-यांनी अमली पदार्थांच्या सेवन विक्रीत सहभाग नोंदविल्यास त्यांच्यावर निलंबनासोबतच बडतर्फ करण्याची कारवाई करण्यात येणार असल्याचे पुढे बोलतांना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले. आजच्या युवा पिढीला अमली पदार्थापासून दूर ठेवणे व सायबर गुन्ह्यावर आळा बसविण्याचे गृह विभागाकडे मोठे आव्हान आहे.

यासाठी समाजातील सर्व नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करुन अमली पदार्थाला नकार देऊन समृध्द व विकसनशील भारत बनविण्यास मदत करुया, असे आवाहन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

दारू, सिगारेट, तंबाखूपासून सुरू झालेला हा प्रवास आज ड्रग्ज (अमली पदार्थ) सारख्या जीवघेण्या व्यसनांपर्यंत पोहोचला आहे. फॅशन किंवा मित्रांच्या आग्रहाखातर सुरू झालेली एक छोटीशी चूक कधी जीवघेणे व्यसन बनते, हे समजतही नाही. त्यामुळे तरुणांनी व्यसनाचा आनंद घेण्यापेक्षा चांगल्या गोष्टींचा आनंद घेणे शिकावे, असे जिल्हाधिकारी वान्मथी सी म्हणाल्या.व्यसन माणसाला सुखाचा आभास निर्माण करून देते पण शेवटी फक्त आणि फक्त विनाशच देते. व्यसनामुळे केवळ एका व्यक्तीचे आयुष्य उद्धवस्त होत नाही, तर त्याचे संपूर्ण कुटुंब रस्त्यावर येते. आई-वडिलांचे स्वप्न, मुलांचे भविष्य आणि घराची शांतता एका झटक्यात नष्ट होते. आज वाढते गुन्हे, अपघात आणि कौटुंबिक हिंसाचार यामागे व्यसनाधीनता हेच सर्वात मोठे कारण आहे. अशा या अपप्रवृत्तीला आळा घालण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी आपली जबाबदारी समजून पोलिस विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन सौरभ अग्रवाल यांनी केले.यावेळी इंद्रजीत खांडेकर यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात उपस्थित सर्व मान्यवरांनी अमली पदार्थ जनजागृती रॅली मध्ये प्रत्यक्ष सहभागी होऊन कार्यक्रमस्थळी उपस्थिती दर्शविली. रॅलीमध्ये पोलिस विभागाचे अधिकारी व कर्मचारी, एनसीसी, होमगार्ड, पोलिस पाटील, सेवानिवृत्त पोलिस, पोलिस बाईज, परीचारिका व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रशासक सरपंचांना आर्थिक अधिकार द्या

## विकासकामांच्या खोळंब्यावर मनसेचा आवाज

**वर्धा/ जनमाध्यम**

ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या सरपंचांना आर्थिक अधिकार नसल्याने ग्रामीण भागातील विकासकामे ठप्प झाली आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि विद्युत व्यवस्थेसारख्या अत्यावश्यक कामांवर परिणाम होत असल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. मनसेचे वर्धा जिल्हाध्यक्ष शंकर पोटफोडे यांनी शुक्रवारी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. जिल्ह्यात अनेक ग्रामपंचायतींच्या निवडणुका अद्याप प्रलंबित असल्याने अनेक ठिकाणी सरपंच प्रशासक म्हणून कार्यरत आहेत. मात्र, आर्थिक अधिकार नसल्यामुळे विकासकामांसाठी निधी खर्च करता येत नसल्याने विविध योजनांची अंमलबजावणी रखडली आहे, असे निवेदनात



नमूद करण्यात आले.

आर्थिक अधिकारांच्या अभावामुळे दैनंदिन प्रशासनावरही परिणाम होत असून नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. त्यामुळे प्रशासक म्हणून कार्यरत सरपंचांना आवश्यक आर्थिक अधिकार देण्यात यावेत किंवा विकासकामांना गती मिळेल अशी पर्यायी प्रशासकीय यंत्रणा तातडीने कार्यान्वित करावी, अशी मागणी मनसेने केली आहे.यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी निवेदन स्वीकारून विषयाची गांभीर्याने दखल घेत सकारात्मक निर्णयासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिल्याची माहिती मनसेच्या वतीने देण्यात आली.

## संक्षिप्त

### लग्नाचे आमिष दाखवून विवाहित महिलेचे शोषण

**हिंगणघाट-** भविष्यात लग्न करून मुलाचा सांभाळ करण्याचे आमिष दाखवत विवाहित महिलेचे शारीरिक शोषण केल्याचा प्रकार हिंगणघाट येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कपिल लोखंडे याने संबंधित विवाहित महिलेशी प्रेमसंबंध प्रस्थापित केले. त्यानंतर भविष्यात तिच्याशी विवाह करणार असून तिच्या मुलाची जबाबदारीही स्वीकारण्याचे आश्वासन दिले. या विश्वासावर त्याने महिलेशी वारंवार शारीरिक संबंध ठेवून तिचे शोषण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे धाव घेतली. तक्रारीच्या आधारे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा पुढील तपास हिंगणघाट पोलिस करीत आहेत.

### दहशत माजविणाऱ्यावर पोलिसांची कारवाई

**पुलगाव-** शहरातील फुकटनगर परिसरात सार्वजनिक ठिकाणी चाकू घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका युवकावर पुलगाव पोलिसांनी कारवाई केली. फजल तन्वीर खान (रा. फुकटनगर) हा सार्वजनिक रस्त्यावर हातात चाकू घेऊन शिवीगाळ करत परिसरात दहशत पसरवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडील धारदार चाकू जप्त करण्यात आला. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने पुढील अनर्थ टळल्याचे बोलले जात आहे. या प्रकरणी पुलगाव पोलिस ठाण्यात संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीची चौकशी सुरू आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहतील, असे पोलिसांनी स्पष्ट केले.

### झुल्यावरून पडलेल्या कामगाराचा मृत्यू

**वर्धा-** इमारतीवर पेंटिंगचे काम करत असताना झुल्यावरून खाली पडून गंभीर जखमी झालेल्या कामगाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. निलेश मनोहर धोंगडे (वय ४१, रा. हरीहरनगर, वर्धा) असे मृताचे नाव आहे. पंजाब कॉलनी परिसरातील एका इमारतीवर ते पेंटिंगचे काम करत होते. काम सुरू असताना अचानक झुल्याचा तोल गेल्याने ते खाली कोसळले. गंभीर जखमी झाल्यानंतर त्यांना तातडीने सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेची नोंद रामनगर पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

### ट्रकची कारला धडक; चौघे जखमी

**समुद्रपूर** - नागपूर-चंद्रपूर महामार्गावर चुकीच्या दिशेने येणाऱ्या ट्रकने कारला जोरदार धडक दिल्याने चार जण जखमी झाले. या अपघातानंतर ट्रकचालकाविरुद्ध समुद्रपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागपूर येथील राजेश चिंतामन कुटे हे आपल्या कुटुंबीयांसह कारने हिंगणघाट येथे नातेवाईकांच्या लग्नसमारंभासाठी जात होते. हल्दीराम हॉटेलजवळ पोहोचताच विरुद्ध दिशेने भरधाव येणाऱ्या एमएच-४०-बीजी-०३६७ क्रमांकाच्या ट्रकने त्यांच्या कारला धडक दिली. या अपघातात राजेश कुटे, किरण कुटे, जयश्री पांडुरंग धंदरे आणि रुंदा राकेश झाडे हे किरकोळ जखमी झाले. जखमींवर समुद्रपूर ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. गुन्हा दाखल करून अपघाताचा तपास सुरू केला आहे.

### पत्ते खेळण्यास नकार दिल्याने वाद

**वर्धा-** सावंगी (मेघे) टी-पॉइंट परिसरातील एका भोजनालयात पत्ते खेळण्यास नकार दिल्याच्या कारणावरून दोन गटांत वाद होऊन परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. भोजनालय चालक प्रशांत सुरेशराव मोरे यांनी काही जणांना ताशपत्ते खेळण्यास मज्जाव केला. त्यानंतर कुणाल पाटील व त्याच्या साथीदारांनी भोजनालयात येऊन शिवीगाळ करत दगडफेक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या तक्रारीवरून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दुसरीकडे, कुणाल पाटील यांनी दिलेल्या तक्रारीत प्रशांत मोरे यांनी विनाकारण बाहेर येऊन मारहाण केल्याचा आरोप केला आहे. त्यावरून प्रशांत मोरे यांच्याविरुद्धही गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सावंगी (मेघे) पोलिस दोन्ही तक्रारींचा तपास करीत आहेत.

# आज सुमन कल्याणपूर यांच्या अजरामर गीतांची सुरेल मैफल

## रसिकांना उपस्थितीचे आवाहन

**वर्धा/ जनमाध्यम**

भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ पार्श्वगायिका पद्मभूषण स्व. सुमन कल्याणपूर यांच्या अजरामर गीतांना स्वरांजली अर्पण करणारा 'भावपूर्ण स्वर सुमनांजली' हा विशेष संगीत कार्यक्रम शनिवारी २७ जून सायंकाळी ७ वाजता रामनगर येथील अग्निहोत्री कॉलेज कॅम्पसमधील शिवशंकर सभागृहात रंगणार आहे. सृजन म्युझिकल, वर्धा आणि जय महाकाली शिक्षण संस्था, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सई वृंद' प्रस्तुत रहे ना रहे हम...या कार्यक्रमातून स्व. सुमन कल्याणपूर यांनी अजरामर केलेली निवडक गीते सादर करून त्यांना स्वरांजली अर्पण करण्यात येणार आहे. कार्यक्रमात अनघा रानडे, सुरभी ढोमणे, विश्वास रानडे, अवंतिका ढोमणे, अरुण सुरजुसे, सुनील रहाटे, अशोक तुरक्याल आणि शशिकांत बागडदे हे गायक-गायिका आपल्या सुरेल सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत.

कार्यक्रमाचे निर्माते स्वाती बमनोटे व हितेश बमनोटे असून संगीत संयोजन चारू साळवे आणि सचिन ढोमणे यांनी केले आहे. कार्यक्रमाचे निवेदन असलम खान व सुजाता जोशी करणार आहेत.या कार्यक्रमाचा लाभ वर्धेकर संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन जय महाकाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पंडित शिवशंकर प्रसाद अग्निहोत्री तसेच सृजन म्युझिकलचे शशिकांत बागडदे यांनी केले आहे.

### बाजारात दुचाकी चोरी

**हिंगणघाट-** बाजारात साहित्य खरेदीसाठी गेलेल्या व्यक्तीची दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना हिंगणघाट शहरात घडली. या प्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर वॉर्ड येथील भूमेश्वर काकपुरे (वय ४०) हे त्यांच्या एमएच-३२-झेड-०८५४ क्रमांकाच्या दुचाकीवरून शुक्रवार बाजार परिसरात खरेदीसाठी गेले होते. साहित्य खरेदी करून परतल्यानंतर त्यांनी दुचाकी उभी केलेल्या ठिकाणी पाहिले असता वाहन तेथे आढळले नाही. परिसरात सर्वत्र शोध घेऊनही दुचाकीचा मागमूस लागला नाही. अखेर त्यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीच्या आधारे अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घेत आहेत.

# सेलू पोलिसांची अवैध दारूभट्टयांवर धडक

## ९.६७ लाखांचा मुद्देमाल जप्त, दोन आरोपी फरार

**सेलू/ जनमाध्यम**

अवैध दारूनिर्मितीला आळा घालण्यासाठी सेलू पोलिसांनी जामणी शिवारातील पारधी बेडा परिसरात राबविलेल्या 'वॉश आऊट' मोहिमेत मोठी कारवाई करत तब्बल ९ लाख ६७ हजार रुपयांचा अवैध दारूभट्टीचा मुद्देमाल जप्त व नष्ट केला. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून ते सध्या फरार आहेत.

पोलीस ठाणे हद्दीतील पारधी बेडा, जामणी येथे तीन अधिकारी, १६ पोलीस कर्मचारी आणि १० होमगार्ड जवानांच्या पथकाने संयुक्तपणे छापा टाकला. कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात अवैध दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य, रसायने व इतर मुद्देमाल नष्ट करण्यात आला. या प्रकरणी अश्विनी काळे व रुपेश



भोसले (दोघेही रा. पारधी बेडा, जामणी) यांच्याविरुद्ध सेलू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपी फरार आहेत. त्यांच्या शोधासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल (आयपीएस), अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली सेलूचे ठाणेदार पंकज वाघोडे यांच्या नेतृत्वात पार पडली. पोलीस उपनिरीक्षक मुदमाळी, धनंजय पांडे, पोलीस कर्मचारी तसेच होमगार्ड जवानांनी या मोहिमेत सहभाग घेतला. जामणीचे पोलीस पाटील सुरेश गडकरी यांनीही कारवाईसाठी सहकार्य केले. या धडक कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून अशा बेकायदा धंद्यांविरोधात पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा सेलू पोलिसांनी दिला आहे.

# दोन थेंब आयुष्याचे ० ते ५ वर्षांच्या प्रत्येक बालकाला पोलिओ लस पाजा

## डॉ. रोशन कावरे, डॉ. प्रणय भोंड यांचे आवाहन

**साहूर/ जनमाध्यम**

रविवारी २८ जून देशभरात पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार असून साहूर प्राथमिक आरोग्य केंद्रातही या मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेला यशस्वी करावे, असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ. रोशन कावरे आणि डॉ. प्रणय भोंड यांनी केले आहे.

केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी पोलिओमुक्त भारताच्या उद्देशाने



ही मोहीम राबविली जाते. पोलिओ हा कायमस्वरूपी अपंगत्व निर्माण करणारा गंभीर आजार असल्याने वेळेवर लसीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. ही लस सर्व शासकीय आरोग्य केंद्रांवर पूर्णपणे मोफत उपलब्ध असून ती ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांसाठी सुरक्षित आहे.

साहूर व परिसरातील पालकांनी आपल्या जवळच्या आरोग्य केंद्रात किंवा पोलिओ बूथवर बालकांना घेऊन जाऊन पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत. प्रत्येक बालकाचे संरक्षण हीच निरोगी व पोलिओमुक्त भारताची गुरुकिल्ली असल्याचे सांगत नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून आरोग्य विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. कावरे व डॉ. भोंड यांनी केले.

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात ऑलिम्पिक दिन साजरा

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त विशेष प्रेरणादायी व्याख्यान व चर्चासत्राचे आयोजन करुन जागतिक ऑलिम्पिक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणुन दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेच्या रवी नायर फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राद्यापक डॉ.स्वप्नील रामटेके यांची तर जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम, तालुका क्रीडा अधिकारी संदीप खोब्रागडे, गणेश यल्लावार, क्रीडा अधिकारी अनील निमगडे, सायली चन्नावार, सांजली वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.स्वप्नील रामटेके यांनी खेळाडूंच्या शारीरीक तंदुरुस्तीचे महत्व, दुखापतीपासुन बचाव, मानसिक सक्षमता आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळविण्यासाठी आवश्यक बाबीवर मार्गदर्शन केले. पालक व प्रशिक्षक यांनी चर्चासत्रात कार्यक्रमाला जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकारी विश्वास बोकडे, कर्मचारी रवी काकडे, नाना टेकाम, खेळाडून, प्रशिक्षक व पालक उपस्थित होते.

### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर J9292182 वरील माझे ABDUL AZAZ ABDUL GAFFAR QUARESHI असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील ABDUL AJAJ ABDUL GAFFAR QURESHI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- हनुमान नगर वॉर्ड नं 12 वर्धा 442001**

# आयुष्मान भारत कार्ड नोंदणीसाठी 'मिशन मोड'वर काम करा-जिल्हाधिकारी

## आरोग्यविषयक विविध समित्यांचा आढावा

**वर्धा/ जनमाध्यम**

प्रधानमंत्री आयुष्मान भारत जनआरोग्य योजनेंतर्गत पाच लाखापर्यंतचे उपचार विनामुल्य केले जातात. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आयुष्मान भारत कार्ड काढणे आवश्यक आहे. त्यामुळे कार्ड नोंदणीची मोहिम जिल्ह्यात मिशन मोडवर राबवा. जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांना या योजनेच्या कक्षेत आणा, असे निर्देश जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी दिले.

जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य विभागाच्या विविध समित्यांचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी त्यांनी सदर निर्देश दिले. बैठकीला जिल्हाधिकाऱ्यांसह मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन डॉ.जगदीश बुकतरे, कुष्ठरोगचे सहाय्यक संचालक डॉ. रा. ज. पराडकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.हेमंत पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी मिशन एड्स सुरक्षा, जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध समिती, एचआयव्ही टीबी समिती, डिसीआरजी, रुग्ण कल्याण समिती, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रम, पीसीपीएनडीटी, एमजेपीजेवाय व क्षयरोग नियंत्रण विभागाचा सविस्तर आढावा घेतला.

आयुष्मान कार्ड नोंदणीचे जिल्ह्याचे प्रमाण वाढले पाहिजे, त्यासाठी गावस्तरावर आशा, अंगणवाडी सेविकांची मदत घेऊन तीन ते चार दिवसांची विशेष मोहिम राबवा. एकही पात्र कुटुंब नोंदणीपासून वंचित राहू नये, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. एड्स नियंत्रणासाठी विशेष कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात विशिष्ठ गटानुसार तपासणी करुन जास्तीत जास्त पीएलएचआयव्ही शोधण्यास यावे. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जनजागृती केली जावी.

ठिकठिकाणी अचनाक भेटी देऊन तंबाखुजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर पोलिस तसेच अन्न व औषध प्रशासन विभागासोबत पोटपा अंतर्गत कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

जिल्हास्तरीय संसर्गजन्य व प्राणिजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण समितीचा आढावा घेतांना पावसाळी परिस्थिती लक्षात घेता दूषित पाणीपुरवठा, कीटकजन्य आजार आणि प्राण्यांमार्फत मानवामध्ये पसरणाऱ्या आजारांवर लक्ष ठेवावे. आरोग्य आणि पशुसंवर्धन विभागांनी संशयास्पद रुग्ण व प्राण्यांमधील आजारांची माहिती तात्काळ एकमेकांसोबत सामायिक करावी. डेंग्यू, मलेरिया, लेप्टोस्पायरोसिस आणि चिकनगुनियासारख्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना व औषध फवारणी करावी. दुर्गम भागात पशुधनाचे विविध आजारांविरोधी लसीकरण करून घ्यावे, असे निर्देश दिले. बैठकीला अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नलीनी विखे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.विद्या पवार, डॉ.विनित झळके, डॉ.प्रशांत वाडीभस्मे, डॉ.संजय गाठे, डॉ.आशिष लांडे, डॉ.पल्लवी खेडीकर, डॉ.वरभे, डॉ.मोहीता कोडापे, नुरुल हक शेख, डॉ.नम्रता सलुजा, कांचन बडबाने, डॉ.स्मिता हिवरे, शमा खान, मनिष कुटे, सुमंत ढोबळे आदी उपस्थित होते.

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वर्धा यांचे कार्यालय
### महात्मा गांधी पुतळ्याजवळ, सिव्हिल लाईन, वर्धा

क्र. महसुल सहायक/गृह/कावि - २५०/२०२६ दिनांक १५.०६.२०२६

वाचाः १.

भारत सरकार विधी व न्यायविभाग यांचे कडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र २. जन्म-मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ (२०२३ चा २०) च्या खंड १ ३. मा. जिल्हादंडाधिकारी,

३. मा. जिल्हाधिकारी वर्धा यांचे आदेश क्रमांक कक्ष-२ब/
म. सहा/गृह/कावि-७५०/२०२४, दिनांक २४/०५/२०२४

**जाहिरनामा**

अर्जदार नंदनी शिवा सुते रा. स्टेशन फैल वर्धा यांनी अर्जामध्ये नामे विश्वनाथ धन्नुलाल सुते यांचा मृत्यु राहते घरी वर्धा येथे झालेला नामे विश्वनाथ धन्नुलाल सुते या नावाने जन्मा नोंद वर्धा येथे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नोंद घेण्याकरीता जन्म नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) नूसार जन्म-मृत्यु नोंद करण्याबाबत प्रकरण दाखल केले आहे.

अर्जदार यांचा आजोबाचा मृत्यु दिनांक २१.१०.१९८५ रोजी मौजा-वर्धा येथे झाला आहे असे अर्जदाराने अर्जात नमुद केलेले आहे.

त्याअर्थ मी तालुका द तालुका दंडाधिकारी, वर्धा उपरोक्त वाचा क्रमांक १ व २. नुसार व ३ मध्ये न्मुद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तालुका दंडाधिकारी, वर्धा यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहिरनामा प्रसिध्दी पासून १५ दिवसांचे आंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

विवित मुदतीत आक्षेप/हरकतींचा पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्यु नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहित धरुन प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात विचार केल्या जाणार नाही याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

**तहसिलदार वर्धा**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २१०**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# बडनेऱ्यात चोरांचा धुमाकूळ

## -घरासह क्लिनिक फोडले -रोख रक्कम, दागिने लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरट्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढले असून घर आणि क्लिनिकमध्ये चोरीच्या दोन स्वतंत्र घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. एका घटनेत घरातून सुमारे १.२० लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीस गेले, तर दुसऱ्या घटनेत क्लिनिकमधून रोख रक्कम, मोबाइल आणि इतर साहित्य लंपास करण्यात आले. या दोन्ही घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून बडनेरा पोलिसांनी गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे.

मालू लेआउट परिसरातील रहिवासी श्रीकृष्ण शेलार (वय ४९) यांच्या घरात ही चोरीची घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घराचा मुख्य दरवाजा उघडा असल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने रात्रीच्या वेळी घरात प्रवेश केला. चोरट्याने थेट बेडरूममधील लाकडी कपाट गाठत त्यामधून श्रीकृष्ण शेलार यांच्या पत्नीचे सुमारे ३० ग्रॅम वजनाचे, अंदाजे १ लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे पोत चोरून नेले. याशिवाय पॅन कार्डसह काही महत्त्वाची कागदपत्रेही लंपास करण्यात आली. सकाळी चोरीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली.

दुसऱ्या घटनेत नवी वस्ती, बडनेरा रेस्ट हाऊस (शिवाजी नगर) परिसरातील डॉ. अमोल वीरेंद्र बसू यांच्या क्लिनिकला चोरट्यांनी लक्ष्य केले. २२ जून रोजी रात्री क्लिनिक बंद करून डॉक्टर घरी गेल्यानंतर अज्ञात चोरट्यांनी वरच्या मजल्यावरील उघड्या शटरमधून आत प्रवेश केला. त्यानंतर विविध कक्षांची झडती घेत रोख रक्कम आणि इतर साहित्य चोरून नेले. चोरट्यांनी डॉ.अमोल बसू यांच्या केबिनमधून ७,५०० रुपये रोख आणि एक जुना एपल कंपनीचा मोबाइल लंपास केला. तसेच डॉ. भूषण वीरेंद्र बसू यांच्या केबिनमधून ३,५०० रुपये रोख रक्कम चोरली. याशिवाय ब्लड लॅबमधून ५,५०० रुपये रोख आणि काही महत्त्वाचे वैद्यकीय साहित्य चोरीस गेले. या घटनेत एकूण १६,५०० रुपयांची रोकड आणि अन्य साहित्य चोरीला गेल्याची नोंद करण्यात आली आहे.

एकाच परिसरात अल्पावधीत चोरीच्या दोन घटना घडल्याने बडनेरा परिसरातील नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. चोरटे घरांसह व्यावसायिक आस्थापनांनाही लक्ष्य करत असल्याने पोलिस गस्त वाढविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

दोन्ही प्रकरणांमध्ये बडनेरा पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक पुरावे आणि संशयितांच्या हालचालींची माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. चोरीमागे एकाच टोळीचा हात आहे का, याचाही तपास पोलिसांकडून केला जात आहे. दरम्यान, नागरिकांनी घर आणि व्यावसायिक आस्थापनांचे दरवाजे, खिडक्या व शटर व्यवस्थित बंद ठेवावेत तसेच संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

# शहरात तिसऱ्यांदा डिलीट झालेल्या एसआयआर डेटाची एसआयटी चौकशी करा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात विधानसभा मतदारसंघ क्रमांक ३८ मध्ये सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रिये दरम्यान मॅपिंग डेटा वारंवार डिलीट होत असल्याचा गंभीर आरोप युनायटेड फोरमचे डॉ. अलीम पटेल यांनी गुरुवार २५ जून रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये केला आहे. डॉ.अनिल पटेल यांनी या प्रकरणाची स्वतंत्र विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे.



डॉ. पटेल यांनी सांगितले की, २ एप्रिल, २९ एप्रिल आणि २२ जून २०२६ रोजी एस आय आर मॅपिंग डेटा डिलीट झाल्याच्या घटना घडल्या. त्यामुळे अनेक बीएलओ अधिकाऱ्यांचे ८० ते ९० टक्क्यांपर्यंत पूर्ण झालेले मॅपिंग अचानक ४५ ते ५५ टक्क्यांवर घसरले. विशेष म्हणजे, डेटा डिलीट होण्याचा सर्वाधिक परिणाम अल्पसंख्याक बहुल भागातील मतदान यादी भागांवर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. विधानसभा मतदारसंघातील एकूण ३२२ भागांपैकी सुमारे १०५ भाग प्रभावित झाल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकता, निष्पक्षता आणि विश्वासार्हतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. युनायटेड फोरमने या प्रकरणातील सर्व्हर लॉग, ऑडिट ट्रेल, बॅकअप आणि इतर डिजिटल पुरावे तातडीने सुरक्षित करण्याची मागणी केली आहे. तसेच प्रभावित भागांची स्वतंत्र तांत्रिक व फॉरेन्सिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. ३० जूनपासून एसआयआर प्रक्रिये अंतर्गत मतदारांना फॉर्म वितरण सुरू होणार असल्याने त्यापूर्वी या प्रकरणातील जबाबदारी निश्चित करून प्रशासनाने जनतेसमोर लेखी स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. जर ही केवळ तांत्रिक चूक असेल तर तिचा परिणाम संपूर्ण मतदारसंघात दिसायला हवा होता; मात्र एकाच भागावर वारंवार परिणाम होत असल्याने स्वतंत्र चौकशी आवश्यक आहे,' असे डॉ. अलीम पटेल यांनी म्हटले आहे. मागणी पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आलेला आहे. पत्रकार परिषदेत किरण गुडधे, रहीम राही, अन्सार बेग, एड. शमीन, अरशद अहमद, असलम रहबर आदि उपस्थित होते.

## सूर्याला झाकता येत नाही

संघर्षाच्या काळात सारे,
दूर उभे राहून पाहतात,
हात देण्याची वेळ येता
नातीदेखील मागे सरकतात.

पडताना कोणी धरत नाही,
अश्रूंना किंमत नसते,
पण यशाच्या एका किरणाने
जग अचानक आपले होते.

कालपर्यंत जे विरोधात होते,
आज तेच गुणगान गातात,
मार्ग दाखवणारे बनून
सल्ल्यांचे डोंगर रचतात.

पैशाच्या चमकत्या प्रकाशात
माणसं रंग बदलतात,
संघर्षात पोरके करणारेच
यशात आपलेपण दाखवतात.

रडण्याची गोष्ट कुणाला नको,
दुःख ऐकायला वेळ नसतो,
हसरा चेहरा दिसला की मात्र
साऱ्या जगाला उत्सव असतो.

कर्तृत्व नसताना काही जण
खोटा गर्व करत फिरतात,
परक्यांच्या प्रकाशावर जगून
स्वतःला सूर्य समजतात.

पण सत्य एकच असते,
ते काळ कधीच लपवत नाही,
सूर्याला कितीही झाकले तरी
त्याचे तेज कधी थांबत नाही.

म्हणून संयम धरा,चालत राहा,
उत्तर वेळच देईल त्यांना,
खरे सोने उजळून निघते,
आणि खरे तेजच उजळते जगाला.

**-उर्वशी मनिष संघवी**
(मुर्तिजापूर,अकोला)

# आंतरराष्ट्रीय खेळाडू व्यंकटेश नेरकर सन्मानित



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन या महाविद्यालयाचा विद्यार्थी व आंतरराष्ट्रीय खेळाडू व्यंकटेश नारायणराव नेरकर याचा युवा स्वाभिमान पक्षाच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. व्यंकटेश ने आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकावले आहे. तसेच आजवर त्याने अनेक महिलांना व मुलींना मोफत कराटे प्रशिक्षण दिले आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी योग, निसर्गोपचार, आयुर्वेद, आणि व्यायामाचा प्रसार तो गेल्या दहा वर्षांपासून करत आलेला आहे. यासोबतच शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा, कला आणि साहित्य अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्याने गेल्या वर्षात सुवर्ण कामगिरी केली आहे.

त्याच्या याच उल्लेखनीय कार्याबद्दल आमदार रवी राणा, माजी खासदार नवनीत राणा, महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे आदी मान्यवरांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला व त्याला भावी वाटचालीसाठी देखील शुभेच्छा देण्यात आल्या.

# वारसा संस्थेने दिले गोमातेला जीवनदान!

**मोर्शी/प्रतिनिधीः-** अज्ञात वाहनाच्या धडकेत जबर जखमी झालेल्या गाईला वारसा संस्थेच्या कार्यकर्त्यांनी जीवनदान दिल्याची घटना रामजीबाबा मंदिर परिसरात दि.२५ जून रोजी घडली.

मोर्शी वरुड रोडवर असलेल्या सोलव बिल्डिंग समोर एका अज्ञात वाहनाने गाईला जबर धडक देऊन जखमी केले व ती गोमाता रक्तबंबाळ अवस्थेत रोडवर पडून असल्याची माहिती वारसा संस्थेच्या हेल्पलाईनवर मोर्शीच्या नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने यांनी दिल्यानंतर वारसा संस्थेच्या रेस्क्यू पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन वारसा संस्थेचे अध्यक्ष अभिलाष व्यवहारे तसेच संस्थेच्या रेस्क्यू पथकातील प्रशांत चारे, नितीन चिखले,वैभव भोजने,हर्षल गलपट, वैभव मलवार यांनी पाहणी केली.

अज्ञात वाहनाच्या जोरदार धडकेमुळे गायीचा पुढील भागातील एक पाय पूर्णपणे तुटून निकामी झाल्याचे दिसून आले.संस्थेच्या टीमने क्षणाचाही विलंब न करता पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. तोंडे मॅडम आणि विशाल भोरे यांना घटनास्थळी पाचारण केले.त्यांनी जखमी गायीला तातडीने वारसा संस्थेच्या रेस्क्यू सेंटरमध्ये हलवून प्राथमिक उपचार करण्यात आले. मात्र पाय पूर्णपणे तुटल्यामुळे शस्त्रक्रिया आवश्यक असल्याचे पशुवैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले.

यानंतर डॉ. सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील उपचारासाठी गायीला शिराळा येथील गोकुलम गोरक्षण संस्थेत पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.संस्थेशी संपर्क साधून ॲम्बुलन्सची व्यवस्था करण्यात आली आणि जखमी गायीला पुढील शस्त्रक्रिया व उपचारासाठी गोकुलम गोरक्षण संस्था शिराळा येथे सुरक्षितपणे रवाना करण्यात आले. वारसा संस्थेच्या या तातडीच्या बचावकार्यामुळे जखमी मुक्या जनावराला वेळेत उपचार मिळवून गोमातेला जीवनदान मिळाल्यामुळे नागरिकांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.

# जिल्हाधिकारी कार्यालयात शाहू महाराज जयंती



**अमरावती :** सामाजिक न्यायाचा पाया रचणारे लोककल्याणकारी राजे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज विधी अधिकारी नरेंद्र बोहरा यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.


यावेळी अल्पेश हाते, नाझर विजय सांगळे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.


## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्कः**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**


# विभागीय आयुक्तालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन



**अमरावती :** सामाजिक न्यायाचा पाया रचणारे लोककल्याणकारी राजे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी नायब तहसीलदार शामसुंदर देशमुख, सहा. महसूल अधिकारी राहुल बोबडे, आशिष अंबाडकर, नाझर शरद लोणारे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

## सार्वजनिक जाहीर नोटीस

मला माझ्या पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारान्वये आपण सर्वांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, दि.२२/०६/२०२६ रोजी माझ्या ताब्यातून एक मूळ खरेदीखत गहाळ झाली आहे. खरेदीखत दि.२५/०२/२०११ ची असून दस्त क्र.३७१/२०११ ची आहे. सदर खरेदीखतातील मालमत्ता शेत सर्वे नं. १९५/२, प्लॉट नं.३७, मौजे शिरजगाव बंड येथील असून खरेदी लिहून देणार श्री पांडूरंग दांडगे आणि घेणार आनंदराव गुंडव हे आहेत.

जर कोणाला वर उल्लेखित खरेदी मिळाली असेल किंवा त्यांच्या ताब्यात असून त्यांनी गहाण दिली किंवा मिळाली असेल किंवा या खरेदीखताचा उल्लेख ऐकलं असेल तर त्यांनी ७ दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर वर पाठवावे किंवा मोबाईल नं.वर संपर्क करावेत. या नंतर कोणतीही तक्रार किंवा दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**ॲड. अनुपमा जयस्वाल**
**जैन मंदिरा जवळ, परतवाडा,**
**ता.अचलपूर, जि.अमरावती**
**मो.नं.- ९४२२९१४०९९**

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--

पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३०३/२०२६ ने.ता.२८.०७.२०२६

**अर्जदार :** १. अशोक दलपतराव मोहने
वय ६० धंदा - शेती
रा.तोंडगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार : निरंक**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत दलपत नरसुजी मोहने** हे रा.तोंडगांव ता.चांदूर बाजार जि.अमरावती येथील कायमचे रहिवाशी होते. त्यांचा मृत्यू दिनांक **०२.०४.२०१४** रोजी तोंडगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. ते तेथीलच मूळ रहिवासी होते. तसेच **मृतक कलावती दलपत मोहने** ही रा.रा.तोंडगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमची रहीवाशी होती. ती दि.**३०.११.२०१९** रोजी तोंडगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३०३/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२४.०६.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३०४/२०२६ ने.ता.३०.०७.२०२६

**अर्जदार :** १. रामदास नारायणराव इंगोले, वय ७५ धंदा - शेती
रा.हिवरखेड, ता.तेल्हारा, जि.अकोला
२. रमेश नारायणराव इंगोले, वय ७३ धंदा - शेती
रा.तुळजापूर गढी, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
३. कुसूम साहेबराव धाडसे, वय ७० धंदा - घरकाम
रा.राजनेश्वरी मंदिराजवळ, शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** बेबी गजानन देशमुख, वय ७८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.ग्रामपंचायत जवळ, पुर्णा नगर, ता.भातकुली, जि.अमरावती

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत नारायण श्रावणजी इंगोले** यांचा मृत्यू दिनांक **१२.०७.१९८०** रोजी झाला. तसेच **मृतक सरस्वताबाई नारायण इंगोले** हिचा दि.**०२.०५.२०१०** रोजी तुळजापूर गढी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३०४/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२४.०६.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर

## जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **माहरुख नाज अ.अजीज**, पत्ता महेराबपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.३० संगणक मालमत्ता क्र.ACHA000/26507 जुना मालमत्ता क्र. ३००००५२० नझुल शिट ....... प्लॉट नं...... ही कर आकारणी नोंदवहीनुसार **श्री/श्रीमती/कु.फरजाना बेगम अ.अलीम व** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **श्री/श्रीमती/कु.माहरुख नाज अ.अजीज** ( प्रतिज्ञापत्र) या कार्यालयामध्ये दिनांक **२४.०६.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
**पुर्वेस** - सरकारी रस्ता
**पश्चिमेस** - खुर्शिद बेगम अ.रहेमान यांचे घर
**दक्षिणेस** - छोटू भाई यांची संत्रा मंडी
**उत्तरेस** - महानुभाव मंदिर

शिक्का

**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

**नमुना ९**
**(नियम १४ व २४ पहा)**
**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ यांच्या कलम १५०(२) अन्वये सुचना**

ज्याअर्थी तालुका - अमरावती गांव - करजगांव
गावच्या फेरफाराच्या नोंदवहीत खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्यासंपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे.

| फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदीचा अनुक्रमांक किंवा तारीख | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप | ज्यातील अधिकार संपादन करण्यात आले आहे ते भूमापन व **उपविभाग** क्र. |
|---|---|---|
| ९४३ | नोदीचा प्रकार - वारस<br>फेरफाराचा दिनांक २२.०६.२०२६<br>माहिती मिळालेचा दिनांक - १८.०६.२०२६<br>श्री/श्रीमती भास्कर गुलाब घरडे यांनी अर्ज दिला की गट नंबर/सर्वे नंबर ५० वरील खातेदार कै.गुलाब किसन घरडे हे दिनांक ०४.०२.२०२३ रोजी मयत झाले असून त्यांना वारस खालीलप्रमाणे--<br>१. भाष्कर गुलाब घरडे, नाते मुलगा, वय ३९, वारसदाराची स्थिती- हयात, मयतास वरील वारसा-शिवाय अन्य कोणीही वारस नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र मृत्यू नोंदीचा दाखला जबाब दिल्यावरुन व वारस ठराव क्र. १४२ प्रमाणे नावें दाखल केली असे. | ५० |

आणि ज्याअर्थी तुमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरुन/फेरफाराच्या नोंदवहीवरुन मला वाटते, आणि ज्याअर्थी उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे असे मानण्यास मला संयुक्तिक कारण आहे. त्याअर्थी आता मी, प्रज्ञा विश्वासराव वानखडे, ज्याठिकाणी उपरोक्त जमीन आहे त्या गावाचा ग्राम महसूल अधिकारी याद्वारे उक्त फेरफाराच्या नोंदीसंबंधी तुम्हास सुचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत, उक्त नोंदीसंबंधी तुमची हरकत कोणतीही असल्यास, ती तोडी किंवा लेखी पाठविण्यास तुम्हास फर्मावित आहे. ग्राम महसूल अधिकारी
दिवसांच्या मुदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तुमची संमती आहे असे गृहित धरले जाईल, कृपया याची नोंद घ्यावी.

अमरावती
दि.२२.०६.२०२६

शिक्का

**ग्राम महसूल अधिकारी (सही व शिक्का)**
**सही - पी.व्ही.वानखडे,**
ग्राम महसूल अधिकारी,
साझा क. ता.जि.अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३०९/२०२६ ने.ता.२९.०७.२०२६

**अर्जदार :** १. सुभाष पुंडलिकराव वानखडे, वय ६८ धंदा - मजुरी
रा.लाखनवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. अरुणा देवराव तायडे, वय ६५ धंदा - घरकाम
रा.रामा ता.भातकुली, जि.अमरावती
३. वनिता प्रेमदास बादशे, वय ५५ धंदा - घरकाम
रा.निगडी, पुणे, ता.जि.पुणे
४. चरणदास पुंडलिकराव वानखडे (मयत)
४अ) अमिता चरणदास वानखडे, वय ४८ धंदा - घरकाम
४ब) प्रज्ञा अंकुश बनसोड, वय २६ धंदा - घरकाम
४क) अनिकेत चरणदास वानखडे, वय २५ धंदा - शिक्षण
अर्जदार नं.४अ व ४क रा.लाखनवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.४ब रा.अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार : निरंक**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत पुंडलिक तुकाराम वानखडे** यांचा मृत्यू लाखनवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे दिनांक **२९.०६.२०२५** रोजी झाला. ते तेथीलच मूळ रहिवासी होते. तसेच **मृतक गौकर्णा पुंडलिक वानखडे** ही रा.लाखनवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमची रहीवाशी होती. ती दि.**२८.०७.२०१५** रोजी लाखनवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. तसेच **मयत चरणदास पुंडलिक वानखडे** हे रा.लाखनवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहीवाशी होती. ते दि.**१९.०३.२०१३** रोजी लाखनवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावले. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३०९/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२४.०६.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०९३/२०२६
**श्री वासुदेव अधिक सात -वि- निरंक**
पुढील ता.२९.०७.२०२६

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १. वासुदेव काशीराव रेवस्कर, वय ७६ वर्षे, व्यवसाय - काही नाही
रा.गडगडेश्वर रोड, अमरावती, ता.जि.अमरावती
२. जगदेव काशीराव रेवस्कर, वय ६२ वर्षे, व्यवसाय - खाजगी व्यवसाय
३. गोवर्धन माणिकराव रेवस्कर, वय ५१ वर्षे, व्यवसाय - खाजगी व्यवसाय
४. जनार्दन माणिकराव रेवस्कर, वय ७६ वर्षे, व्यवसाय - खाजगी व्यवसाय
५. योगेश रामचंद्र रेवस्कर, वय ४३ वर्षे, व्यवसाय - शासकीय कर्मचारी
६. चंदन रामचंद्र रेवस्कर, वय ४० वर्षे, व्यवसाय - खाजगी व्यवसाय
७. नितेश रामचंद्र रेवस्कर, वय ३८ वर्षे, व्यवसाय - खाजगी व्यवसाय
८. प्रशांतकुमार नारायणराव रेवस्कर, वय ३२ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
रा.वडाळी, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **काशीराव उर्फ जंगल्या रोडबा रेवस्कर** हे अनुक्रमे दिनांक 01.10.1962 व **मयत बनाबाई काशीराव उर्फ जंगल्या रेवस्कर** ही दि.24.05.2013 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **वासुदेव अधिक सात विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वासुदेव अधिक सात विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक २६.१२.२०२५

आज दि.**२६.१२.२०२५** रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **रिजवाना अंजुम शेख इस्माईल** अर्जात नमूद जन्म दिनांक **०१.०७.१९८३** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण,इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| **पंचाचे नांव** | **सही** |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अ.खालीक अ.मजीद (ग्रा.पं.सदस्य) | ५) अ.खालीक अ.मजीदे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २८९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त


### शेतकऱ्यांची फाशी घेवून आत्महत्या



**शिराळा**-येथील वार्ड नंबर ६ मधील रहिवाशी अल्पभूधारक शेतकरी विजय रामभाऊ तायडे वय (७०वर्ष) यांनी कर्जाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केली.त्यांच्या लहान मुलांच्या (भुषण तायडे) किडण्या गेल्या.उपचारा दरम्यान खुप खर्च झाला त्यामुळे शेतकरी विजय रामभाऊ तायडे यांच्यावर कर्जाचा डोगर कोसळला. विजय रामभाऊ तायडे यांनी कर्जाला कंटाळून सकाळी गळफास घेऊन आत्महत्या केली. वलगाव पोलीसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तर तपासणी साठी सामान्य रुग्णालय अमरावती नेण्यात आला आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे.

### आर्थिकदृष्ट्या गरजू गुणवंत विद्यार्थ्यांसाठी 'सुदामजी सावरकर शिष्यवृत्ती २०२६'

**अमरावती**-Sudam Education Foundation तर्फे यावर्षीही स्वातंत्र्यसेनानी साहित्यरत्न कै. सुदामजी सावरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'सुदामजी सावरकर शिष्यवृत्ती २०२६' जाहीर करण्यात आली आहे. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या परंतु शैक्षणिकदृष्ट्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.या शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या २०२६ च्या १०वी परीक्षेत ८५% पेक्षा अधिक गुण मिळवलेले तसेच वार्षिक कौटुंबिक उत्पन्न १ लाखांपेक्षा कमी असलेले विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत.शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असून, आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये या भावनेतून Sudam Education Foundation हा उपक्रम राबवत आहे. पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात आर्थिक मदत व प्रोत्साहन देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे.अधिक माहितीसाठी व अर्ज प्रक्रियेसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी किंवा पालकांनी ९०३५२२८९०० या क्रमांकावर संपर्क साधावा अथवा www.sudam.org या संकेतस्थळाला भेट द्यावी.



### मनपात राजर्षि शाहु महाराज जयंती

**अमरावती**-राजर्षि शाहु महाराज यांची जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेमध्ये संपन्न झाला. राजर्षि शाहु महाराज यांची जयंती निमित्य महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते राजर्षि शाहु महाराज यांच्या प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे सकाळी ११.०० वाजता करण्यात आले.यावेळी महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, गटनेता डॉ.राजेंद्र तायडे, झोन सभापती स्वाती कुलकर्णी, नगरसेवक रतन डेंडुले, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



### जि. प. शाळा येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती

**खल्लार**-नजिकच्या वडूरा येथिल जिल्हा परिषद उच्च माध्यमिक मराठी शाळेत लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे सभासद गजानन नांदणे, प्रमुख पाहुणे गावातील प्रतिष्ठित नागरिक अतुल पेढेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे सभासद उमेश पंडीत व शिवकुमार पेढेकर उपस्थित होते. उपस्थितपाहूण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे सभासद तसेच ग्रामपंचायत उपसरपंच उपस्थित होते.प्रास्ताविक प्रस्तावनेत शाळेचे मुख्याध्यापक विजय मकेश्वर यांनी छत्रपती शाहू महाराजांनी केलेल्या थोर कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती करून दिली.कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवरांचे शाळेच्या शिक्षिका वनमाला शेवतकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक व शा.पो.आ.मदतनिस प्रतिक्षा हरणे यांनी परिश्रम घेतले.

# विठ्ठल मंदिर परिसरातील 'ब्लॅक स्पॉट'वर उपाययोजना सुरू

## नगराध्यक्ष गायगोले यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे नॅशनल हायवे प्रशासनाची माघार



**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

शहरातून जाणाऱ्या राज्य महामार्गावरील विठ्ठल मंदिर परिसर हा अपघातांचा मुख्य केंद्रबिंदू (ब्लॅक स्पॉट) बनला आहे. येथे सतत होणाऱ्या जीवघेण्या अपघातांची दखल घेत अखेर नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी आक्रमक भूमिका घेतली. नगरपरिषद कार्यालयात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) अधिकाऱ्यांसोबत झालेल्या वादळी बैठकीनंतर, प्रशासनाने आपली चूक मान्य केली आहे.

त्यानुसार अपघाताला कारणीभूत ठरलेले लोखंडी कठडे (बॅरिकेड्स) हटवून तातडीने गतीरोधक (स्पीड ब्रेकर्स) बसवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.विठ्ठल मंदिर जवळील महामार्गाचा उतार हा अत्यंत धोकादायक आहे. शहरात प्रवेश करताना वाहनांचा वेग अनियंत्रित होत असल्याने येथे नेहमीच लहान-मोठे अपघात घडत असतात.नुकतेच २५ जून रोजी एका भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात सचिन रमेश सावरकर (वय ३५ वर्ष) यांचा जागीच मृत्यू झाला, तर मोहन शंकर ताडे हा युवक गंभीर जखमी झाला.

या ताज्या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत होता.या धोकादायक वळणाबाबत आणि उताराबाबत नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी १५ जून रोजीच अकोला उपविभागीय राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांना लेखी पत्र दिले होते. २६ जून रोजी अकोट-अंजनगाव मार्गाचे नॅशनल हायवे सुपरवायझर आणि नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांच्यात नगरपरिषद कार्यालयात एक तातडीची बैठक पार पडली.बैठकीनंतर नगराध्यक्ष अविनाश गायगोले आणि राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी विठ्ठल मंदिर येथील अपघातस्थळाची प्रत्यक्ष पाहणी केली. प्रशासनाने तात्काळ दखल घेत रस्त्यावरील लोखंडी कठडे काढण्याची तयारी दर्शवली असून, वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी गतीरोधक बनवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.या पाहणी दरम्यान आणि बैठकीत नगरपरिषदेचे बांधकाम सभापती नईम बेग, श्रीकांत जुनघरे, गजानन विजेकर, अविनाश ढेगे, उमेश भोंडे, देवगिरे, मनिष मेन यांच्यासह नगरपरिषदेचे पदाधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नॅशनल हायवे प्रशासनाने सुरू केलेल्या या कामामुळे विठ्ठल मंदिर परिसरातील अपघात थांबतील, अशी आशा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

**अखेर प्रशासनाने मानली चूक**

अपघाताच्या दुसऱ्याच दिवशी, म्हणजेच २६ जून रोजी अकोट-अंजनगाव मार्गाचे नॅशनल हायवे सुपरवायझर आणि नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांच्यात नगरपरिषद कार्यालयात एक तातडीची बैठक पार पडली. या बैठकीत नगराध्यक्ष आणि अधिकाऱ्यांमध्ये तीव्र शब्दांत खडाजंगी उडाली. रस्त्याच्या मधोमध लावलेले चुकीचे लोखंडी कठडेच या अपघातांना कारणीभूत ठरत असल्याचे नगराध्यक्षांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. अखेर अधिकाऱ्यांनी आपली चूक मान्य करत हे कठडे तात्काळ काढून त्याठिकाणी गतीरोधक बसवण्याची मागणी मान्य केली.

# राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार

**खल्लार** - सामाजिक समता, शिक्षण आणि बहुजन कल्याणाचे प्रणेते लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कृषी उत्पन्न बाजार समिती, दर्यापूर येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल पाटील गावंडे प्रमुख उपस्थित होते. यावेळी बाजार समितीचे संचालक प्रभाकर पाटील तराळ, भारत आठवले, असिफ खान, प्रभारी शासकीय सचिव आगरकर माजी सचिव हिम्मतराव मातकर तसेच मयुरी लहाने उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्याय, शिक्षणाचा प्रसार, आरक्षण आणि सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी केलेल्या ऐतिहासिक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आणि सामाजिक समतेची मूल्ये जपणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.



# रेल्वे उड्डाणपुल पुनर्निर्मितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला कायम ठेवून कामास गती द्या-आ.संजय खोडके

**अमरावती/का.प्र.**

मागील वर्षभरापासून सर्वच प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेल्या अमरावती रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीच्या कामासाठी गेल्या मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पात १२५.३७ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. त्यासंदर्भातील प्रशाकीय मान्यता, डिझाईन व सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्याने आता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अमरावती आरओबी पुनर्बांधणीच्या कामास सुरुवात झाली आहे. अशा परिस्थितीत महारेल यंत्रणेकडे अमरावती आरओबीचे काम हस्तांतरित केल्यास सर्व तांत्रिक मान्यतांच्या प्रक्रिया नव्याने कराव्या लागतील. म्हणून अमरावती आरओबी पुनर्बांधणीच्या कामासाठी नव्याने कोणतीही एजन्सी न नेमता सदरचे कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग यंत्रणेला कायम ठेवून कामास गती देण्याची मागणी आ.संजय खोडके यांनी विधानपरिषदेतून केली आहे.

आ. संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले कि, अमरावती ते बडनेरा या रेल्वे लाईनवर सन १९६३ च्या सुमारास रेल्वे उड्डाणपुलाची निर्मिती करण्यात आली. या उड्डाणपुलावरून शहराच्या चार भागाची वाहतूक जोडली गेली असून अमरावती शहरातील राजकमल चौक, हमालपुरा, रेल्वे स्थानक आणि जयस्तंभ चौकासारख्या महत्त्वाच्या केंद्रांना हा रेल्वे पूल जोडला असल्याने शहरवासीयांना वाहतूक व रहदारीची चांगली सुविधा होत होती. दरम्यान या पुलाचे स्ट्रक्चर ऑडिट मध्ये हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे सांगण्यात आल्याने गेल्या ऑगस्ट २०२५ पासून या पुलावरून सर्वच प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली. त्यामुळे शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण होऊन नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. अमरावतीकरांची रहदारीची समस्या दूर करण्यासाठी आणि सार्वजनिक वाहतूक सुलभ करण्यासाठी शासनाने रेल्वे उड्डाणपुल निर्मिती प्रकल्पासाठी तात्काळ निधी देऊन विहित मुदतीत व गुणवत्तापूर्वक पद्धतीने उड्डाणपुलाचे पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे जुन्या अस्तित्वातील रेल्वे उड्डाण पूलाच्या जागी नवीन रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकामासाठी १२५.३७ कोटींचा निधी लागणार असल्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला. त्याला गेल्या मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री



**विधान परिषदेत पावसाळी अधिवेशनातून वेधले लक्ष**

फडणवीस यांनी मंजुरी दिली असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता केल्याने आता प्रत्यक्षात अमरावती आरओबी च्या पुर्ननिर्माण कार्याला सुरुवात झाली आहे. अशी माहिती आ. संजय खोडके यांनी सभागृहाला दिली.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अमरावती रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम लवकरच पूर्ण होऊन सार्वजनिक वाहतूक सुलभ होण्याचा मार्ग अधिक प्रशस्त होत असतांना आता अचानक सदर काम महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (MRIDC) कडे हस्तांतरित करण्याबाबतचे आदेश काढण्यात आले आहे. मात्र अमरावती रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाची एजन्सी बदलवून महारेल संस्थेकडे अमरावती रेल्वे उड्डाणपुलाचे काम वर्ग केल्यास सर्व तांत्रिक मान्यता प्रक्रिया नव्याने करावे लागणार आहे. नव्याने सर्वेक्षण, आराखडा तयार करणे, डिझाईन निश्चित करणे आणि प्रशासकीय मान्यता मिळविण्याच्या या प्रक्रियेला दीर्घ कालावधी लागणार असल्याने कामाला विलंब होऊन प्रकल्प रखडण्याची सुद्धा दाट शक्यता असल्याची बाब आमदार संजय खोडके यांनी राज्यविधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. अमरावती शहराच्या मुख्य बाजारपेठांना जोडणारा आणि सर्वच प्रकारच्या वाहतुकीसाठी बहुपर्यायी ठरून अमरावतीमध्ये सार्वजनिक वाहतूक सुलभ ठरण्यासाठी अत्यंत सोयीचा असलेल्या अमरावती रेल्वे उड्डाणपुलाचे पुनर्निर्मितीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे कायम ठेवून १२५.३७ कोटींच्या हा पथदर्शी प्रकल्प पूर्णत्वास आणण्यासाठी कामाला गती द्यावी, अशी मागणी सुद्धा आ.संजय खोडके यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातून केली आहे.

# सिलोडा गावातील नागरिकांना विषारी पाणी पिण्याची वेळ

**अमरावती/का.प्र.**

तालुका नांदगाव खंडेश्वर येथील ग्रामपंचायत धानोरा गुरव अंतर्गत येणाऱ्या वार्ड क्रमांक १ मधील शीलोडा गावातील नागरिकांना गेल्या तीन ते चार दिवसांपासून दूषित पाणी पिण्याची वेळ आली आहे. गावातील एका सरकारी विहिरीत दोन देशी कोंबड्यांचे कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सिलोडा गावात दोन सरकारी विहिरी असून, अद्याप गावात शासकीय नळपाणी योजना उपलब्ध नाही. त्यामुळे गावकऱ्यांनी स्वतःच्या खर्चाने विहिरींमध्ये मोटार बसवून घरापर्यंत पाणीपुरवठ्याची व्यवस्था केली आहे.दलित वस्तीजवळील सरकारी विहिरीत दोन कोंबड्यांचे मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळले. हे मृतदेह तीन ते चार दिवसांपासून विहिरीत पडून असल्याचा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे या काळात अनेक नागरिकांनी हे दूषित पाणी वापरल्याची शक्यता असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित विहिरीवर अद्याप लोखंडी संरक्षक जाळी बसविण्यात आलेली नाही. तसेच अनेक वर्षांपूर्वी खोदलेल्या या विहिरींची दुरुस्ती किंवा नियमित स्वच्छता करण्यात आलेली नाही.

याबाबत ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.सध्या ग्रामपंचायतीवर प्रशासकीय समिती कार्यरत असतानाही या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विहिरीतील मृतदेह तातडीने बाहेर काढून विहिरीची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करण्यात यावे आणि नागरिकांना सुरक्षित व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.





# कणकवली देवगड प्रांताधिकारी यांच्यावर कार्यवाही करा

## सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

देवगड येथे बीएलओचे प्रशिक्षण वर्ग गुरुवार २५जुनला चालू होता. सकाळी ५ वाजता उठून शाळेत गेलेले शिक्षक परस्पर प्रशिक्षणाला गेले होते सकाळी ११ वाजता सुरू केलेले प्रशिक्षण २.३० वाजले तरी चालू होते. शिक्षकांना अस्वस्थ वाटू लागल्यामुळे त्यांनी छोटया सुट्टीची मागणी केली असता संविधानिक पदावर काम करणाऱ्या प्रांताधिकारी जगदीश कातकर यांनी असभ्य भाषेत हरामखोर शब्द वापरून कर्मचाऱ्यांचा अपमान तर केलेलाच आहे. मात्र त्या पदाची सुद्धा किंमत कमी केलेली आहे.

नवपिढी घडविणाऱ्या शिक्षकांना हरामखोर म्हणणाऱ्या प्रांताधिकाऱ्यांकडे नितीमत्ता आहे की नाही विचारणा करणाऱ्या शिक्षकांना अपमानास्पद बोलून हरामखोर तू जा इथून. कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरलेली आहे. याप्रकारची तात्काळ चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अन्यथा बीएलओ कामबंद आंदोलन पुकारण्यात येईल. कर्मचा-याविरोधातील अन्यायकारक, असभ्य व अभद्र वर्तनाला सिंधुदुर्गाच्या संस्कृतीत अजिबात स्थान नाही. यावर जिल्हाधिकारी योग्य ती योग्य ती कारवाई केली नाही तर कर्मचा-याच्या रोषास तहसिल कार्यालय देवगड येथे सोमवार २९जून रोजी लाक्षणिक आंदोलन कर्मचा-यांच्यावतीने करून त्यांच्या कृत्याचा निषेध केला जाईल.अशा इशाराचे निवेदन सिंधुदुर्ग सरकारी-निमसरकारी,शिक्षक-शिक्षकेत्तर समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष तथा शिक्षक समितीचे राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी दिला आहे.

कणकवली देवगड प्रांताधिकारी जगदीश कातकर यांनी शिक्षक समिती देवगडचे अध्यक्ष जयेंद्र चव्हाण यांना शिवीगाळ केल्याप्रकरणी तीव्र निषेध राज्य सरकारी कर्मचारी समन्वय समिती सिंधुदुर्ग यांनी केला असुन जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांना निवेदन देतांना अध्यक्ष राजन कोरगावकर, सरचिटणीस राजन वालावलकर ,शिक्षक समिती जिल्हाध्यक्ष विठ्ठल गवस,राज्य पदाधिकारी सचिन मदने व नामदेव जांभवडेकर ,देवगड अध्यक्ष जयेंद्र चव्हाण ,संदिप मिराशी, कणकवली अध्यक्ष सुशांत मर्गज, कुडाळ शिक्षक नेते प्रसाद वारंग, जगदीश गोगटे, श्रीकृष्ण कांबळी, आपा सावंत, संतोष तेर्से, ईश्वरलाल कदम, संजय तांबे, संतोष कुडाळकर, सचिन पवार,मान्यवर उपस्थित होते असे प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे- वर्षा लड्डा

**अमरावती/का.प्र.**



पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाबाबत आढावा बैठक घेतली.

बैठकीत अतिवृष्टी, पूरस्थिती, सखल भागांमध्ये पाणी साचणे, नाल्यांना आलेला पूर, झाडे पडणे, वीजपुरवठा खंडित होणे, रस्त्यांवरील वाहतुकीच्या समस्या तसेच इतर संभाव्य नैसर्गिक संकटांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाय योजनांवर चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण हे प्रशासनाचे सर्वोच्च कर्तव्य असून त्यासाठी सर्व विभागांनी जबाबदारीने आणि सजगतेने काम करण्याची आवश्यकता असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

आयुक्त वर्षा लड्डा यांनी सांगितले की, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन हे केवळ आपत्ती व्यवस्थापन विभागाचे काम नसून प्रत्येक विभागाची त्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे सर्व विभागांनी आपल्या कार्यक्षेत्रातील संभाव्य धोक्यांचे मूल्यांकन करून आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्यासाठी सज्ज राहावे. बैठकीत आपत्कालीन नियंत्रण कक्षाच्या कार्यपद्धतीवरही चर्चा करण्यात आली. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच आपत्तीच्या प्रसंगी आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री, वाहने, पंपिंग मशीन, जनरेटर आणि इतर साहित्य तत्परतेने उपलब्ध राहील याची खात्री करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले.

यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी स्पष्टपणे नमूद केले की, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारी केवळ अमरावती महानगरपालिकेची नसून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण कंपनी, पोलीस प्रशासन तसेच इतर संबंधित शासकीय विभागांचीही तितकीच महत्त्वाची भूमिका आहे. कोणतीही समस्या उद्भवण्यापूर्वीच तिचे निराकरण करण्यासाठी सक्रिय भूमिका घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

पावसाळ्याच्या काळात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास प्रशासन तत्परतेने प्रतिसाद देईल आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व यंत्रणा सज्ज राहतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, पोलीस विभाग वाहतुक शाखा निलेश गावंडे, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक संचालक नगर रचना सागर वानखडे, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, सब डिव्हीजनल इंजि. तुषार काळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सिव्हील इंजि. सुनिल जाधव, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाचे सहा.अधिक्षक अभियंता तन्वी साळुंके, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त मंगेश कडु, मुख्य अग्निशमन अधिकारी दिनेश हंबर्डे, अग्निशमन अधिक्षक अजय पंधरे, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे,सहाय्यक निवडणुक अधिकारी तथा सांख्यिकी अधिकारी अक्षय निलंगे, स्वास्थ अधिक्षक विजय बुरे, एस.ई. रविंद्र तांबेकर, श्रीरंग तायडे, उपअभियंता शरद तिनखेडे, आशिष अवसरे, विवेक देशमुख, हेमंत महाजन, अभियंता लक्ष्मण पावडे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक शारदा गुल्हाणे, कोणार्क कंपनीचे प्रतिनिधी, उपअभियंता, अभियंता तसेच आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# 'शिंदे गटा'च्या जुन्या कार्यकारिणीला स्थगिती - मंत्री उदय सामंत

## गावागावांत शिवसेनेची शाखा; महिन्याभरात नवीन कार्यकारिणी




**■ आमदार बच्चू कडू यांचे कौतूक**

उद्योग मंत्री उदय सामंत यांनी मार्गदर्शन करताना आमदार बच्चू कडू यांचे कौतूक केले. ते म्हणाले की बच्चू कडू यांनी विदर्भात शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर आवाज उठवला. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी बच्चू कडूंवर संघटन विस्तार करण्याची जबाबदारी दिलेली आहे. ते ही जबाबदारी योग्यरीत्या पार पाडतील आणि जिल्ह्यात शिवसेनेला मजबूत करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



**अमरावती/प्रतिनिधीः-** पश्चिम विदर्भात पक्षाची ताकद वाढवण्यासाठी शिवसेना शिंदे गटाने कंबर कसली आहे. अमरावतीच्या हॉटेल गौरी इनमध्ये पार पडलेल्या जिल्हास्तरीय मेळाव्यात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विद्यमान कार्यकारिणी स्थगित करत, एका महिन्यात नवीन कार्यकारिणी ☞(पान २ वर)

# बोलेरो - दुचाकीच्या धडकेत तरूण ठार,१ जखमी

### -समर्थ शाळेसमोर भीषण अपघात





**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक राजापेठ ते बडनेरा मार्गावर आज शुक्रवारी २६ जून रोजी पहाटेच्या सुमारास एक भीषण अपघात घडला. पिकअप आणि मोपेड दुचाकी यांच्यात झालेल्या या जोरदार धडकेत दुचाकी चालकाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला, तर त्याचा मित्र गंभीर जखमी आहे. हा अपघात समर्थ शाळेसामोरील मुख्य रस्त्यावर घडला. माहितीनुसार, स्वप्नील उर्फ गोलू सारंगधर पाटील (वय २८, रा. मालखेड रेल्वे, चांदूर रेल्वे) मृतक आहे तर त्याचा मित्र अभिषेक शंकर वानखडे (वय २४, रा. गोपाल नगर, अमरावती) जखमी आहे. त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहे. शुक्रवारी पहाटे स्वाप्निल पाटील आणि अभिषेक वानखडे मोपेड दुचाकीने क्रमांक एमएच २७ डिवाय ५८०७ ने जात होते. दरम्यान, पहाटे ५.३० वाजेच्या सुमारास सातूर्णा डीपीएस रोड येथील रहिवासी निखिल निर्मल कुशवाह ☞(पान २ वर)

# शेतात पेरणी दरम्यान विज पडून महिलेचा मृत्यू

### कळमजापूर येथील घटना



**चांदूररेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूररेल्वे तालुक्यातील कळमजापूर गावांतील पळसखेड पांदण रस्त्यावरील शेतात पेरणी करीता गेलेल्या ७ महिला पैकी १ महिलेचा विज पडून जागीच मृत्यू झाला.

चांदूररेल्वे येथून ६ किलोमीटर अंतरावर असलेल्या कळमजापूर शेत शिवारातील पळसखेड पांदण रस्त्यावरील शेतकऱ्यांच्या शेतात पेरणी सुरू असताना दूपारी ३ च्या दरम्यान विज पडून सुनंदा नरेश सहारे (वय ४५) ह्या महिलेचा जागीच मृत्यू झाला. तर सोबत काम करणाऱ्या महिला पैकी एक महिलेच्या हाताला दुखापत झाली तर अन्य महिला सदर घटनेने घाबरल्या. सर्व महिलांना चांदूररेल्वे ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले तर मृत्यूमुखी ☞(पान २ वर)

**शेतकरी बांधवांनी पेरणी योग्य पाऊस झाल्यानंतर पेरणी करावी. घाई करू नका. पाऊस किंवा विजा चमकत असतील तर कुठेतरी आसरा घेऊन त्या ठिकाणी थांबावे. असे आवाहन प्रशासनाच्यावतीने तहसीलदार पूजा माटोडे यांनी केले.**

# जिल्हा सामान्य रुग्णालयात नवजात बालकांसाठी स्वतंत्र आयसीयू युनिट द्या - आ. सुलभा खोडके

**मुंबई :-** राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभेतील कामकाजा दरम्यान आमदार सुलभा संजय खोडके यांनी अमरावती जिल्हयाच्या आरोग्य सेवांचा विस्तार व अधिक बळकटी मिळण्यासंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला. गंभीर अवस्थेतील बालकांना वेळेत उपचार मिळावेत म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन ) येथे नवजात बालकांना अतितात्काळ आरोग्य सेवा पुरविण्यासाठी स्वतंत्र आयसीयु युनिट स्थापन करण्याची मागणी आ. सुलभा खोडके यांनी विधानसभेतुन केली आहे.

आमदार सुलभा खोडके यांनी सभागृहाला अवगत केले कि, अमरावती येथे जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्हा स्त्री रुग्णालय येथे आरोग्याच्या चांगल्या सुविधा निर्माण होत आहे. जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन ) येथे नूतन इमारतीमध्ये नवजात बालकांसाठी ४६ बेडेड एनआयसीयु केअर युनिट सुरु आहे. त्याठिकाणी



शहरी भागाबरोबरच ग्रामीण तसेच मेळघाट -धारणी सारख्या आदिवासी दुर्गम भागातून रुग्ण मोठ्या प्रमाणात दाखल होत असतात. त्यामुळे आजारी किंवा मुदतपूर्व जन्माला आलेल्या नवजात बाळांची काळजी घेण्यासाठी २४ तास आयसीयू ची वैद्यकीय सेवा पुरवितांना अडचणी निर्माण होतात. सद्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अमरावती करिता जिल्हा सामान्य रुग्णालयाची इमारत हस्तांतरित करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा सामान्य रुग्णालयात नवजात बाळांसाठी स्वतंत्र आयसीयू ☞(पान २ वर)

# यवतमाळच्या तनुश्री कडूची अंडर-२१ भारतीय महिला हॉकी संघात निवड

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** लोहारा येथील अत्यंत सामान्य कुटुंबातील, टेलरच्या मुलीने जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर भारतीय हॉकीच्या आंतरराष्ट्रीय पटलावर झेप घेत यवतमाळच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. अवघ्या २० वर्षीय तनुश्री दिनेश कडू हिची ५ ते १४ जुलैदरम्यान इंग्लंड व स्कॉटलंड दौऱ्यासाठी जाणाऱ्या २१ वर्षांखालील भारतीय महिला हॉकी संघात मिडफिल्डर म्हणून निवड झाली आहे. लोहारा येथील झोपडपट्टीत




वाढलेल्या तनुश्रीच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. वडील दिनेश कडू हे टेलर असून त्यांच्या अल्प उत्पन्नावर संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. सरावासाठी आवश्यक क्रीडा साहित्य मिळविणेही अनेकदा कठीण ठरत होते. मात्र या अडचणींना न जुमानता तनुश्रीने आपले स्वप्न जिवंत ठेवले.

२०१५ मध्ये शालेय मैदानावर मित्रांसोबत खेळताना हातात घेतलेली हॉकी स्टिक तिला आज भारतीय संघापर्यंत घेऊन आली आहे. हॉकी महाराष्ट्रकडून सहा राष्ट्रीय स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व करताना तिने राज्य संघाचे नेतृत्वही केले. २०२४ ☞(पान २ वर)

# कारंजा बहीरम येथे गोवंश तस्करांवर पोलिसांची कारवाई

### ५ जनावरे मृतावस्थेत; १२.७७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण पोलिसांनी गोवंश तस्करीविरोधात मोठी कारवाई करत कारंजा बहीरम परिसरात एका आयशर ट्रकमधून निर्दयतेने वाहतूक करण्यात येणारी १९ गोवंश जनावरे जप्त केली. यापैकी ५ जनावरे मृतावस्थेत आढळून आली. या प्रकरणात ट्रकसह एकूण १२ लाख ७७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यात अवैध धंदे, गोवंश वाहतूक, जुगार, अवैध दारू विक्री व इतर गुन्हेगारी प्रकारांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार शिरजगाव कसबा पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार शुक्रवारी (दि. २६) सकाळी सुमारे ९ वाजता ग्राम कारंजा बहीरम येथून☞(पान २ वर)

# अखेर गोविंद पिंजरकर यांची झुंज अपयशी

### मॉर्निंग वॉक दरम्यान रानडुक्कराने केला प्राणघातक हल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील शेगाव रोडवरील आशियाड कॉलनी परिसरात दिनांक २४ जून रोजी पहाटे मॉर्निंग वॉक दरम्यान रानडुकराच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या गोविंद पिंजरकर (वय ७५) या ज्येष्ठ नागरिकाची मृत्यूशी झुंज अखेर अपयशी ठरली आहे. खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांनी सकाळी ६ वाजता अखेरचा श्वास घेतला. या दुर्दैवी मृत्यूनंतर आज दोन दिवसांनीही आशियाड कॉलनी व परिसरात प्रचंड शोककळा आणि भीतीचे वातावरण असून,



प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.

गत बुधवारी (२४ जून) पहाटे सव्वा पाचच्या सुमारास आशियाड कॉलनीचे रहिवासी गोविंद पिंजरकर हे नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडले होते. कॉलनीतील विघ्नहर्ता गणपती मंदिरासमोरील मोकळ्या जागेतून अचानक आलेल्या एका पिसाळलेल्या रानडुकराने त्यांच्यावर अत्यंत भीषण हल्ला चढवला. हा हल्ला इतका भयंकर होता की, डुकराने पिंजरकर यांच्या संपूर्ण अंगावर ठिकठिकाणी गंभीर चावे घेतले, ज्यामध्ये त्यांना आपले एक बोटही गमावावे लागले होते. प्रत्यक्षदर्शी असलेले ज्येष्ठांनीसुद्धा या घटनेची धास्ती घेतली आहे. या घटनेची थरारक दृश्ये परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद ☞(पान २ वर)

# हबीब नगरातून एमडीची तस्करी

## गुन्हे शाखेच्या छाप्यात ८.१५ लाखांचा साठा जप्त

### -सराईत आरोपी ताब्यात



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील युवकांना व्यसनाच्या गर्तेत ढकलणाऱ्या मेफेड्रोन (एमडी) ड्रग्सच्या अवैध व्यवसायावर गुन्हे शाखेने पुन्हा एकदा घाव घातला आहे. नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हबीब नगर परिसरात टाकलेल्या धाडीत पोलिसांनी तब्बल ५४.२ ग्रॅम एमडी ड्रग्स जप्त करत ८ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. या कारवाईमुळे शहरातील अमली पदार्थांच्या साखळीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे. गुन्हे शाखा युनिट क्रमांक १ च्या पथकाला गुप्त माहिती मिळाली होती की, हबीब नगर क्रमांक १ परिसरातील एका घरातून मेफेड्रोन (एमडी) या घातक अंमली पदार्थाची विक्री केली जात आहे. माहितीची खातरजमा ☞(पान २ वर)

# इलेक्ट्रॉनिक सिगरेटची विक्री व साठवणूक करणारा गजाआड

### गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** इलेक्ट्रॉनिक सिगारेटची विक्री तसेच साठवणूक करणाऱ्यावर गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकून त्याच्या कडून २ लाख ७५ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. आशिष बाबुराव कडू (वय ४०, केडिया नगर,मु पो वार्ड २ जवळापूर ता.अचलपूर)





असे अटक आरोपीचे नाव आहे. गुन्हे शाखेच्या पथकाला शुक्रवारी गोपनीय माहिती मिळाली होती की केडिया नगर येथील गजानन टावर अपार्टमेंट मधील ५०१ नंबरच्या फ्लॅटमध्ये आशिष कडू हा सरकारने☞(पान २ वर)

# बडनेरा झोनमध्ये प्लास्टिक जप्ती मोहीम

### २० आस्थापनांची तपासणी, १० हजारांचा दंड

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या झोन क्र.४ (बडनेरा) अंतर्गत सूतगिरणी चौक ते गोपाल नगर मुख्य मार्ग परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणीची विशेष मोहीम राबविण्यात आली. आयुक्त वर्षा लड्डा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे झोन क्र.४ यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान एकूण २० आस्थापनांची तपासणी करण्यात



आली. तपासणीत काही आस्थापनांमध्ये प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर तसेच ओला व सुका कचरा वेगळा करण्यासाठी आवश्यक असलेले दोन डस्टबिन नसल्याचे आढळून आले. कारवाईदरम्यान मोनिका किराणा व☞(पान २ वर)

# नागपुरी गेट पोलिसांनी जखमी काळवीटाला दिले जीवदान



**अमरावती/प्रतिनिधीः-** लालखडी शेतशिवारात जखमी आढळलेल्या काळवीटाला नागपूर गेट पोलिसांनी जीवदान दिले आहे. माहिती नुसार लालखडी शेत शिवारातून जखमी काळवीट रहिवाशी क्षेत्रामध्ये आला होता. त्याला पाहून नागरिक घाबरले. यामुळे परिसरात खळबळ उडाली होती. याची माहिती नागरिकांनी नागपुरी गेट पोलिसांना दिली. माहिती मिळताच नागपूरी गेट पोलीस तेथे पोहोचले. त्यांनी जखमी काळवीटाला ताब्यात घेतले आणि वन विभागाला याची माहिती दिली. वन विभागाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ☞(पान २ वर)

# पत्नीला नशायुक्त पदार्थ पाजून अनैसर्गिक अत्याचार; पती अटकेत

### मोर्शीत संतापजनक प्रकार; विवाहितेची प्रकृती गंभीर

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यात एक धक्कादायक आणि अमानुष घटना उघडकीस आली आहे. पतीने आपल्या पत्नीला पिण्याच्या पाण्यात नशायुक्त पदार्थ मिसळून पाजल्यानंतर तिच्यावर वारंवार अनैसर्गिक अत्याचार केल्याचा गंभीर आरोप असून, या प्रकरणी मोर्शी पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. पीडित महिलेची



प्रकृती गंभीर असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला (वय २१) आणि आरोपी हे पती-पत्नी आहेत. आरोपी पती पत्नीच्या पिण्याच्या पाण्यात नशा आणणारे अथवा बेशुद्ध करणारे औषध मिसळून देत होता. औषधाचा परिणाम झाल्यानंतर महिलेला चक्कर येऊन ती अर्धबेशुद्ध अवस्थेत☞(पान २ वर)